सोलापूर तरुण भारत

# आसमंत



# एक देश एक निवडणूक महत्त्वाचं पाऊल

विशेष
प्रशांत माने, मुख्य संपादक
भ्र. ९८८११९१४४३

वन नेशन वन इलेक्शन याचा उल्लेख भाजपाच्या २०१४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणूक जाहीरनाम्यात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान झाले आणि त्यांनी भाजपा व संघ परिवाराचा अजेंडा काटेकोरपणे राबवायला सुरुवात केली. केंद्रात सत्ता असेल, तर पक्षाचा अजेंडा राबविणे शक्य होते हेच मोदी सरकारने देशाला दाखवून दिले. मोदी यांनी अयोध्येत भव्य राम मंदिर उभारून दाखवले. गेली सात दशके जम्मू-काश्मीरला घटनात्मक संरक्षक कवच देणारे ३७० वे कलम कायमचे रद्द केले, एक देश, एक कर या सूत्राने देशभर जीएसटी लागू केला, तलाक पद्धत कायद्याने रद्द करून लाखो मुस्लीम महिलांना दिलासा दिला. मोदींनी जे सांगितले ते त्यांनी करून दाखवले.

एक देश, एक निवडणूक आणि समान नागरी कायदा हा महत्त्वाचा अजेंडा अमलात आणण्यासाठीच मोदी सरकार कटिबद्ध आहे. सन २०२९ पासून देशात पहिल्या टप्प्यात लोकसभा व राज्यांच्या विधानसभा निवडणुका घ्याव्यात व नंतर १०० दिवसांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात याव्यात, अशी शिफारस रामनाथ कोविंद समितीने केली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर हे विधेयक संसदेच्या हिवाळी अधिवेशनात मांडले जाईल व त्यावर सविस्तर चर्चा होईल. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर १९५१-५२ ते १९६७ या काळात लोकसभा व विधानसभांच्या एकत्रित निवडणुका होत होत्या. नंतर विविध कारणांमुळे हे वेळापत्रक विस्कटले. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या अहवालानुसार २०२४ च्या निवडणुकीत देशात १२ लाख मतदान केंद्रे होती, २०२९ ला एकत्रित निवडणुकीसाठी ही संख्या १३ लाख ५७ हजार असेल. एकाच वेळी लोकसभा व विधानसभा निवडणुका घेण्याचे ठरले, तर ईव्हीएमची २६ लाख ५५ हजार युनिट्स लागतील तसेच १७ लाख ७८ हजार कंट्रोल युनिट्स व १७ लाख ७९ हजार व्हीव्ही पॅट्स लागतील. एकत्रित निवडणुकीसाठी ७९५१ कोटी रुपये अतिरिक्त खर्च येईल. तसेच ईव्हीएम युनिट्स ठेवण्यासाठी गोदामे व बंदिस्त जागा मोठी लागेल. त्यासाठी शाळा-कॉलेजच्या जागा घ्याव्या लागतील. यावर्षी २०२४ मध्ये झालेल्या निवडणुकीसाठी ७० लाख कर्मचारी लागले होते, दर पाच वर्षांनी १५ टक्के कर्मचारी जास्त लागतात.

सध्या जम्मू-काश्मीर व हरियाणात निवडणुकीचा कार्यक्रम राबवला जातो आहे. नोव्हेंबर महिन्यात महाराष्ट्र व झारखंड या दोन राज्यांच्या निवडणुका आहेत, या चारही राज्यांवर २०२९ मध्ये होणाऱ्या एकत्रित निवडणुकींचा काहीही परिणाम होणार नाही. एक देश, एक निवडणूक यासाठी घटनेच्या कलम ८३ व १७२ मध्ये दुरुस्ती करावी लागेल. लोकसभेत भाजपाकडे २४० खासदार आहेत. भाजपाकडे लोकसभेत स्वतःकडे बहुमत नाही. म्हणूनच मित्रपक्षांची मदत घेऊन हे मिशन पार पाडावे लागणार आहे.

एनडीएकडे जनता दल यु व तेलुगू देशासह लोकसभेत खासदारांची संख्या २९३ आहे. घटना दुरुस्तीसाठी राज्यांच्या समर्थनाची गरज पडणार नाही, असेही सांगण्यात येत आहे.

**माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या समितीने १४ मार्च २०२४ रोजी एक देश, एक निवडणुकीच्या संदर्भात तयार केलेला १८ हजार ६२६ पानांचा अहवाल सादर केला आणि केंद्रीय मंत्रिमंडळाने तो स्वीकारला. २०२९ मध्ये लोकसभा व विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेता येणे शक्य आहे का, या मुद्द्यावर देशात चर्चा सुरू झाली. अखेरीस १२ डिसेंबर २०२४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने एक देश एक निवडणुक या विधेयकाला मंजुरी दिली. आता या विधेयकाचा पुढील प्रवास सुरु झाला असून सभागृहाच्या मान्यतेनंतर या विधेयकाचा पुढील प्रवास यशस्वीरित्या होईल अन् देशात विविध निवडणुकांवर होणारा करोडो रुपयांचा खर्च बचत होईल आणि विविध निवडणुकांसाठी करावा लागणारा मनुष्यबळाचा देखील निश्चित थांबेल. एक देश, एक निवडणूक देशाच्या हिताच्या दृष्टिने भाग्यकारकच ठरेल, यात शंका नाही.**

इंदिरा गांधी पंतप्रधान असतानाच एक देश, एक निवडणूक हा मुद्दा पुढे आला होता. तेव्हा इंदिराजींनी त्यात फारसा रस दाखवला नव्हता. १९९९ मध्ये विधी आयोगाने एकत्रित निवडणुकीची शिफारस केली. तेव्हा वाजपेयी सरकारने फार रस दाखवला नव्हता. २०१४ मध्ये भाजपाने निवडणूक जाहीरनाम्यातच एक देश, एक निवडणूक हा विषय समावेश केला. २०१५ मध्ये विधी आयोगाने या विषयावर विस्तृत अहवाल सादर केला. २०१९ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या मुद्द्यावर सर्वपक्षीय बैठक बोलावून चर्चा केली.

१ सप्टेंबर २०२३ रोजी सरकारने माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. या वर्षी स्वातंत्र्य दिनाला पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लाल किल्ल्यावरून भाषण करताना एक देश, एक निवडणूक या मुद्द्याचा पुनरुच्चार केला. त्यानंतर या विषयाला गती लाभली. मोदी सरकारला व भाजपाला एकत्रित निवडणुकीविषयी एवढी कळकळ व तळमळ आहे मग महाराष्ट्र, झारखंड, जम्मू-काश्मीर व हरियाणामध्ये एकाच वेळी विधानसभा निवडणुका होणे अपेक्षित असताना का नाही घेतल्या? पाच वर्षांपूर्वीही सणवार होतेच, मग याच वर्षी गणपती, दसरा, दिवाळी अशी कारणे सांगून महाराष्ट्राच्या निवडणुका हरियाणा व जम्मू-काश्मीरबरोबर का घेतल्या नाहीत? जर चार राज्यांच्या निवडणुका एकाच वेळी घेणे सरकारला व निवडणूक आयोगाला शक्य होत नाही मग लोकसभेवर देशातील अडीच डझन राज्यातील विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेणे हे जमू शकेल का?

देशात सतत कुठल्या ना कुठल्या निवडणुका होतच असतात. सतत निवडणूक खर्च, काळ्या पैशांचा वारेमाप वापर, सतत कुठली ना कुठली आचारसंहिता यात प्रशासन वेढलेले असते. मग विकासकामांकडे दुर्लक्ष होते, विकासाची गती मंदावते. सारे राजकीय पक्ष निवडणुका कशा जिंकता येतील व सत्ता कशी काबीज करता येईल यातच गुंतून राहतात. म्हणून एकत्रित निवडणुका हा पर्याय उत्तम आहे. एकत्रित निवडणुकीसाठी निधी, मनुष्यबळ, साधनसामग्री, उपकरणे, सुरक्षा व्यवस्था, नियोजन सर्व काही प्रचंड व तेही एकाच वेळी लागेल. एकत्रित निवडणुका घेणे म्हणजे शिवधनुष्य पेलवण्यासारखे आहे. एकत्रित निवडणुकांमुळे अनेक विधानसभांचा कार्यकाल संपण्यापूर्वीच त्या बरखास्त कराव्या लागतील हा मोठा धोका आहेच. स्वातंत्र्यानंतर झालेल्या पहिल्या निवडणुकीत १७ कोटी मतदार होते, आता मतदारांची संख्या १०० कोटीच्या वर गेली आहे. देशातील निवडणुकांचा सरकारी खर्च ५ हजार कोटींवर गेला आहे. निवडणुकीसाठी राजकीय पक्ष व त्यांच्या उमेदवारांचा खर्च ६० हजार कोटींपेक्षा जास्त असावा असा अंदाज आहे. आता केवळ पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंग दिसत नाहीत, तर रॅली, रोड शो, जाहीर सभा, नाका (नुक्कड) सभा, सोशल मीडिया, यूट्युब, आदी साधने प्रचारात अधिक प्रभावीपणे राबवली जात आहेत. देशातील विधानसभांचा कार्यकाल जून २०२९ पर्यंत संपवायचा असेल, तर मिझोराम, छत्तीसगड, मध्य प्रदेश, राजस्थान, तेलंगणा या राज्यांच्या विधानसभांना ६ महिने मुदत वाढ द्यावी लागेल. गुजरात, हिमाचल प्रदेश, मेघालय, नागालँड, त्रिपुरा, कर्नाटक या विधानसभांचा कार्यकाळ १ वर्षे १ महिना ते १ वर्षे ७ महिना इतकाच राहील. **(पान ४ वर )**

---

**बीआरआय' प्रकल्पाबाबत चीन आणि नेपाळमध्ये नुकताच एक करार झाला असून, नेपाळने चीनवर विश्वास ठेवण्याचे नको ते धाडस केले आहे. या करारामुळे दोन्ही देशांमधील आर्थिक आणि राजनैतिक संबंध अधिक दृढ होतील, असा विश्वास नेपाळने व्यक्त केला असला, तरी ते कितपत शक्य आहे, याबाबत साशंकताच!**




# चीनच्या सापळ्यात नेपाळ

परराष्ट्रकारण
ओंकार मुळ्ये

पायाभूत सुविधा आणि गुंतवणुकीच्या क्षेत्रात चीनचा 'बेल्ट अॅण्ड रोड इनिशिएटिव्ह' अर्थात 'बीआरआय प्रकल्प' हा इतिहासातील सर्वात मोठा प्रकल्प असल्याचे म्हटले जाते. वास्तविक, चीनला या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाद्वारे जागतिक स्तरावर आपले भू-राजकीय वर्चस्व प्रस्थापित करायचे आहे, हे लपून राहिलेली नाही. त्यामुळे चीनच्या फसव्या नितीवर कोणीच विश्वास ठेवताना दिसत नाही. परंतु, सध्या 'बीआरआय' प्रकल्पाबाबत चीन आणि नेपाळमध्ये नुकताच एक करार झाला असून, नेपाळने चीनवर विश्वास ठेवण्याचे नको ते धाडस केले आहे. या करारामुळे दोन्ही देशांमधील आर्थिक आणि राजनैतिक संबंध अधिक दृढ होतील, असा विश्वास नेपाळने व्यक्त केला असला, तरी ते कितपत शक्य आहे, याबाबत साशंकताच!

नेपाळचे पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनी या कराराला दुजोरा दिला आहे. बीआरआय' प्रकल्पाअंतर्गत नेपाळ व चीनमधील आर्थिक सहकार्य अधिक बळकट होईल, असे ओली म्हणाले. चीन आणि नेपाळ यांच्यातील जवळीक गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने वाढलेली दिसते. चीनने या प्रस्तावात विशेषतः मदत आणि तांत्रिक मदतीचा मुद्दा समाविष्ट केला आहे. या करारांतर्गत पायाभूत सुविधा, व्यापार आणि कनेक्टिव्हिटी या क्षेत्रात दोन्ही देशांमधील सहकार्य वाढवायचे असल्याचे नमूद केले आहे. चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी नेपाळच्या विकासाला पूर्ण पाठिंबा दिल्याचा दावा ओली यांनी केला. याशिवाय ओली यांनी चिनी गुंतवणूकदारांना नेपाळमध्ये गुंतवणूक करण्यास सांगितले आहे.

वास्तविक 'बेल्ट अॅण्ड रोड इनिशिएटिव्ह' हा प्रकल्प एवढा मोठा आणि परिणामकारक आहे की, चीनचे सर्व हेतू पूर्ण झाल्यास आशियातील एक मोठी शक्ती बनण्याचे आपले उद्दिष्ट तो सहज पूर्ण करू शकेल. इतकेच नव्हे, तर लष्करी आणि आर्थिकदृष्ट्या अमेरिकेचे अनेक दशकांचे वर्चस्वही एका क्षणात संपवण्याचे धाडस चीन करू शकतो. त्याचबरोबर नेपाळसारख्या अनेक छोट्या देशांना आपल्या कर्जजाळ्यात ओढून चीनच्या जोरावर पाकिस्तान आपल्या वसाहती बनवू शकतो आणि त्या जोरावर तो आपल्या शत्रूंसमोर आपली ताकदही वाढवू शकतो. 'बीआरआय' प्रकल्पाच्या माध्यमातून चीन आशियाला आफ्रिका आणि युरोपशी जोडणार असल्याची माहिती आहे. त्यासाठी रेल्वे, बंदरे, महामार्ग आणि आणि एका विशिष्ट पाईपलाईनच्या माध्यमातून जाळे विणले जाणार आहे. सप्टेंबर २०१३ साली सुरू झालेला हा प्रकल्प २०४९ सालापर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य चीनने निर्धारित केले आहे. यावरून त्याची भव्यता किती असेल हे लक्षात येईल. परंतु, मानवी हक्कांचे उल्लंघन, पर्यावरणावरील परिणाम आणि कर्जसापळ्यातील मुत्सद्दीपणा यांसारख्या मुद्द्यांवरून 'बीआरआय' प्रकल्पावर टीका होत आहे.

विशेष म्हणजे, पंतप्रधान ओली यांना चीनचे कट्टर समर्थक मानले जाते. त्यांनी ओली यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळात भारताने नेपाळच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करत आपले सरकार पाडल्याचा आरोप केला होता. नेपाळनेही सीमावर्ती भागांबाबत कठोर भूमिका घेतली होती. चीनच्या सांगण्यावरून त्यांच्या सरकारने आपल्या नकाशात भारतातील काही क्षेत्र दाखवण्याचा प्रयत्न केला होता. नकाशात उत्तराखंडमधील लिपुलेख, कालापानी आणि लिंपियाधुरा हे नेपाळचे असल्याचा दावा करण्यात आला होता. तेव्हा भारताने यावर तीव्र आक्षेप व्यक्त केला होता. 'बीआरआय' प्रकल्पाच्या माध्यमातून चीनने या देशांना इतके कर्ज वाटप केले आहे की, त्यांना एकप्रकारे आपले गुलाम बनवले आहे. पाकिस्तान, श्रीलंका, मालदीव याची जिवंत उदाहरणे आपल्यासमोर आहेत.


आता नेपाळही केवळ आर्थिक फायद्यासाठी चीनसाठी दरवाजे उघडत आहे. सध्याची परिस्थिती पाहता, नेपाळ आणि पाकिस्तानला हा प्रकल्प फायदेशीर वाटत असला, तरी भविष्यात त्याचे मोठे नुकसान होणार आहे. पाकिस्तान, श्रीलंका आणि मालदीवची झालेली सद्यस्थिती पाहता नेपाळचे वेळीच डोळे उघडायला हवे होते. परंतु, वेळ निघून गेल्याने नेपाळच्या हाती आता काय येते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# महाकुंभ २०२५ : सर्वसिध्दिप्रदः कुंभः

वेधक
दत्ता पंचवाघ

उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या महाकुंभ मेळ्याची सध्या जोरदार तयारी सुरू आहे. हा महाकुंभ मेळा हा जगातील सर्वात मोठा धार्मिक कार्यक्रम ठरणार आहे. या कुंभमेळ्यामध्ये विविध साधू-संत, महामंडलेश्वर यांच्याप्रमाणेच सर्वसामान्य भाविक प्रचंड संख्येने सहभागी होणार आहेत.

उत्तर प्रदेश पर्यटन विभागाने कुंभमेळ्यामध्ये सहभागी होण्यासाठी ३४ देशांच्या राजनैतिक अधिकाऱ्यांना निमंत्रणे पाठविली आहेत. निमंत्रण पाठविण्यात आलेल्या देशांचे राजदूत किंवा उच्चायुक्त कुंभमेळ्याची 'याचि देही याचि डोळा' अनुभूती घेणार आहेत. कुंभमेळ्यासाठी नेपाळ, श्रीलंका, इंडोनेशिया, थायलंड, मॉरिशस, कंबोडिया, दक्षिण कोरिया, म्यानमार, भूतान, बांगलादेश, फिजी, मलेशिया, व्हिएतनाम, अमेरिका, ब्रिटन ऑस्ट्रेलिया, रशिया, फ्रान्स, कॅनडा, जर्मनी आणि अन्य अनेक देशांना निमंत्रणे पाठविण्यात आली आहेत. भारताच्या महान सांस्कृतिक परंपरेचे दर्शन यानिमित्ताने जगातील विविध देशांच्या प्रतिनिधींना होईल. तसेच, एवढा प्रचंड सोहळा अत्यंत समर्थपणे यशस्वी करण्याची शक्ती भारताकडे आहे, याचे दर्शनही जागतिक समुदायास होईल. या महाकुंभ मेळ्यासाठी ५० कोटी भाविक येतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. विविध देशांना निमंत्रणे पाठविण्याचे दोन हेतू आहेत. यामुळे धार्मिक आणि अध्यात्मिक पर्यटनास अधिक गती मिळेल आणि यानिमित्ताने विविध देशांशी भारताचे संबंध अधिक दृढ होण्यास मदत होईल. धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने आपले राज्य अग्रेसर राहील, असा प्रयत्न उत्तर प्रदेश सरकारकडून केला जात आहेच. कुंभमेळ्यास येणारे भाविक आणि अन्य निमंत्रित अतिथी यांच्या सुरक्षेसाठी उत्तर प्रदेश सरकारने अत्यंत कडक सुरक्षा व्यवस्था ठेवली आहे. तसेच, कायदा- सुव्यवस्था राखण्यासाठी ६० हजार पोलीस तैनात ठेवण्यात येणार आहेत. प्रचंड संख्येने येणाऱ्या भाविकांच्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. **(पान ४ वर )**



राष्ट्ररक्षा

ब्रि. हेमंत महाजन
भ्र. ९०९६७०१२५३

# शांतता हवी असेल तर लढाईकरिता सदैव तयार राहणे जरूरी

अणुयुद्ध लढण्याकरिता आण्विक ट्रायड/आण्विक त्रिसूत्री (Nuclear Triad) ही एक लष्करी संकल्पना आहे; ज्यामध्ये तीन भाग असतात. आंतरखंडीय क्षेपणास्त्रे (ICBMs) म्हणजे जमिनीवर आधारित आण्विक क्षेपणास्त्रे, आकाशातून हल्ला करणारी स्ट्रॅटेजिक बॉम्बर्स म्हणजे अणुबॉम्ब आणि क्षेपणास्त्र असलेले विमान आणि पाणबुडी प्रक्षेपित बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे (SLBMs), आण्विक क्षेपणास्त्र सशस्त्र पाणबुड्या. ही क्षमता आतापर्यंत भारताकडे नव्हती; जी आता निर्माण होत आहे.

## भारत पाणबुडीतून अण्वस्त्रे डागण्यास सज्ज

भारतीय नौदलात अलिकडेच समाविष्ट झालेल्या आयएनएस अरिघात या पाणबुडीतून अण्वस्त्रक्षम साडेतीन हजार किलोमीटर पल्ल्याच्या के-४ बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची चाचणी करण्यात आली. या चाचणीने चीनच्या मुख्य भूभागातील बराचसा भाग प्रहार टप्प्यात येईल. यातून भारताची आण्विक ट्रायड अधिक बळकट झाली आहे. आण्विक युद्धात प्रतिहल्ला चढविण्यासाठी (Second strike capability) अजून एक प्रभावी पर्याय उपलब्ध झाला आहे.



### पाण्याखालील क्षेपणास्त्र प्रक्षेपक प्रणाली कठीण काम

भारताची अणुशक्तीवर चालणारी आयएनएस अरिघात ही दुसरी बॅलिस्टिक क्षेपणास्त्र पाणबुडी (एसएसबीएन) आहे. तीन महिन्यांपूर्वीच ती नौदलात सामील झाली. या पाणबुडीतून २७ नोव्हेंबर रोजी भारतीय नौदलाने अण्वस्त्रक्षम साडेतीन हजार किलोमीटर मारक क्षमतेचे के-४ क्षेपणास्त्र डागण्याची चाचणी केली. पाण्याखालील क्षेपणास्त्र प्रक्षेपक प्रणाली हे अत्यंत कठीण काम आहे. पाणबुडीतून डागलेल्या क्षेपणास्त्राचे यशस्वी प्रक्षेपण क्षमता सिद्ध करण्यासाठीची चाचणी हे महत्त्वाचे पाऊल आहे. यात शस्त्र प्रणालीचे परिचालन व तांत्रिक मापदंड सिद्ध केले जातात.

### के-४ क्षेपणास्त्र काय आहे?

नौदलाच्या अरिहंत वर्गातील पाणबुड्यांसाठी संरक्षण संशोधन व विकास संस्थेने (डीआरडीओ) विकसित केलेले के-४ हे साडेतीन हजार किलोमीटर पल्ल्याचे क्षेपणास्त्र; जे स्वदेशी क्षेपणास्त्रांच्या 'के' मालिकेतले आहे. माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या सन्मानार्थ त्यांच्या 'के' आद्याक्षरावरून त्याचे नामकरण करण्यात आले आहे. विकसित क्षेपणास्त्राची २०१४ आणि २०१६ मध्ये यशस्वी चाचणी घेण्यात आली होती व आण्विक शस्त्रे वाहून नेण्याची क्षमता प्रमाणित करण्यात आली. घन रॉकेट प्रणोदकावर (डेश्रळव षींशश्र) ते आधारित आहे. या क्षेपणास्त्रात तीन घटकांना परस्परांना जोडणारी प्रणाली आहे; ज्यामुळे शत्रूला बॅलिस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीतून के-४ क्षेपणास्त्राचा माग काढणे आणि त्यास नष्ट करणे कठीण होईल.

### देशाच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वाचे

स्वदेशी बनावटीची पाणबुडी, स्वदेशी क्षेपणास्त्राने अण्वस्त्रक्षम होईल. अनेक तांत्रिक अडथळे पार करून 'के' मालिकेतील या क्षेपणास्त्रांचा विकास करण्यात आला. पाणबुडीतून अण्वस्त्र डागण्याची क्षमता भारताच्या सामर्थ्यात सामरिक जोड देणारी ठरेल. या वर्गातील तिसरी आयएनएस अरिदमन ही पाणबुडी पुढील वर्षात कार्यान्वित होईल. त्यानंतर अणुशक्तीवरील दोन पाणबुड्या के-५ पाच हजार किलोमीटर पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांनी सज्ज असतील. आण्विक प्रतिबंधासाठी (छींलश्रशरी वशींशींशपलश) एक पाणबुडी नेहमी गस्तीवर असणे आवश्यक असते. देशाला किमान चार एसएसबीएनची गरज आहे. एखादी पाणबुडी बंदरात असताना दुसरी गस्तीवर राहू शकते. आण्विक पाणबुडी अधिक काळ त्या पाण्याखाली राहू शकतात. या पाणबुड्या देशाची आण्विक ट्रायड बळकट करतील. आण्विक प्रतिबंधन क्षमता वाढवून देशाच्या सुरक्षेत निर्णायक भूमिका निभावतील. पहिल्या आयएनएस अरिहंत पाणबुडीवर के-१५ या ७५० किलोमीटरवर मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रांची चाचणी झाली होती. साडेतीन हजार किलोमीटरच्या के-४ ने सुसज्ज आयएनएस अरिघातच्या चाचणीने चीनच्या मुख्य भूभागातील बराच भाग प्रहार टप्प्यात येईल. आयएनएस अरिदमनच्या समावेशानंतर भारताची प्रतिहल्ला चढविण्याची आण्विक क्षमता पुढील वर्षात तैनात होईल. या दोन्ही पाणबुड्यांची उपस्थिती संभाव्य धोक्यांचा प्रतिबंध करण्याची आणि राष्ट्रीय हिताचे संरक्षण करण्याची भारताची क्षमता आणखी वाढवणार आहे.

### भारत आणि चीन अणुयुद्ध

भविष्यकाळातील युद्ध आकाशात, जमिनीवर, समुद्रात लढले जाऊ शकते. त्या दिशेने भारताने प्रथम पृथ्वी व अग्नी प्रक्षेपणास्त्राची चाचणी घेतली होती. भारताचे चीन किंवा पाकिस्तानशी अणुयुद्ध होईल का? याचा अंदाज कुठल्याही तज्ज्ञांना लावणे सोपे नाही. १९४५ नंतर अणुबॉम्बचा वापर कोठेच झाला नाही, तरीपण पाकिस्तान व चीनकडून वेळोवेळी मिळणाऱ्या धमक्यांपासून रक्षण करण्याकरिता अणुयुद्धाची तयारी करणे गरजेचे आहे. अणुयुद्ध



करण्याकरिता अणुबॉम्ब व तो टाकण्याकरिता वाहन ही दोन्ही गरजेचे आहेत.

### आकाशातून अणुबॉम्ब, जमिनीवरून क्षेपणास्त्राची क्षमता उच्च दर्जाची

आकाशातून अणुबॉम्ब टाकण्याकरिता आपल्या हवाई दलात सुखोई, मिराज अशी विमाने सुसज्ज आहेत. ही सध्याच्या गरजेसाठी पुरेशी आहेत. जमिनीवरून क्षेपणास्त्र मारण्याची क्षमता पृथ्वी व अग्नी या दोन्ही मिसाईलमध्ये आहे. अणुबॉम्ब जमिनीवरून फायर करण्याकरिता वाहने पृथ्वी-१-२ (३५० किमी), अग्नी-१ आणि अग्नी-२ (२००० किमी), अग्नी-३ (३००० किमी) शस्त्र म्हणून भारतीय सैन्यात या सामील झालेले आहेत. अग्नी-४ (४००० किमी) ची मागच्या वर्षी चाचणी करण्यात आली. जमिनीवरून मारा करण्याकरिता अग्नी-५ च्या रूपाने (५००० किलोमीटर) शस्त्र म्हणून सैन्यात



येण्याकरिता अजून एक-दोन वर्षे लागू शकतात.

### भारताची अणुबॉम्ब क्षेपणास्त्र क्षमता

भारताकडे ९० ते ११० अणुबॉम्ब असावेत; जे सध्याच्या गरजेला पुरेसे आहेत. थोडक्यात आज आपल्याकडे जी क्षेपणास्त्रे आहेत त्याच्या मदतीने आपण पाकिस्तानशी, चीनशी युद्ध करण्याकरिता पूर्णपणे सक्षम आहोत.

### प्रक्षेपणास्त्रे विकसित करायला चीनची पाकिस्तानला मदत

अग्नी-१ विरुद्ध अब्दाली, ब्रह्मोस विरुद्ध बाबर, पृथ्वी विरुद्ध घोरी, नाग विरुद्ध शाहीन, अग्नी-५ विरुद्ध चीनचे सीएसएस-१, २, ३, ४. भारत, पाकिस्तान आणि चीन यांच्या शस्त्रांची ही नावे. अग्नी-५ ला उत्तर म्हणून पाकिस्तानने हफ्त४ चे परीक्षण केले. या क्षेपणास्त्र चाचणीसाठी चीन व उत्तर कोरियाने पाकिस्तानला मदत केली आहे. लष्करी आणि सुरक्षा क्षेत्रात पाकिस्तान भारतासोबत चीनच्या मदतीने 'समानता' विकसित करण्याचा प्रयत्न करीत आहे. १९९८ च्या भारताच्या आण्विक चाचण्यांनंतर पाकिस्ताननेही चाचण्या घेतल्या. चीन पाकिस्तानच्या आण्विक भट्ट्यांना मदत करीत आहे.

### शांतता हवी; पण...

के-४ ने सुसज्ज आयएनएस अरिघातच्या चाचणीने भारताची आण्विक प्रतिकारशक्ती पूर्णपणे कार्यान्वित होत असली, तरी आण्विक पाणबुडीला मुख्यालयाशी तत्काळ संवाद साधता येईल, यासाठी प्रभावी प्रणाली उभारण्यासाठी काम करावे लागणार आहे. अणुयुद्ध, पारंपरिक युद्ध आणि अपारंपरिक युद्ध तयारी करणे खर्चाचे असते, म्हणून गरजेप्रमाणे प्राधान्य दिले जावे. आपण माओवाद, काश्मीरमधला आतंकवाद आणि ईशान्य भारतातील बंडखोरी आणि बांगलादेशी घुसखोरी थांबविण्यास प्राधान्य द्यायला हवे. त्यानंतर सैन्याच्या शस्त्राचे आधुनिकीकरण पूर्ण करणे महत्त्वाचे आहे. अणुयुद्धाची तयारी करणे नंतर होऊ शकते. संशोधन व आधुनिकीकरण चालू ठेवावे. जगात विविध ठिकाणी ६० हून अधिक युद्धे सुरू आहेत. संरक्षणदृष्ट्या प्रबळ असलेल्या राष्ट्रावर दुसरी राष्ट्रे आक्रमण करण्यास धजावत नाहीत. आपल्याला शांतता हवी आहे; पण सर्व प्रकारच्या लढाईकरिता सदैव तयार राहणे जरूरी आहे. (लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)

---

संत प्रबोधन

प्रा. डॉ. हरिदास आखरे

# अध्यात्मशास्त्रातील ज्ञानी भक्तांची लक्षणे

अध्यात्म विचारांमध्ये नवविधा भक्तीचे प्रकार सर्वश्रुत आहेत. ही नवविधा भक्ती भक्तगण वेगवेगळ्या पद्धतीने आचरण करतात. संत ज्ञानेश्वरांनी भक्ती व भक्तीचे प्रकार 'ज्ञानेश्वरी'मध्ये वर्णन केले आहेत. संत तुकारामांनी भक्तीचे श्रेष्ठत्व व खरा भक्त कोण याबद्दल अभंग गाथेमध्ये ऊहापोह केला आहे.

**नको ब्रह्मज्ञान आत्मस्थिती भाव। मी भक्त तु देव ऐसे करी ।। दावी रूप मज गोपिकारमणा। ठेवीण चरणावरी माथा ।। पाहोनी श्रीमुख देईन आलिंगन। जीवे निंबलोण उतरीन।। पुसता सांगेन हितगुज मात। बैसोनी एकांत सुखगोष्टी । तुका म्हणे यासी न लावी उशीर। माझे अभ्यंतर जाणोनिया ।।** (तु. गा. १६४७)



भक्तीत प्रेमाशिवाय जीवनात चिरंतन समाधान प्राप्त होणार नाही. भक्तिप्रेमाशिवाय ज्ञानसुद्धा व्यर्थ आहे. यावरून भक्तीचे श्रेष्ठत्व स्पष्ट होते. संत एकनाथांनी भक्तिप्रेमाची वैशिष्ट्ये सांगितली आहेत. **भक्ती प्रेमावीण ज्ञान नको देवा। अभिमान नित्य नवा तयामाजी।। प्रेमसुख देई प्रेमसुख देई। प्रेमेविण नाही समाधान।। रांडवेने जेवि शृंगार पै केला। प्रेमेविण नाही ज्ञानी तैसा।। एका जनार्दनी प्रेम अती गोड। अनुभवी सुरवाड जाणतील।।** भक्तीवाचून आत्मज्ञान, आत्मसाक्षात्कार प्राप्त होऊ शकत नाही. भवभय, जन्म-मृत्यू, जरा-व्याधी व दुःख या संसारातील सर्व आपत्ती भक्तीने नष्ट होतात. कारण आत्मदर्शन भक्तिसाधनेने मिळते. भक्तीशिवाय सर्व संसारतापातून मुक्ती मिळू शकत नाही.

**भक्तिप्रेमाचे स्वरूप जाणे भक्तीचा जिव्हाळा। तोचि देवाचा पुतळा।। आणिक नये माझ्या मना। हो का पंडित शहाणा।। नामरूपी जडले चित्त। त्याचा मी अंकित।। तुका म्हणे नवविध भक्ती। जाणे तोचि शुद्ध।।** (तु. गा. २०५४) संत तुकाराम महाराज म्हणतात, पंडित असो वा शहाणा, तो देवाच्या संगतीत बसू शकत नाही. मनामध्ये भक्तीचा जिव्हाळा पाहिजे. भगवंताचे ठायी एकनिष्ठा पाहिजे. तीच भक्ती खरी व भक्तही खरा.

अ) भक्तांचे विविध प्रकार व भक्तीची आवश्यकता **चतुर्विधा भजन्ते मा जनाः सुकृतिनोऽर्जुन । आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ।।** (गीता-७/१६) भगवान श्रीकृष्णांनी भक्तांचे चार प्रकार सांगितले आहेत. १) आर्त २) जिज्ञासू ३) अर्थार्थी ज्ञानी. संत ज्ञानेश्वरांनीसुद्धा भक्तांचे चार प्रकार सांगितले. **तो पहिला आर्तु म्हणिजे। दुसरा जिज्ञासु बोलिजे। तिजा अर्थार्थी जाणिजे। ज्ञानिया चौथा।। तेथ आर्तु तो आर्तीचेनि व्याजे। जिज्ञासु तो जाणावयाचिलागी भजे। तिजेनि तेणे इच्छिजे। अर्थसिद्धी।। मग चौथियाचा ठायी। काहिची करणे नाही।। म्हणोनि भक्तु एक पाही। ज्ञानिया जो।।** (ज्ञाने.- ७/१०९-१११) १) आर्तभक्त - संकटकाळी देवाचे स्मरण करणारा. २) जिज्ञासू भक्त- तत्त्व जाणू इच्छिणारा. ३) अर्थार्थी भक्त धनसंपत्तीची कामना करणारा. ४) ज्ञानी- विश्वव्यापक परमतत्त्व जाणणारा. संत एकनाथसुद्धा भक्तांचे प्रकार व भक्तीची आवश्यकता आपल्या भागवतात विशद करतात. संत एकनाथ आर्त, जिज्ञासू, अथार्थी व ज्ञानी यांचे प्रत्येकी दोन प्रकार मांडतात.

१) लौकिक आर्त- **रोगिया नाव आर्तता । हे व्याख्यान नव्हे परमार्थां। भगवतप्राप्तीची तीव्र व्यथा ते आर्तता ।।** (ए. भा. १९/२७२) उदा. द्रौपदी, गजेंद्र हे संकटात सापडलेले असताना त्यांनी देवाचा आर्त धावा केला. द्रौपदीचा धावा संत तुकारामांनी अत्यंत कळवळीने मांडला आहे. **कोठे गुंतलासी द्वारकेच्या राया । वेळ का सखया लावियेला ।।** (तु. गा. १६१) संकटकाळात ईश्वराचा धावा करणाऱ्या भक्तास लौकिक आर्त भक्त म्हणतात. २) पारमार्थिक आर्त अंतःकरणामध्ये केवळ परमेश्वराची व्यथा उत्पन्न होणे याला परमार्थिक आर्तभक्त म्हणतात. जो भगवंताच्या प्राप्तीसाठी कड्यावरून उडी घ्यायलासुद्धा मागे-पुढे पाहत नाही किंवा जळत्या आगीत धावून जातो तो पारमार्थिक आर्त होय. तुकाराम आर्त भक्तांचे प्रतिनिधी आहेत. त्याची आर्त हाक त्याच्याच शब्दातआर्त **माझ्या बहुपोटी। व्हावी भेटी पायांशी।। यासी तुम्ही कृपावंता। माझी चिंता असो।। तळमळ करी चित्त। अखंडित वियोगे।। तुका म्हणे पंढरीनाथा। जाणे वेथा अंतरिची।।** (तु. गा. ३२३६) **झुरोनी पांजरा होऊ पाहे आता। येई पंढरीनाथा भेटावया।।** (तु. गा. ५) अशा प्रकारची पारमार्थिक आर्तता तुकोबांनी मांडली आहे.

३) **लौकिक जिज्ञासू वेदशास्त्र जाणीव वळसा। लौकिक-जिज्ञासा त्या नाव।।** (ए.भा.१९-२७७) वेदशास्त्राच्या अर्थज्ञानसंबंधाने जी खटपट, तिला लौकिक जिज्ञासा असे नाव आहे.

४) **पारमार्थिक जिज्ञासू परब्रह्मास पोहोचावयाच्या युक्तीचा जो ठसा त्याला शुद्ध जिज्ञासा म्हणतात. ब्रह्मप्रापक युक्तीचा ठसा। या नाव शुद्ध जिज्ञासा।।** (ए. भा. १९-२७७) **तैसा प्रतिपाद्यु जो ईश्वरू। तो होवावयालागी गोचरू।। श्रुतींचा निरंतरू। अभ्यास करणे ।।** (ज्ञाने. १६/१०३) संत ज्ञानेश्वर म्हणतातआत्म साक्षात्कारासाठीच जो श्रुती, शास्त्र, वेदांचा अभ्यास करतो तो खरा पारमार्थिक जिज्ञासू होय.

५) लौकिक अर्थार्थी- केवळ पैशासाठी, धनसंपत्तीसाठी जो परमेश्वराची उपासना करतो, तो लौकिक अर्थार्थी समजावा. **अज्ञानाची भक्ती इच्छिती संपत्ती। तयाचिये चित्ती बोध कैंचा ।।** (तु. गा. २८५२) ६) पारमार्थिक अर्थार्थी प्रत्येक अर्थात परमेश्वराचेच मागणे अथवा परमेश्वर शोधणे. **सर्वार्थी मीचि शोधना अर्थना। शुद्ध अर्थार्थी या नाव जाणा।। म्हणती अर्थार्थी द्रव्यकामना । ते मंद व्याख्याना प्रवर्तती ।।** (ए. भा. १९/२७८) ७) **ज्ञानी भक्त उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम्। आस्थितःस हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिंम ।।** (गीता ७/१८) सर्व भक्त श्रेष्ठ आहेत. परंतु, त्यापैकी ज्ञानी तर माझा आत्माच मी मानतो. कारण तो मीच ब्रह्म अशा बुद्धीने परमेश्वराच्या ठिकाणी स्थिर झालेला असतो. तो ज्ञानी भक्त अत्यंत श्रेष्ठ होय. **म्हणोनि आपुलालिया हिताचेनि लोभे । मज आवडे तोही भक्त झोंबे ।। परी मीचि करी वालभे। ऐसा ज्ञानिया एकू** ।। (ज्ञाने. - ७/११९) प्रत्यक्ष मी (परमेश्वर) ज्याच्यावर प्रेम करतो, असा त्यापैकी एक ज्ञानी भक्त होय. अ) **ज्ञानी भक्तांचे श्रेष्ठत्व तेषां ज्ञानी नित्ययुक्त अभक्तिर्विशिष्यते**। (गीता ७/१७) जो भक्त नित्य व अनन्य असतो तो ज्ञानी भक्त सर्वश्रेष्ठ होय. कारण, ज्ञानी भक्ताला मी अत्यंत प्रिय आहे व तो मला अत्यंत प्रिय आहे. संत ज्ञानेश्वर म्हणतात की, ही गोष्ट शब्दांनी सांगण्यासारखी नाही. परंतु काय करावे? ही न बोलण्यासारखी गोष्ट. पण, तुला सांगितली. **हे समस्तही श्री वासुदेवो। ऐसा प्रतीतिरसाचा वोतला भावो।। म्हणोनी भक्तमाजी रावो । आणि ज्ञानिया तोचि ।।** (ज्ञाने. ७/१३६) हे संपूर्ण विश्व म्हणजे श्री वासुदेव स्वरूप आहे. अशा अनुभवरूपी रसाचा त्याचा भाव ओतलेला असतो. म्हणून ज्ञानी भक्त हा सर्व भक्तांचा राजा मानलेला आहे. **आंधळेया गरुडाचे पंख आहाती। ते कवणा उपेगा जाती।। तैसे सत्कर्माचे उपखे ठाती। ज्ञानेवीन ।।** (ज्ञाने. ९/३०६) ज्ञानाला बाजूला ठेवून होणारी भक्ती ही आंधळ्याला गरुडाचे पंख असण्यासारखे व्यर्थ आहे. त्यामुळे नेहमीच ज्ञानी भक्ताच्या भक्तीला श्रेष्ठत्व आहे.


---

सिनेजगत

देवेंद्र प्रभुणे

## 'हेचि फळ काय मम तपाला?'

# गाथा दुर्लक्षितांची, स्वातंत्र्यलढ्यातील वीरांची...!





एखाद्या इमारतीच्या सौंदर्याची ज्या वेळेस आपण स्तुती करतो, त्या वेळेस आपणास तिच्या भक्कम पायाविषयी फारशी माहिती असेलच असे नाही. तीच बाब, इमारतीच्या मागील बाजूसाठीदेखील प्रयुक्त होते. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या देदीप्यमान व रोमहर्षक इतिहासाचा धावता आढावा घेत असताना, या स्वातंत्र्यलढ्याचे तीन प्रमुख भाग आपल्या दृष्टीस पडतात. सन १८५७ ते १८८५ हा पहिला टप्पा, ज्यावेळेस भारतीय जनमानसात स्वातंत्र्याची ज्योत व ऊर्मी प्रज्वलित होऊ लागली होती. दुसरा टप्पा १८८५ ते १९२० (भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना ते लोकमान्य टिळकांचे देहावसान) आणि तिसरा टप्पा १९२० ते १९४७ भारतीय चित्रपटसृष्टीने, भारतीय स्वातंत्र्यलढ्यास प्रत्यक्षअप्रत्यक्ष रूपाने आपला हातभार लावला होता. १९१३ साली भारतीय चित्रपटसृष्टीचा प्रारंभ झाला. सुरुवातीला मूकपट व १९३१ सालापासून बोलपट या भारतीय चित्रपटसृष्टीच्या पहिल्या टप्प्यात 'कीचकवध' (या चित्रपटात लॉर्ड कर्झनला कीचक रूपात प्रस्तुत केले होते), 'स्वराज्याचे तोरण' (१९३०) असे ब्रिटिश सत्तेविरुद्ध केलेले जाणीवपूर्वक बंडखोर चित्रपट आणि 'किस्मत' (१९४३) चित्रपटातील कालजयी 'दूर हटो ए दुनियावालों हिंदुस्थान हमारा है' हे गीत ही भारतीय चित्रपटसृष्टीची स्वातंत्र्यलढ्यास झालेली मदत. १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. त्याच वेळेपासून भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील शीर्षस्थ नेत्यांना केंद्रिभूत ठेवून हिंदी चित्रपट बनण्यास प्रारंभ झाला. १९४८ चा 'शहीद' हा या मांदियाळीतील प्रथम लक्षणीय चित्रपट. १९५० साली आलेला 'समाधी' हा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महत्वाचे नेते, नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेची महती वर्णन करणारा व नेताजींना केंद्रिभूत ठेवून बनवलेला चित्रपट होता. कारणे काहीही असोत, स्वातंत्र्योत्तर भारतात स्वातंत्र्यलढ्यातील काही वीरांकडे जाणता-अजाणता दुर्लक्ष करण्यात आले.

मूलतः १९२० नंतर भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा निर्णायक टप्पा सुरू झाला आणि त्यावेळी सत्य व अहिंसा ही आयुधे घेऊन महात्मा गांधींनी त्या लढ्याला नैतिक शुचित्व व अधिष्ठान प्राप्त करून दिले. स्वाभाविकच, त्यांच्या तेजोवलयात व महिमा मंडत्वात काही नेते झाकोळले गेले, काही परिघाच्या बाहेर गेले आणि काहींकडे दुर्लक्ष झाले. यातील महत्त्वपूर्ण नाव म्हणजे सरदार भगतसिंह.. आपल्या प्राणांच्या आहुती स्वातंत्र्यवेदीवर अर्पण करणारा वीरोत्तम..! शहीद भगतसिंहांवर बनलेला पहिला चित्रपट (स्वातंत्र्योत्तर) होता तो 'शहीद-ए-आझम भगतसिंह' हा १९५४ सालचा जगदीश गौतम यांनी दिग्दर्शित केलेला व प्रेम अदीब यांनी भगतसिंहांची भूमिका साकारलेला चित्रपट. या चित्रपटात भगतसिंहांचे विपर्यस्त चित्र रंगविण्याच्या कारणास्तव या चित्रपटावर बंदी आणण्यात आली व तो आजतरी कुठेही बघण्यास उपलब्ध नाही. भगतसिंहांवर बनलेला पुढील महत्वाचा चित्रपट म्हणजे 'शहीद भगतसिंह' (१९६३) हा केदारनाथ बन्सल यांनी निर्माण केलेला चित्रपट. या चित्रपटात शम्मी कपूर यांनी भगतसिंहांची भूमिका साकारली होती. पण, भारतात अजूनही लोकप्रिय असलेला, शहीद भगतसिंह यांच्या आयुष्यावर बनलेला हिंदी चित्रपट म्हणजे 'शहीद' (१९६५) हा एस. राम शर्मा यांनी दिग्दर्शित केलेला चित्रपट. बऱ्याच अवधीनंतर, नवीन सहस्रकात अचानक, २००२२००३ साली शहीद भगतसिंह यांच्या जीवनावर अनेक हिंदी चित्रपट एकाच वेळी प्रदर्शित झाले. 'शहीद-ए-आझम', 'द लेजंड ऑफ भगतसिंग', '२३ मार्च १९३१', 'शहीद' व 'भगतसिंग' (हा चित्रपट रामानंद सागर यांनी निर्माण केला होता व तो फक्त दूरदर्शनवर प्रदर्शित झाला होता.) या चित्रपटांनी नवीन सहस्रकातील तरुणाईला शहिदांची ओळख करून दिली, हे निश्चित. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनाचा अतिशय प्रामाणिक व विस्तृत आढावा घेणारा चित्रपट होता,'बोस-दफरगॉटन हिरो' (२००४) हा श्याम बेनेगल यांनी दिग्दर्शित केलेला चित्रपट. आधारित चित्रपटात नेताजींच्या एकंदर भूमिकेचा व स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचा चांगला आढावा घेतला होता. नेताजींच्या रहस्यमय मृत्यू किंवा अज्ञातवासाची चर्चा अजूनही होत असते. त्यासंबंधी 'बोस-डेड/अलाईव्ह', 'गुमनामी' असे चित्रपट, दूरचित्रवाणी मालिका अलिकडच्या काळात चर्चेत आल्या होत्या. महात्मा गांधींना 'राष्ट्रपिता' म्हणून संबोधित करणारे प्रथम व्यक्ती नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचा व प्रखर राष्ट्रभक्तांचा यथायोग्य सन्मान झाला नाही, हे मात्र निर्विवाद..! प्रखर क्रांतिकारी मास्टर सूर्या सेन (सूर्यादा) यांच्या चितगाव उठावाचे लक्षणीय चित्रण असलेले 'चितगाव' व 'खेले हम जी जानसे' हे बंगालच्या क्रांतिकारी चळवळीचे मूल्यमापन करणारे चित्रपट, दुर्दैवाने अखिल भारतीय स्तरावर आपला प्रभाव पाडू शकले नाहीत. एकंदरीतच भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील सशस्त्र क्रांतिकारकांचे योगदान दुर्लक्षितच राहिले. 'भारताचे लोहपुरुष' असे संबोधल्या गेलेले सरदार वल्लभभाई पटेल यांचे भारतीय स्वातंत्र्यानंतर लगेचच म्हणजे १९५० साली झालेले निधन, स्वतंत्र भारताची पुढील वाटचाल बोटचेप्या धोरणांकडे घेऊन गेली, असा साधार निष्कर्ष बहुतांश आधुनिक इतिहासकारांनी काढला आहे. बारडोलीच्या सत्याग्रहात उदयाला आलेले सरदार वल्लभभाई पटेल हे अतिशय खंबीर, वास्तवदर्शी व दूरदृष्टीचे होते. महात्मा गांधींच्या नेतृत्वातील स्वातंत्र्यलढ्यात त्यांच्या योगदानाविषयी हेतुपुरस्सर दुर्लक्ष करण्यात आले, असाही एक मतप्रवाह आहे. १९९३ साली आलेला 'सरदार' हा केतन मेहता दिग्दर्शित अप्रतिम चित्रपट सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्यकर्तृत्वाचा यथोचित परामर्ष घेतो. परेश रावल यांनी सरदारांची भूमिका अप्रतिम साकारली होती. १९८२ साली आलेल्या 'गांधी' चित्रपटात सईद जाफरी यांनी सरदारांची भूमिका प्रामाणिकपणे निभावली होती. परंतु पटकथेतच सरदार वल्लभभाई पटेल यांना दुय्यम स्थान देण्यात आले होते.

(पान ६ वर)

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

# पद्धत कामाची; ठरवते व्याप्ती यशाची!



**१.** कौरव-पांडवांचे गुरू द्रोणाचार्य यांनी एकदा शिष्यांची परीक्षा घेण्यासाठी क्रमाक्रमाने प्रत्येकाला बोलावले व झाडावर बसलेल्या पक्ष्याच्या डोळ्यावर फक्त नेम धरायला सांगितला. मात्र, पक्ष्यावर नेम धरलेल्या अवस्थेत तसेच थांबायला सांगून द्रोणाचार्य प्रत्येकाला विचारत, 'तुला आता काय दिसते आहे?' प्रत्येकाने वेगवेगळी उत्तरे दिली. मात्र, एकटा अर्जुन म्हणाला की, ''गुरुदेव, मला फक्त पक्ष्याचा डोळाच दिसतोय.'' या उत्तराने द्रोणाचार्य खूश होऊन अर्जुनाला म्हणाले, 'सर्वांमध्ये तू एकटाच धनुर्विद्येचे पुढचे प्रशिक्षण घेण्यासाठी लायक आहेस;' आणि पुढे अर्जुन सर्वश्रेष्ठ धनुर्धर म्हणून विख्यात झाला. ही गोष्ट आपल्याला नवीन नाही. नेम धरण्यासाठी मन व शरीर एकत्रितपणे केंद्रित करण्याची क्षमता प्रत्येकात असूनही त्या धनुर्विद्येच्या परीक्षेच्या वेळी मात्र फक्त अर्जुनानेच त्याच्या क्षमतांचा सुयोग्य वापर केला, इतरांनी नाही. असे का...?

**२.** ''अभिनंदन अनिल! या नोकरीसाठी तुझी निवड झालीय!'' हे ऐकून अनिलला आनंद झाला; थोडं आश्चर्य पण वाटलं. कारण इंटरव्ह्यूसाठी आलेले अनेक जण त्याच्यापेक्षा जास्त अनुभवी आणि शिकलेले होते. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव पाहून मुलाखत घेणारे सर म्हणाले, ''खरी कसोटी या केबिनमध्ये नाहीतर या केबिनच्या मार्गावरच घेण्यात आली. आवेदकांची कार्यतत्परता व समाजहितासाठी जागरूकता तपासण्यासाठी आम्ही ऑफिसमधील जागोजागी लावलेल्या कॅमेऱ्यांची मदत घेतली. वाटेवरील रिकाम्या खोलीत व लॉबीमधील लाईट, पंखे गरज नसताना मुद्दाम सुरू ठेवले. इतरांनी त्याकडे दुर्लक्ष केले. तुम्ही मात्र ते लाईट आणि पंखे बंद केले व नंतरच पुढे गेलात. मुलाखतीत तुम्ही योग्य उत्तरे दिलीत.'' हे ऐकून अनिलने मनोमन वडिलांना धन्यवाद दिला. कारण बालपणापासूनच त्याच्या वडिलांनी त्याला वेळोवेळी लाईट, पंखा, नळाची तोटी, मोबाईल चार्ज झाल्यावर त्याची बटण नीट बंद करणे, वीज-पाणी जपून वापरण्याचे वळण लावले होते. त्यांच्या या सुजाण पालकत्वामुळेच अनिलच्या जीवन पद्धतीमध्ये या गोष्टींचे महत्त्व ठसले होते. आणि आज त्याचमुळे त्याला व्यवस्थापक म्हणून नोकरी मिळाली.

**३.** जेवताना जोरात ठसका आला, तशी आई म्हणाली, ''संजय, सावकाश जेव! असा घाईघाईने का खातोस वाघ मागे लागल्यासारखा?'' पूर्वी संजय एका कंपनीत विक्री प्रतिनिधी म्हणून काम करायचा. 'सेल्स-कॉल' व 'टार्गेट' पूर्ण करण्याचा त्याला नेहमीच तणाव असायचा. त्यामुळे जेवताना व रस्त्यावर गाडी चालवताना घाई करायची त्याला सवय जडली होती. पुढे तणाव एवढा वाढला की, एक दिवस त्याचा अपघात झाला. जीव वाचला, पण एक महिना रुग्णालयात राहावे लागले. मग घरच्यांच्या सल्ल्याने आता पुढे काय करायचे म्हणून करीअर कौन्सेलिंग करायला त्याला माझ्याकडे आणले. सर्व टेस्ट केल्यावर, त्याचे शिक्षण, वय व क्षमता लक्षात घेऊन त्याला नोकरी सोडून एमबीए कॉलेजमध्ये लेक्चरर व ट्रेनिंग-प्लेसमेंट ऑफिसर म्हणून नोकरी शोधण्यास सांगितले. सुदैवाने तशी नोकरी त्याला मिळाली. आता त्याला सेल्स-टार्गेट व दिवसभर फिरण्याची गरज राहिली नाही. पण तरीही जुन्या सवयी अजून सुटल्या नसल्यामुळे जेवताना घास नीट न चावता घाईघाईने खाणे व रस्त्यावर गाडी वेगात चालवण्याची सवय मात्र कायम होती. प्रात:विधी, व्यायाम, आंघोळ, जेवण, दैनंदिन कामे इत्यादी नेहमीची कार्ये करतानासुद्धा प्रत्येक कार्याची योग्य पद्धत कोणती व त्याला किती वेळ द्यावा, याचा विचार किती लोक करतात? टूथब्रशवर नेमकी किती पेस्ट आवश्यक आहे? जे लोक बिनडोकपणे टीव्हीवरील जाहिरात पाहून ब्रशच्या तंतूंच्या पूर्ण लांबीच्या एवढी पेस्ट घेतात तसेच टूथब्रश करताना सुरुवातीपासून शेवटपर्यंत पूर्ण वेळ बेसिनचा नळ सुरू ठेवतात. पाणी, वेळ व पैसा वाया घालवतात.

**४.** एका मोठ्या कारखान्यात जमिनीच्या खाली ४० फूट खोल खड्ड्यात एक अजस्त्र हत्तीच्या आकाराचे वजनदार यंत्र बसवायचे होते. त्या काळात आपण आता पाहतो तशा मोठ्या क्रेन उपलब्ध नव्हत्या. खड्ड्याच्या जवळ ते यंत्र ठेवलेले होते; पण ४० फूट खोल खड्ड्यात ते कसे उतरवावे, तेच कुणाला कळत नव्हते. तिथल्या अधिकाऱ्यांनी मग अशा प्रकारचे काम करणाऱ्या कंपन्यांना संपर्क केला, पण तेवढ्या कामासाठी अव्वाच्या सव्वा रक्कम ते मागत होते. उशीर होत होता तसा प्रत्येक दिवसाला कारखान्याचा तोटा वाढत चालला होता. त्याच कारखान्यात नवीनच कामाला लागलेला एक हुशार कामगार हे सगळे शांतपणे पाहात होता. आपण फक्त बोलून वरिष्ठ ऐकणार नाहीत म्हणून त्याने हिंमत करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना व मालकाला पत्र लिहून कळविले की, बाहेरची कंपनी मागते आहे त्याच्या फक्त सहा टक्के खर्चात व तीन तासात तो हे काम करून देऊ शकतो. आधी अनेक लोकांना यावर विश्वास ठेवणे कठीण होते. कारण जे मोठ्या अभियंत्यांना जमले नाही ते एक साधा कामगार कसं काय करणार? अनेकांनी त्याच्याकडून तो नेमके काय करणार ते त्याला विचारायचा प्रयत्न केला; पण त्याने काही सांगितले नाही. शेवटी बाहेरील कंपनीच्या मागणीच्या पाच टक्के रक्कम हा त्याचा मेहताना व एक टक्का आवश्यक साहित्यासाठी खर्च देण्याचे लेखी हमीपत्र त्याला देण्यात आले.

कारखान्यात सगळ्यांनाच उत्कंठा लागली की तो काय करणार? त्याने आधी तो पूर्ण खड्डा बर्फाच्या मोठ्या, जाड व कडक लाद्यांनी भरून टाकला. नंतर इतर कामगारांच्या मदतीने लोखंडी ओंडक्यांवर ते अजस्त्र मशीन ढकलत त्या बर्फावर योग्य ठिकाणी आणले व वरून गरम पाण्याची फवारणी केली. जसा बर्फ विरघळत गेला तसे ते यंत्र आपोआप खाली जात गेले. आतील पाणी पंपाने ओढून बाहेर टाकण्यात आले. प्रत्यक्षात फक्त दोन तासातच ते यंत्र जेथे हवे तेथे स्थापित करता आले. जे नवख्या कामगाराला जमले ते अनुभवी अभियंत्यांना का जमले नाही? कारण त्यांच्या आतापर्यंतच्या शिक्षण व अनुभवात एका ठरावीक साच्यातूनच विचार करण्याची पद्धत त्यांच्या मनाने विकसित केली होती. एवढे मोठे यंत्र उचलूनच खड्ड्यात उतरवावे लागणार, त्यासाठी क्रेनच लागणार, अशी विचारांची सुरुवात करून, त्यासाठी तेवढ्या क्षमतेची क्रेन कुठे मिळेल? ती कुठे ठेवावी लागेल? असे प्रश्नच त्यांच्या मनाच्या कक्षेत येत होते. मात्र, नवीन कामगाराने नेमके काय साध्य करायचे आहे व त्यासाठी कोणकोणते मार्ग असू शकतात? त्यात कोणत्या अडचणी येऊ शकतात? त्यावर कोणते उपाय उपलब्ध आहेत, असा व्यापक व चौकटीच्या बाहेरचा विचार केला आणि खर्च व वेळ वाचवणारा उपाय शोधून काढला. इंग्रजीत म्हणतात ना- Winners Don't Do Different Things... They Do the Things Differently! म्हणजे जे जिंकतात ते खूप साऱ्या वेगवेगळ्या गोष्टी करत नसतात; तर जे करतात ते वेगळ्या पण परिणामकारक पद्धतीने करतात! तसेच How Much Weight You Lift is Not Important, but How You Lift That Weight Is Important ! म्हणजे तुम्ही किती वजन उचलता ते महत्त्वाचे नसून, कोणते वजन तुम्ही कसे उचलता म्हणजे कोणत्या पद्धतीने उचलता, ते महत्त्वाचे असते. जबाबदारी छोटी असो किंवा मोठी, तुम्ही ती कशी किंवा कोणत्या पद्धतीने निभावता ते महत्त्वाचे असतं.

**कार्य करण्याची पद्धत, सवय किंवा मानसिकता कशी तयार होते ?**

बालपणापासूनच संपर्कातील लोकांचा परिणाम आपल्यावर होत असतो. फायदा-तोटा, सुख-दु:ख, आवड- नावड, योग्यअयोग्य, सोय-गैरसोय, स्त्री-पुरुष, आपला-परका, चांगला- वाईट, तातडीचं आहे की नाही, गरज किती? या सर्व तुलना करून कुणाला, कशाला, केव्हा, कशासाठी प्राधान्य, महत्त्व द्यायचं त्याची प्राथमिकता आपल्या मनात आधीच तयार असू शकते. या मानसिकतेनुसार, आपला हेतू ठरून त्यानुसार आपल्या सवयी व काम करण्याच्या पद्धती नकळत तयार होतात. मात्र, चांगल्या सवयी, पद्धती अंगीकारण्यासाठी योजनाबद्ध सातत्याची गरज असते. सोबतचा चार्ट बघा.

यातून शिकायचे काय? यश प्राप्त करण्यासाठी, आपण स्वीकारलेल्या कामावर पूर्णशक्तिनिशी केंद्रित होण्याची आपल्याला आवश्यकता असते. प्रत्यक्षात आपले मन त्या कार्यावर पूर्ण केंद्रित असल्याशिवाय आपले शरीर व इंद्रिय त्या विशिष्ट कार्यावर पूर्णपणे केंद्रित होऊ शकत नाही आणि म्हणूनच स्वीकारलेल्या कार्यात ज्यांचे मन व शरीराच्या सर्व शक्ती केंद्रित असतील फक्त तेच यशस्वी होतात. विचार करण्याची पद्धत, स्वीकारलेल्या किंवा देण्यात आलेल्या कामातील आवड, उत्सुकता, उत्साह, मानसिकता या सगळ्यांची जोड योग्य प्रमाणात यशासाठी आवश्यक असते. आपले शरीर व इंद्रिये मनाची आज्ञा पाळतात. पण जर मनातच त्या कामाचा पुरेसा उत्साह नसेल तर अपुऱ्या जाणिवेमुळे किंवा अयोग्य मानसिकतेमुळे, शारीरिक व मानसिक क्षमता असूनही

### पद्धत किंवा सवय कशी तयार होते?

**१.** परिपक्वता, क्षमता, ज्ञान, सुख-दु:खाचा अनुभव यावरून

↓

**२.** व्यक्ती, परिस्थिती, घटना, वस्तू, काम, जग... या गोष्टींकडे पाहण्याचा दृष्टीकोन/हेतू ठरतो.

↓


**३.** दृष्टिकोन किंवा हेतूनुसार वरील गोष्टींची वर्गवारी ठरून... कार्य करण्याची प्राथमिकता ठरते.

↓

**४.** नेहमी त्याच पद्धतीने विचार व कृती केल्यामुळे कार्य करण्याची पद्धत किंवा सवय तयार होते. त्यानुसार यश किंवा अपयशाची व्याप्ती ठरते!

आपण ते कार्य नीट पार पाडत नाही आणि एकदा याच प्रमाणे विचार करण्याची पद्धत आपण अंगीकारली तर प्रत्येकच गोष्टीत आपण अर्धवट लक्ष देऊन, अपुऱ्या उत्साहाने व कामचलाऊ पद्धतीनेच सर्व कामे करण्याची चुकीची सवय लागते. अशी काम करण्याची पद्धत व सवय ९५ टक्के लोकांना असते, असे आमचे संशोधन सांगते. हातातले काम लवकर पूर्ण करून मोकळे होण्याची त्यांची इच्छा व घाई असते. त्या कामात कुणाला मोबाईल मनोरंजनाची घाई असते तर कुणाला आरामाची! गुंतून पडायची इच्छा नसते. बरं, मोकळे होऊन काय करायचं तेसुद्धा मनात स्पष्ट नसतं. तरीही इतरांपेक्षा आपण जास्त प्रसिद्ध व्हावं, श्रीमंत व्हावं, वेगळं असावं अशी अनेकांची इच्छा असते.

ध्येयपूर्तीच्या मार्गातील अडचणींना तोंड देतानासुद्धा अनेक लोकांचा उत्साह, चिकाटी व परिश्रम कमी पडतात. त्यामुळे हे आरंभशूर हातातली कामे, शिक्षण, ध्येय अर्धवट सोडून देतात. त्यांचे प्रयत्न हळूहळू कमजोर पडत जाताना आपण पाहतो. कुठल्याही ध्येयपूर्तीसाठी मन व शरीराच्या पूर्ण शक्ती केंद्रित करण्याची सवय लावावी लागते. आपोआप होत नाही. कुठल्याही कार्यात सातत्य राखणे खूप कठीण असतं. त्यासाठी आधी विचारांची तशी पद्धत विकसित करून नेहमी सातत्याने राबवून तशा सुयोग्य पद्धतीनेच काम करण्याची सवय तयार करावी लागते. **उद्यमः साहसं धैर्यं, बुद्धिः शक्तिः पराक्रमः। षडेते यत्र वर्तन्ते, तत्र दैवं सहायकृत् ।।** म्हणजे उद्योग, साहस, धैर्य, बुद्धी, शरीरसामर्थ्य व शौर्य या सहा गोष्टी ज्या ठिकाणी माणसात एकत्र असतात, त्यालाच देव मदत करतो. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## आता कैसी वारी । संसाराची ।।

मौनात करावे । हरिचे चिंतन ।।
आत्मा चिरंतन । हरिपाठी ।।१।।

देहास जडावा । सगुणाचा संग ।।
मनास सत्संग । निर्गुणाचा ।।२।।

आता रात्रंदिन । गावू गुण वाचे ।।
ज्ञाना-तुका नाचे । अभंगात ।।३।।

पाप-पुण्य काय । ठावे म्या पामरा ।।
कर्माचा पसारा । विठुवरी ।।४।।

होऊनी निस्संग आलो । तुझ्या दारी ।।
आता कैसी वारी । संसाराची ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## जागाच नाही

झाडं लावा वृक्ष लावा, लावायचे कुठे?
झाडं लावायला जागाच नाही...
पुस्तक आणा पुस्तक वाचा, ठेवायचे कुठे?
घरात पुस्तकं ठेवायला जागाच नाही...
म्हातारे बिचारे आई-वडील, राहतील कुठे
घरात राहायला त्यांना जागाच नाही...
किती अलगद काढून टाकले जीवनातून
हृदयात त्याच्या प्रेमाला जागाच नाही...
घरात निर्जीव शोभेच्या वस्तू हसत होत्या
त्यांना जागेचा प्रश्नच कधी आला नाही...
जाण असल्याशिवाय जागा मिळत नसते
आजकाल लोकांना जाणीवच नाही...

मीना खोंड

## निग्रह

आहे काय या जीवनात!
मार्ग जीवनाचा खडतर, वक्र जरी केली
मेहनत ढोर तरी यश नाही सतत शक्य
हवामान बदलवते पीकपाण्याचे चक्र विचार,
तब्येत घडवितात बदल असंख्य नाही सोडायचा
कधी प्रयत्न चुकली जर विचाराची दिशा चुकवावे
लागतात त्याचे परिणाम निरंतर सोडायचा
नाही पिच्छा ध्येयाचा किती मिळाले
यश याला नाही महत्त्व जे मिळाले त्याचा असावा
आनंद मिळवायला काय काय लागले
करायला किती पायऱ्या ओलांडाव्या लागल्या
मिळवणाराच जाणतो फक्त शेवटी आहे
काय जीवनात कष्ट, कार्य, मेहनत नि सातत्य

अशोक जोशी

अर्थोद्योग
महेश देशपांडे

# 'दूरसंचार' देणार रोजगार, अदानी गपगार!

**महागाई, दरवाढ, परकीय गुंतवणूक या नियमित विषयांपलीकडच्या काही बातम्या सरत्या काळात नजरेत भरल्या. भारतीय ग्रीसमध्ये सर्वाधिक मालमत्ता खरेदी करीत असल्याची बातमी त्यापैकी एक. मायक्रोसॉफ्ट, ॲपलपेक्षा अरामकोचा नफा जगात सर्वाधिक असल्याची वार्ताही अशीच. 'मूडीज'ने अदानींचा मूड खराब केल्याची लक्षवेधी बातमीही अशीच. दरम्यान, दूरसंचार क्षेत्रात एक लाख नवीन नोकऱ्या निर्माण होणार आहेत.**

महागाई, रिअल इस्टेट, रिझर्व्ह बँकेचे फतवे या नेहमीच्या विषयांपलीकडच्या काही बातम्या सरत्या आठवड्यामध्ये नजरेत भरल्या. त्यामुळे त्या दखलपात्र भासल्या. भारतीय मंडळी ग्रीसमध्ये सर्वाधिक मालमत्ता खरेदी करीत असल्याची माहिती अलिकडेच समोर आली. ॲपल, मायक्रोसॉफ्ट नव्हे, तर अरामकोचा नफा जगात सर्वाधिक असल्याची वार्ताही भुवया उंचावून गेली. 'मूडीज'ने अदानींचा मूड खराब केल्याची लक्षवेधी बातमी अशीच.

दरम्यान, दूरसंचार क्षेत्रात एक लाख नवीन नोकऱ्या निर्माण होणार आहेत. भारतात मालमत्तेचे दर गगनाला भिडत आहेत. देशातील टॉप पाच शहरांमध्ये घर घेण्याचा विचार केल्यास दर ऐकून चक्कर येऊ शकते; मात्र त्यानंतरही देशातील लोक केवळ भारतातच नव्हे, तर परदेशातही मोठ्या प्रमाणावर मालमत्ता खरेदी करीत आहेत. या देशातही भारतीय लोक मालमत्तेत मोठी गुंतवणूक करीत आहेत. तुर्कस्तानमध्ये जवळपास ९९ टक्के लोक इस्लाम धर्म मानतात. तिसऱ्या क्रमांकावर कॅरेबियन देश आहेत, जिथे भारतीय मालमत्तांमध्ये सर्वाधिक गुंतवणूक करतात. याशिवाय माल्टा आणि स्पेनमध्येही भारतीय मोठ्या प्रमाणावर घरे खरेदी करीत आहेत. इतर देशांमध्ये मालमत्ता खरेदी करताना गोल्डन व्हिसा हा भारतीयांचा पहिला विचार असतो. याशिवाय भारतीयांचे नेहमीच परदेशातही स्वत:चे घर असण्याला प्राधान्य असते. कोणत्याही देशाने घर खरेदी करण्याची संधी दिल्यास भारतीय तेथे गुंतवणूक करतात. ब्रिटन आणि सौदी अरेबियासारखे देश याची उत्तम उदाहरणे आहेत. सर्वसामान्य भारतीयांशिवाय बड्या स्टार्सनीही या देशांमध्ये घरे खरेदी केली आहेत. ग्रीसने २०१३ मध्ये 'गोल्डन व्हिसा प्रोग्राम' सुरू केला. यानुसार रिअल इस्टेट, सरकारी रोखे किंवा इतर मंजूर साधनांमध्ये किमान २ कोटी २१ लाख ७५ हजार २५० रुपये गुंतवणूक करणाऱ्या कोणत्याही परदेशी व्यक्तीला ग्रीक सरकार गोल्डन व्हिसा जारी करते. जगातील सर्वात जास्त नफा कमावणाऱ्या कंपन्यांची चर्चा होते, तेव्हा आपल्या मनात ॲपल आणि मायक्रोसॉफ्ट यांसारख्या कंपन्यांचे नाव येते. त्यानंतर आपण विचार करतो की, ज्या देशाची अर्थव्यवस्था मोठी, जो देश सर्वात पॉवरफूल त्याच देशाची कंपनी सर्वात जास्त नफा कमावत असेल; परंतु असे नाही. सौदी अरेबियाची अरामको ही कंपनी जगात सर्वाधिक नफा कमावणारी कंपनी आहे. तेल उत्पादन करणारी ही कंपनी सौदी अरब येथील धाहराण येथे स्थित आहे. या कंपनीने नफ्याच्या बाबतीत जगातील बड्या कंपन्यांनाही मागे टाकले आहे. ॲपल आणि मायक्रोसॉफ्टसारख्या कंपन्यादेखील याबाबत या मुस्लिम देशातील कंपनीची बरोबरी करू शकत नाहीत. 'प्रॉफीट स्टॅटिस्टक'च्या अहवालानुसार तेल आणि ऊर्जा क्षेत्रात काम करणारी सौदी अरब सरकारच्या सौदी अरामको कंपनीने २०२३ मध्ये २४७.४३ अब्ज डॉलर नका कमावला आहे. या यादीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या ॲपल कंपनीने ११४.३ अब्ज डॉलर नफा कमावला आहे.

तिसऱ्या क्रमांकावर बर्कशायर हॅथवे ही कंपनी आहे. या कंपनीने २०२३ मध्ये १००.३ अब्ज डॉलरचा नफा कमावला. या यादीत दिग्गज टेक कंपनी मायक्रोसॉफ्टचा क्रमांक चौथा आहे. मायक्रोसॉफ्टने २०२३ मध्ये ९५.०२ अब्ज डॉलर नफा कमावला आहे.

या यादीत पाचवा क्रमांक अल्फाबेट कंपनीचा आहे. गुगलची पॅरेंट कंपनी असलेल्या अल्फाबेटने २०२३ मध्ये ७८.७८ अब्ज युएस डॉलरचा नफा कमावला आहे. सौदी अरामको ही कंपनी सौदी अरब सरकारच्या मालकीची आहे. सौदीच्या अर्थव्यवस्थेचा ती कणा मानली जाते. सौदी अराम कोचे संपूर्ण नाव सौदी अरेबियन ऑईल कंपनी असे आहे. ही जगातील सर्वात मोठ्या तेल उत्पादन आणि ऊर्जा कंपन्यांपैकी एक आहे. अरामको तेल गॅस उत्पादन, संशोधन आणि वितरणाशी संबंधित कामे करते. या कंपनीचे संचालन आणि व्यवस्थापन सौदी अरब सरकार करते. २०१९ मध्ये या कंपनीचा छोटा भाग सार्वजनिक केला गेला आणि रियाद स्टॉक एक्सचेंजवर लिस्टिंग केले गेले. आजच्या तारखेला या रियाल स्टॉक एक्सचेंजमध्ये याच्या शेअरचा भाव सुमारे २७.५० सौदी अरेबियन रियाल इतका आहे. आता एक कटाक्ष अदानींच्या साम्राज्याकडे. भारतापासून अमेरिकेपर्यंत सर्वत्र गौतम अदानींसाठी वाईट बातम्या येत आहेत. आता न्यू यॉर्कमधून वाईट बातमी आली आहे.





'फिंच रेटिंग्ज'ने समूहाचे काही बाँड्स नकारात्मक श्रेणीत ठेवले आहेत. 'मूडीज'ने 'अदानी पोर्टस् अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेड', 'अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड'चे दोन मर्यादित प्रतिबंधित गट, 'अदानी ट्रान्समिशन स्टेप-वन लिमिटेड', 'अदानी ट्रान्सपोर्टेशन रिस्ट्रिक्टेड ग्रुप १' (एईएसएल आरजी १), 'अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड' आणि 'अदानी इंटरनॅशनल कंटेनर' या सातही कंपन्यांची श्रेणी घटवली आहे. 'अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड'चे अध्यक्ष गौतम अदानी आणि अनेक वरिष्ठ व्यवस्थापन अधिकाऱ्यांच्या विरोधात अमेरिकी ॲटर्नी ऑफिसच्या फौजदारी आरोपामुळे अदानी समूहाचा वित्तपुरवठा कमकुवत होऊ शकतो आणि त्याचा भांडवली खर्च वाढू शकतो, असे 'मूडीज'ने म्हटले आहे. बाजारातील वादळात अदानींनी २८८ अब्जाधीश गमावले. याव्यतिरिक्त 'फिंच'ने 'अदानी एनर्जी' आणि 'अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई'चे रेटिंग नकारात्मक वॉच लिस्टमध्ये ठेवले. 'टीमलीज सर्व्हिसेस'चे मुख्य स्ट्रॅटेजी ऑफिसर सुब्बुराथिनम पी. यांच्या मते भारतातील ब्रॉडबँड आणि 'फाईव्ह जी' नेटवर्कचा पुढील पाच वर्षांमध्ये वेगवान विस्तार होणार आहे. फायबर स्थापना, देखभाल आणि दुरुस्ती क्षेत्रात सुमारे एक लाख नवीन रोजगार निर्माण होतील. येत्या काळात भारताची दूरसंचार बाजारपेठ झपाट्याने वाढणार आहे. भारताची दूरसंचार बाजारपेठ २०२४ मध्ये ४८.६१ अब्ज डॉलरची असण्याचा अंदाज आहे. २०२९ पर्यंत ती ७६.१६ अब्ज डॉलरपर्यंत वाढू शकते. दरवर्षी ती सुमारे ९.४० टक्के दराने वाढत आहे. २०२३ पर्यंत देशभरात सुमारे सात लाख किलोमीटर ऑप्टिकल फायबर केबल्स टाकण्यात आल्यामुळे डिजिटल पायाभूत सुविधांच्या विस्तारात या यंत्रणेचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

सुब्बुराथिनम सांगतात, भारतात ब्रॉडबँड आणि 'फाईव्ह जी' नेटवर्कच्या वेगवान विस्तारामुळे फायबर ऑप्टिक तंत्रज्ञांच्या मागणीत मोठी वाढ होत आहे. आता या क्षेत्रातील रोजगाराची मागणीही वाढेल. भारतातील टेलिकॉम टॉवर्सच्या वाढीव फायबरायझेशनमुळे रोजगाराच्या अंदाजे एक लाख नवीन संधी निर्माण होऊ शकतात. सध्या भारतात 'फोर जी', 'फाईव्ह जी' आणि ब्रॉडबँड योजनांना समर्थन देण्यासाठी वेगाने वाढणाऱ्या फायबर ऑप्टिक नेटवर्कचा विस्तार करण्यात पाच लाखांहून अधिक फायबर तंत्रज्ञ कार्यरत असल्याचा अंदाज आहे. नोकियाला 'भारती एअरटेल'कडून भारतात 'फाईव्ह जी' विस्ताराचे प्रचंड मोठे कंत्राट मिळाले आहे. सुब्बुराथिनम म्हणाले की, 'फाईव्ह जी'तंत्रज्ञान २०३० पर्यंत त्याच्या शिखरावर पोहोचेल. टेलिकम्युनिकेशन, आयटी, बांधकाम आणि उत्पादन यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये फायबर तंत्रज्ञांची नियुक्ती केली जात आहे. तिथे हे व्यावसायिक विशेषत: शहरी आणि ग्रामीण भागात नेटवर्क विस्तार आणि पायाभूत सुविधा सेट अपवर काम करीत आहेत. फायबर तंत्रज्ञांचा उलाढाल दर खूपच जास्त आहे. नजिकच्या काळात फायबर अभियंते, स्पिसर्स, फायबर टर्मिनेशन इक्विपमेंट टेक्निशियन, इन्स्टॉलेशन आणि रिपेअर, फॉल्ट रिझोल्यूशन टीम्स, फायबर सेलसाईट इंजिनीअर्स आणि फील्ड टेक्निशियन यांच्या नोकऱ्या वाढतील. भारतात डिजिटल आणि टेलिकॉम पायाभूत सुविधांच्या विस्तारामुळे फायबर तंत्रज्ञांसाठी नोकरीच्या संधी वाढतील. तथापि, उच्च उलाढाल आणि पगारवाढीच्या समस्यांमुळे कर्मचाऱ्यांना ठेवणे हे आव्हान बनू शकते. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

# मर्ढेकरांची कविता: 'स्वरूप आणि संदर्भ' मधील ज्ञानात्मकता आणि वैचारिकता

साहित्य शिक्षण
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

अलीकडच्या काळातील दुर्बोध कवी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ग्रेस यांच्याबाबत येतो. ग्रेस यांचे ललित लेखन वाचले की, त्यांच्या सर्व कविता सहज समजतात. त्यांना दुर्बोध का म्हटले गेले आहे? असा प्रश्न पडतो. मर्ढेकरांनी कवितेमध्ये इंग्रजी शब्द वापरले आहेत असाही आक्षेप त्यांच्यावर घेतला गेला. त्यावेळी मर्ढेकरांवर त्या काळातील ज्या पाश्चात्य कवींचे संस्कार झाले होते, स्वतः कवी पाश्चात्य देशात जाऊन राहून आलेले होते. त्यामुळे ते स्वाभाविकही वाटते असे लेखिकेने सांगितले आहे. मर्ढेकरांची कविता स्वरूप आणि संदर्भ खंड एकमध्ये विजया राज्याध्यक्ष यांनी मर्ढेकरांच्या कविता बाबत येणाऱ्या विविध संकल्पना आणि संदर्भ यावरील भाष्य केले त्यातील ज्ञानवादी आणि वैचारिक भूमिकेसह साहित्याचा अभ्यास याबाबत आढावा त्यांनी घेतलेला आहे.

मर्ढेकरांची कविता स्वरूप आणि संदर्भ खंड एकनंतर अवघ्या दीड दोन महिन्यात खंड दोनचे प्रकाशन झाले आणि या द्विखंडाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला यातच हे दोन्ही खंड एकमेकांना पूरक आणि मर्ढेकरांच्या कवितेच्या अभ्यासाच्या दृष्टीने किती महत्त्वाचे आहेत हे आपोआप सिद्ध होते. मर्ढेकरांच्या व्यक्तिमत्व लिहिण्यासाठी विजयाराध्यक्ष यांनी कवींची रोजनिशी, त्यांच्या संपर्कातील लोकांच्या मुलाखती, त्यांच्या कुटुंबीयांच्या आणि त्यांच्या शाळा कॉलेजच्या दिवसातील मित्रांच्या मुलाखती घेतल्या आणि मर्ढेकर यांचे व्यक्तिमत्व रेखाटण्याचा प्रयत्न केला. मर्ढेकरांचे मॅट्रिक होईपर्यंतचे आयुष्य खानदेशामध्ये गेले मॅट्रिक झाल्यानंतर ते पुण्याला फर्ग्युसन कॉलेजमध्ये आले. त्यांच्या तेथील जीवनाच्या संदर्भातील नोंदी शोधण्यासाठी त्या कॉलेजची काही वार्षिके लेखिकेने पाहिली त्यातील काहीमध्ये मर्ढेकरांचे लेखन सापडले. मर्ढेकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेत असताना मर्ढेकरांचे वडील सुरुवातीला प्राथमिक शिक्षक व नंतर मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. हे लक्षात येते. १ डिसेंबर १९०९ रोजी फैजपुर या गावी जन्म झालेल्या मर्ढेकरांचे प्राथमिक शिक्षण बहाद्दरपूर, इंग्रजी तिसरीपर्यंत शिक्षण फैजपूर-सावदे आणि इंग्रजी चौथी ते सातवीपर्यंत शिक्षण धुळे येथील गरुड हायस्कूलमध्ये झाले अशा त्यांच्या प्राथमिक सातवीपर्यंतच्या शिक्षणाच्या नोंदी विजया राज्याध्यक्ष यांनी आपल्या लिखाणात नोंदवल्या आहेत. फर्ग्युसन कॉलेज आणि पुढे १९२९ मध्ये इंग्लंडच्या युनिव्हर्सिटी मध्ये त्यांनी प्रवेश केला. आयसीएसचे शिक्षण होऊन आपले कर्तृत्व सिद्ध करण्याची कारणे त्यांच्या मनात का आली असावीत? याचा उलगडा विजया राज्याध्यक्ष यांनी केला आहे. त्यांचे काका कलेक्टर असल्यामुळे त्यांच्या आई- वडिलांना त्यांच्या काकाकडून पाहिजे तसा मान मिळताना दिसत नव्हता कदाचित या ईर्षेतून आयसीएसचे आकर्षण त्यांना वाटले असावे, असे लेखिका म्हणतात.

तत्कालीन दृष्टिकोनातून ते योग्य असावे असे वाटते. मात्र तीन वेळा या परीक्षेला बसून त्यांना यश मिळाले नाही. मात्र यश मिळाले नाही तरी या परीक्षेसाठी केलेल्या अभ्यासामुळे त्यांच्या बुद्धीची कक्षा निश्चितच विस्तारली. हे सांगत असताना एखादा अभ्यास केला असता त्याची फलश्रुती आणि यश अपयश याचे मापन परीक्षेतील गुणांमध्येच होते असे नव्हे तर त्या अभ्यासामुळे तुमचे बौद्धिक क्षमता वाढते. आहे त्या अभ्यासाचा फायदा असतो. हे वर्तमान पिढीला कळले पाहिजे. चार वर्षाचे परदेश वास्तव्य संपून मायदेशी परतल्यावर इंडियन ऑडिट अँड अकाउंट ची परीक्षा देण्याचे त्यांनी ठरवले मात्र शैक्षणिक पात्रतेच्या नियमानुसार तुम्ही परीक्षेत बसण्यास पात्र नाही त्यांना कळवण्यात आले. हे विजया राज्याध्यक्ष यांनी चरित्ररेखा: सत्यकथा मे १९५६ पृष्ठ क्रमांक ५३ चा दाखला देत सांगितले आहे. १९३५ मध्ये मर्ढेकर एलफिस्टन कॉलेज ऑफ इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. मर्ढेकरांच्या एकलकोंड्या स्वभावासोबतच त्यांच्या त्या काळामध्ये बौद्धिक वरिष्ठ पणाची गुर्मी रुजलेली असावी असेही विजया राज्याध्यक्ष म्हणतात. शांताबाई बापट यांनी मर्ढेकरांनी त्यांना लग्नाबद्दल विचारल्यावर डॉक्टर पती हवा म्हणून मर्ढेकरांना नकारा दिल्याचा उल्लेख आलेला आहे. १९३४ -३५ च्या काळातही शिक्षण आणि स्थैर्य यावर प्रापंचिक बाबी ठरत होत्या, हे विजया राज्याध्यक्ष यांनी मर्ढेकरांच्या उदाहरणातून दाखवून दिले आहे. इंग्लंडमध्ये जाऊन आयसीएस परीक्षेला बसण्यासाठी काढलेले कर्ज न फिटल्यामुळे आर्थिक ताण वाढला होता. अशावेळी आजच्या काळात सामान्य कुवत असलेल्या विद्यार्थ्याकडून मोठ्या अपेक्षा ठेवत प्रसंगी कर्ज काढून त्यांना मेडिकलसारख्या फील्डमध्ये पाठवण्यासाठी अट्टाहास धरणाऱ्या पालकांची परिस्थिती कालांतराने असेच होणार हे जाणवत राहते. तांबडी माती या कादंबरीमध्ये काही पात्रे परदेशातील वास्तव्याचा अनुभव असलेली मर्ढेकरांनी दाखवली आहेत. तांबडी माती आणि पाणी या दोन्ही कादंबर्यामधून आपल्या जीवनाचा अनुभव रेखाटण्याचा प्रयत्न मर्ढेकरांनी केला आहे. मर्ढेकरांच्या जीवनातील संघर्ष भूतकाळ आणि भविष्यकाळ याच्या साशंकतेतून आला तरी तो संघर्ष बौद्धिक पातळीवरचा होता हे सांगण्यासाठी विजया राजाध्यक्ष यांनी मर्ढेकरांच्या कवितेतून




**आहे बुद्धीशी इमान। जाणे विज्ञानाची ज्ञान**
**परी कुठे तरी आन। ताण पडे**

अशी जाणीव करून दिली आहे. मर्ढेकरांच्या पत्नी हेमाबाईच्या पुढील अभ्यासासाठी परदेशी जाण्याच्या बेताला मर्ढेकरांनी मान्यता दिली नाही. मर्ढेकरांच्या मते ते स्वतः जेव्हा परदेशी गेले होते, तेव्हा मगनशेठ यांच्याकडून काढलेले कर्ज फिटेपर्यंत हेमाबाईंनी परदेशी जाऊ नये. या मुद्द्यावर पती- पत्नीमध्ये वाद निर्माण झाला आणि त्यासोबतच अपत्यहीनते मुळे दोघांमध्ये दुरावा निर्माण होऊ लागतात. त्यातच मर्ढेकरांनी आणखी कुठेतरी स्नेहबंध म्हणजे त्यांच्या कनिष्ठ सहकारी अंजना सहल यांच्याशी जुळवल्याची समजतात तो दुरावा आणखी वाढत गेला आणि १९५० मध्ये त्यांनी घटस्फोट घेतला. या बाबीचा विचार करता हेमाबाईंच्या शिक्षणापेक्षा स्वतःच्या शिक्षणाचे कर्ज फेडण्याची घाई, त्या दृष्टीने हेमाबाईंच्या शिक्षणाकडे दुय्यमपणे बा. सी. मर्ढेकर पाहत असतील का? असा प्रश्न सुद्धा उभा राहतो. अपत्यहीनता या नैसर्गिक बाबींचा दोष त्यांनी हेमाबाईकडे ढकलून घटस्फोट घेतला असेल का? असे अनेक प्रश्न उभे राहतात. आणि या प्रश्नांची उत्तरे जर होय अशी असतील तर बा. सी. मर्ढेकरसारख्या प्रतिभावंताचे पायही मातीतच होते की काय? असा विचार करावा लागतो. बा. सी. मर्ढेकर यांना स्वतःच्या विद्वत्तेचा गर्व होता असे स्पष्ट स्पष्ट उल्लेख मराठी साहित्यात सातत्याने आलेले दिसतात.

एकंदरीत साहित्य निर्मितीसाठी पुरेसा आणि पोषक अभ्यास असला पाहिजे असे मत मर्ढेकरांचे होते हे समजून घ्यावे लागते. मर्ढेकरांच्या स्थित्यंतराचा परिणाम त्यांच्या भाषेवर झाला. हे सांगत असताना मर्ढेकर जेव्हा इंग्लंडमध्ये होते केव्हा त्या भाषेचा सूक्ष्म अभ्यास त्यांनी केला, तेथून परत आल्यावर पुन्हा त्यांची नाळ मराठी भाषेची जुळली आणि त्यांनी इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषेत गल्लत होऊ दिली नाही असेही विजया राज्याध्यक्ष सांगतात. मर्ढेकरांनी इंग्रजीच्या जोडीने फ्रेंच व इटालियन या भाषांचा हे अभ्यास केला होता. तो रात्रीचा दिवस कादंबरी लिहिताना त्यात दिसून येतो. मर्ढेकर कविते सोबतच ललित लेखन आणि समीक्षा लेखन करत होते. रात्रीचा दिवस या कादंबरीमधील नायक युरोपमधून शिक्षण घेऊन आलेला असतो यावरून तो लेखक मर्ढेकरांनी स्वतःच्या परदेशात जाऊन आलेल्या अनुभवातून उभा केला असावा असे वाटते. त्याशिवाय या कादंबरीमध्ये नायक आणि रामरक्षेचे १० श्लोक पाठ केले का? असे त्याला विचारले जाते. या प्रसंगाचे मूळही मर्ढेकरांच्या वडिलांकडून त्यांना मिळालेला रामभक्तीचा संस्कार यात दडलेले असावे असे वाटते. याच कादंबरीत दिकपाल हा नायक म्हणतो त्याप्रमाणे विश्वविद्यालयीन खरं वातावरण कुठे आणि आमच्या सैनिकमधल्या मारामार्या, परीक्षक नी पुस्तक नेमण्याच्या वगैरे वगैरे कुठे? त्यासोबतच साम्य साधणारे कवितेचे उदाहरण देताना विजया राज्याध्यक्ष मर्ढेकरांची आणखी काही कविता मधील कविता क्रमांक १२ या कवितेचे उदाहरण देत म्हणतात,

**कुणी प्राध्यापक आणि अचानक**
**म्हणेल एम एसाठी क्रमिक**
**बरे नेमन्या जर पुस्तक**
**कराल जाडे जुडे, प्रकाशक,!**

साहित्यातील आशय घनता, व्यापकता, साहित्य निष्ठा इत्यादी न पाहता आजच्या काळात जात-पात कंपू इत्यादी पहात अभ्यासक्रमामध्ये साहित्य लावले जाते, असे अनुभव आपण घेतो अगदी त्याच प्रकारे मर्ढेकरांच्या काळातही होत असे. शैक्षणिक जीवन अधोगतीला चाललेले, सामाजिक जीवन विषमतेने ग्रासलेले, राजकीय जीवनावर एकाधिकारशाही या सर्वांमुळे जसा सर्वसामान्य माणूस पिचून गेला होता. या कादंबरीतील भाई कुमार हे पत्रकार आहेत तेही मर्ढेकरांप्रमाणे परदेशात जाऊन आलेले आहेत, तसेच तेराव्या प्रकरणांमध्ये आयसीएसमधल्या अधिकाऱ्याच्या उल्लेखातून मर्ढेकरही आयसीएसची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रयत्नशील होते हे लक्षात घ्यावे लागते.

पान १ वरून

## एक देश एक निवडणूक महत्त्वाचं पाऊल

मणिपूर, पंजाब, उत्तर प्रदेश, गोवा, उत्तराखंड, यांचा कार्यकाळ २ वर्षे १ महिना तर २ वर्षे ३ महिने राहू शकेल.

पुडूचेरी, पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू, आसाम, बिहार, यांचा कालावधी ३ ते साडेतीन वर्षे राहील. हे सर्व प्रत्यक्षात साध्य होईल का? हे राजकीय व व्यावहारीक दृष्ट्या परवडणारे आहे का? भारतासारख्या मोठ्या लोकशाही देशात केंद्र व राज्यांच्या एकत्रित निवडणुकीची गरज तरी आहे का? लोकशाही मजबूत करण्यासाठी एकत्रित निवडणूक हे महत्त्वाचे पाऊल आहे असे स्वत: पंतप्रधानांनी म्हटले आहे. २०२६ मध्ये पश्चिम बंगाल, तामिळनाडू, आसाम, केरळमध्ये निवडणुका होतील, त्या विधानसभांना तीनच वर्षे मिळतील.

बिहारमध्ये नोव्हेंबर २०२५ मध्ये निवडणूक आहे, तेथे विधानसभा ४ वर्षे कार्यरत राहील. १९५२ मध्ये झालेल्या निवडणुकीसाठी केवळ १० कोटी ५० लाख रु. खर्च झाला होता, २००९ मध्ये १ हजार ११९५ कोटी, २०१४ मध्ये ३९०० कोटी आणि २०२४ मध्ये १ लाख ३५ हजार कोटी खर्च झाला. निवडणुकी पूर्वी जातीगणना मागणीला जोर चढलेला आहे, त्यातून सरकार कसा मार्ग काढणार? माजी राष्ट्रपतींनी सरकारच्या एका समितीचे अध्यक्षपद स्वीकारणे कितपत योग्य आहे, असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. संसदेत एकूण ४७ राजकीय पक्ष आहेत, पैकी ३२ पक्षांनी एकत्रित निवडणुकीचे समर्थन केले आहे. पंधरा पक्षांनी विरोध केलाय.

काँग्रेस, आप, बसप, सीपीआय, सीपीआयएम, सपा, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, एआयएमआयएम, एमडीएमके, आदी पक्षांनी एकत्रित निवडणूक प्रस्तावाला विरोध केला आहे. एकत्रित निवडणुकांचे समर्थन भाजपा, शिवसेना, लोकजनशक्ती, आसाम गण परिषद, जनता दल यु, बीजू जनता दल, अण्णाद्रमुक, झारखंड स्टुटंड असो, अपना दल सोनोवाल, नॅशनल डेमॉक्रॅटिक पीपल्स पार्टी नागालँड, सिक्कीम क्रांतिकारी मोर्चा, मिझो नॅशनल फ्रंट, आदी एनडीएमधील मित्रपक्षांनी केले आहे. एकत्रित निवडणुका झाल्या तर संघराज्य पद्धतीवर प्रहार होईल व प्रादेशिक पक्षांचा संकोच होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. तसेच राज्यांच्या स्वायत्तेवर घाला घातला जाईल असेही विरोधी पक्षांनी म्हटले आहे. एकत्रित निवडणुका घेतल्याने मूलभूत हक्कांवर गदा येणार नाही, महासंघाच्या रचनेला तडा जाणार नाही, कायद्याचे कुठेही उल्लंघन होणार नाही, लोकशाही मूल्यांशी कुठेही तडजोड केली जाणार नाही, असे भाजपाने म्हटले आहे. एक देश, एक निवडणूक म्हणजे धाडसी पाऊल आहे. संसदेत सविस्तर चर्चा करून सर्व सहमतीने निर्णय घेणे म्हणजे शिवधनुष्य उचलण्यासारखे आहे. हे शिवधनुष्य मोदी सरकार नक्कीच उचलेल हे सांगण्यासाठी कोण्या ज्योतिषाची गरज नाही.

## महाकुंभ २०२५ : सर्वसिध्दिप्रदः कुंभः

सीसीटीव्ही, ड्रोन आदींचा वापर केला जाणार आहे. कुंभमेळ्यास येणाऱ्या भाविकांसाठी एक हजार महाकुंभ विशेष रेल्वेगाड्या देशाच्या विविध भागांमधून सोडण्यात येणार आहेत. रेल्वे मंत्रालयाने यासाठी आताच हेल्पलाईनची सुविधा उपलब्ध केली आहे.

प्रयागराजकडे जाणाऱ्या सर्व रेल्वेमार्गांवरील स्थानके सर्व सोयींनी युक्त राहतील, अशी व्यवस्था उभारण्यात आली आहे. तसेच, उत्तर प्रदेश परिवहन विभागाने प्रयागराजसाठी मोठ्या प्रमाणात बससेवा उपलब्ध केली आहे. प्रयागराज शहरातही पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या आहेत.

पिण्याचे पाणी, वीज, स्वच्छतागृहे, आरोग्य सेवा आदी उपलब्ध राहणार आहेत. ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग भाविक यांच्यासाठी योग्य ती व्यवस्था करण्यात आली आहे. या महाकुंभ मेळ्यामुळे रोजगारही मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणार आहे. कुंभ स्नान पर्वणीवेळी संगमस्थानी हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्याची आयोजकाची योजना आहे.

### थंडीचा ऋतू

पाल टाकून बिऱ्हाड उतरावं
तशी उतरते थंडी फिरते गावभर
गावकुसातून शिवरातून
दरी खोऱ्यातून पांदीतून थंडीचा पडतो
वेढा नदी थिजते दवाराने गवत भिजते ऊन लाजते
फुल साजते कापसाच्या नखीत थंडी करते चकित
ऊबदार कपडे लपेटून अंगाला आई शिलगवते टाकते सडा
काढते रांगोळी खळखळ रांजनातलं हसतं
पाणी शेकोटीचा धूर गप्पांचा पूर पाणवठ्यावर पोहऱ्यांची गर्दी
चोहीकडेच महामूर शिंका सर्दी ओलेतिच्या रानात रबीची पेर
थंडी आहेर गव्हासाठी धुक्याची साय
चिखल माखला पाय उसाच्या पेरावर
थंडीची जादू हिरव्या शिवारावर
थंडीचा ऋतू ओसंडून उतू पुष्टावते
शरीर पाखरे भिरभीर थडी बहरात
गावात शहरात सासूरवाशीण येते नांदून माहेरात

भानुदास धोत्रे



### सुखाचा सदरा

गढूळ मनाचा ! विसरून वाद !!
साधावा संवाद ! संध्याकाळी !!
अडकला वारा ! मेघवलयात !!
प्रार्थना रूपात ! गुंतावळी !!
गपगार झाडे ! पाखरांची गाणी !!
शिणलेली वाणी ! निजू पाहे !!
तुळशीजवळ ! लावतसे दिवा उडालेला रावा !
मध्यान्हीचा !!
आळवावा राग ! देवळाच्या पारी !!
एकटे अंधारी ! परतणे !!
सुखाचा सदरा ! लाभला कुणाला !!
मोहर मनाला ! गंधाविना !!

जयश्री दाणी

### शब्द


मला वाटते नेहमी लिहावे साधे सरळ शब्द अमृतासारखे
नको विषारी गरळ वेदनेवरी कुणाच्या शब्द माझे व्हावे
दवा अंधाराला द्यावा त्यांनी उजेडाचा अर्थ नवा
सुखाचे सुरेल गाणे शब्दामधून झरावे गुणगुणतांना त्याला
दुःख अवघे हरावे माझ्या शब्दातून यावा माणुसकीचा
दर्वळ या दुनियेला अर्पावी आपुलकीची ओंजळ

विष्णू सोळंके

पुस्तक परिक्षण
चन्द्रशेखर टिळक
भ्र. ९८२०२९२३७६

## इन्शाअल्लाह

इन्शाअल्लाह हा शब्द आपण आपल्या निधर्मी राष्ट्रात अनेकदा ऐकलेला असतो. त्या शब्दाचा नेमका अर्थ आपल्याला अनेकदा माहीत नसला तरी आपण तो अनेकदा ऐकलेला असतो. ऐकत असतो...वाचलेला असतो... वाचत असतो... त्या इन्शाअल्लाह शब्दाचा अर्थ आहे. होईल. तसेही होईल. अल्लाची मर्जी असेल तर तसे होईल. हा शब्द मी ज्या-ज्या वेळी ऐकतो-वाचतो तेव्हा दरवेळी माझ्या मनात येते की अल्लाची मर्जी असेल तर तसे होईल' म्हणताना तरच होईल असे तर सांगितले जात नाही ना? किंवा तर तसे होईल असा त्याचा अर्थ असला तरी सांगण्याचा सूर आणि स्वर तसेही होईल कदाचित असा असतो का? इन्शाअल्लाह!




आत्ता हे सगळ्याचे आठवण कारण म्हणजे मार्च २०२० मधे पहिली आवृत्ती आणि एप्रिल २०२१ मधे दुसरी आवृत्ती प्रसिध्द झालेले अभिराम भडकमकर यांचे इन्शाअल्लाह हे पुस्तक गेल्या काही दिवसांत मी पुन्हा वाचले. तसे हे पुस्तक मी प्रकाशित झाल्याझाल्याच वाचले होते. आता महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांच्या काळात मराठा आरक्षण, लाडकी बहीण योजना, एक हैं तो सेफ हैं, बटेंगे तो कटेंगे पडघम जसे घुमायला लागले तेव्हा किरण ठेंगडी यांचा वजीर हा सिनेमा, ऋषी कपूरचा मूल्क 'हा सिनेमा आणि अभिराम भडकमकर यांचे इन्शाअल्लाह हे पुस्तक फार आठवायला लागले. त्यातून हे पुस्तक पुन्हा वाचले. असे वाचताना आणि आता हे लिहिताना माझ्या व्यावसायिक जीवनात अगदी जीवावर बेतले असे जे अनुभव मी घेतले किंवा मला घ्यावे लागले तेही कुठेतरी नक्कीच मनात होते. अगदी पहिल्यांदाच स्पष्ट करतो की, हे लेखन म्हणजे ना परिचय, ना परीक्षण; निव्वळ प्रकटीकरण असे आहे.

### याची कारणे दोन...

मार्च २०20 मधे पहिली आणि एप्रिल २०२१ मधे दुसरी आवृत्ती प्रकाशित झालेल्या पुस्तकाबाबत २०२४ हे वर्ष संपत आलेले असताना लिहिताना कसे म्हणू की हे त्या पुस्तकाचा परिचय आहे? हे परीक्षण आहे असे म्हणायचे तर कोणत्याही गोष्टीचे परीक्षण करणाऱ्या व्यक्तीला त्या विषयाबद्दल आत्मियता हवी आणि त्याचवेळी विचार व मांडणी याबाबत तटस्थता हवी.

एकंदरीतच पुस्तक हा विषय आणि त्यातही या पुस्तकाचा विषय याबाबत मला आत्मियता जरूर आहे; पण अनुभव, अगदी स्वानुभव आणि काही ग्रह व पूर्वग्रह यामुळे तटस्थता असेल का याबाबत माझा मीच साशंक आहे. आणि तसेही आता या पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रकाशित होऊन ४ वर्षाचा काळ उलटून गेला आहे. सर्वार्थाने या विषयाच्या पुलावरून आणि पुलाखालूनही बरेच पाणी दरम्यानच्या काळात वाहून गेले आहे. म्हणून... ना परिचय, ना परीक्षण; निव्वळ प्रकटीकरण, असे म्हणले. आज इन्शाअल्लाह हे पुस्तक पुन्हा आठवण्याचे किंवा वाचण्याचे कारण म्हणजे या पुस्तकातला पुरोभ्रमी हा शब्द. पुरोगामी हा शब्द महाराष्ट्राच्या राजकारणात आणि समाजकारणात नेहमीच प्रचलीत असतो. या शब्दाची व्याख्या करताना भडकमकर सर त्याला पर्यायी शब्द म्हणून पुरोभ्रमी हा चपखल शब्द या पुस्तकात एके ठिकाणी वापरतात. एकंदरीतच, अभिराम भडकमकर यांच्या पुस्तकात असे चपखल शब्द अनेकदा येतात... त्यांच्या सीता पुस्तकात असेच निर्णयभय आणि भ्रमास्त्र असे शब्द येतातच की! इन्शाअल्लाह हे पुस्तक आता पुन्हा वाचत असताना (आणि त्याआधी नुकतेच त्यांचेच सीता हे पुस्तक वाचलेलं असल्याने ) पटकन जाणवले की अभिराम भडकमकर लेखक म्हणून त्यांच्या वेगवेगळ्या पुस्तकात वेगवेगळ्या शब्दांचा वेध घेत राहतात.सीता या त्यांच्या पुस्तकात वेगळा हा शब्द तसा होता.त्यांच्याच शब्दात सांगायचे तर सीतामधे कैकयीचे रणांगण वेगळेच होते; तर, सीतेचा डोहच वेगळा होता! तर इन्शाअल्लाह या पुस्तकात आकाश तसे वेगळे आहे. गल्लीतील धुरिणांचा विरोध झुगारत रक्तदान करणाऱ्या मुस्लिम महिलेला त्या मांडवाच्या फटीतून आकाश दिसत राहते आणि अभिराम भडकमकर लिहून जातात. तिचे आकाश तिच्याकडे बघून तिला खुणावत होते. या पुस्तकाचा नायक झुल्फी आग्र्याला ताजमहाल पाहताना विचार करत राहतो. इथले आकाशच उंच आहे की काय ही दोन्हीं वेळची आकाश नेहमीच्या घिसापिट्या sky is the limit ची पार ऐशी की तैशी करून टाकतात. असे नेहमीच्या शब्दातून वेगळेच संदर्भ, संपर्क, संबंध, संगत, संवाद सुचवत राहणारे अभिराम भडकमकर यांचें इंशाअल्लाह हे पुस्तक सलीम जावेदच्या सिनेमातून मोठी होत गेलेल्या माझ्या पिढीला सर्वज्ञात असणाऱ्या हिंदु-मुस्लिम संबंधाचे वेगळेच मूल्यमापन करायला भाग पाडते हे नक्की!

अशी या पुस्तकातील काही वाक्ये वानगी दाखल....

१. मुसलमानात एक आंबेडकर जन्मायला हवे होते.

२. फरमान आहे म्हणले की विषय संपतो.

३. यार, इन्सान हैं हम; सिर्फ व्होट बँक नहीं

४. नेमके आमचे शत्रू कोण? गरीबी, बेकारी, अशिक्षितपणा हे आमचे शत्रू आहेत रे!

५. नैराश्याच्या भांडवलावरच तर राजकारण होते.

६. हिंदु परीघ ओलांडून मुस्लिम वेस लागली की विज्ञानाचे, बुद्धीप्रामाण्याचे नियम बावचळून उभे राहतात.

### आणि अशी अनेक.....

एकंदरीतच धर्माधिष्ठित संघटीतपणा, त्याचे गुण- अवगुण, कारण-परिणाम संबंध हा या पुस्तकाचा गाभा आहे. त्याचे नेमकेपण अभिराम भडकमकर यांच्या इन्शाअल्लाह या पुस्तकातील एका प्रसांगातल्या दोन वाक्यात मार्मिकपणे येते. अभिराम भडकमकर असे लिहितात. मोहब्बत पेक्षा डरच माणसाला एकत्र आणते. पण भीतीने एकत्र आलेला समाज हे काही चांगले चित्र नाही. हे पुस्तक दोन्हींवेळा वाचताना या प्रसंगाशी आलो की मला पु. ल. देशपांडे यांच्या वंगचित्रे या पुस्तकाची फार आठवण आली. तिथे पु. ल. देशपांडे म्हणतात. भयभीत माणूस एकवेळ एखाद्याचा खून करु शकेल; पण तो मनमोकळेपणाने गाऊ शकणार नाही. तसे मराठीतच असणाऱ्या या पुस्तकात कोल्हापूरच्या बागवानी बोलीभाषेचा उपयोग केला आहे. त्याने एक वेगळीच खुमारी येते. ना घेणं, ना देणं; बत्ती धरून थांबणे असे नाहीतर कुठे वाचणार?

### अजून एक....

हे पुस्तक वाचत असताना मला प्रा. वसंत कानेटकर यांच्या गाठ आहे माझ्याशी या जुन्या नाटकाची खूप आठवण येत होती. प्रा. मधुकर तोरडमल, अरुण सरनाईक आणि वंदना गुप्ते भूमिका साकारत असणाऱ्या या नाटकाचा विषय पारधी समाजावर होणाऱ्या एका खटल्याचा होता. हे पुस्तक धार्मिक दंगलीच्या निमित्ताने उलगडत जाते. इथे हे साम्य संपते. अर्थात नाटकाचा संहिता म्हणून असणारा छोटा जीव आणि तुलनेने लवचिक आकाराची मुभा असणारा कादंबरी हा साहित्य प्रकार याची तुलना करणे कितपत योग्य आहे हा प्रश्न आहेच. त्यातही त्या नाटकाचे लेखक प्रा. वसंत कानेटकर आणि या कादंबरीचे लेखक अभिराम भडकमकर हे लेखकांच्या, अगदी नाटककारच्याही दोन वेगवेगळ्या पिढीचे प्रतिनिधित्व करतात हे निश्चितच! या पुस्तकाचा खारा मर्मभेदी बिंदू एका वाक्यात सांगायचा झाला तर याच पुस्तकातील वाक्याचा आधार घेता येईल. घरच्यांना वाईट वाटेल इतके ताणायचे नाही आणि आपली तत्व निकालातच निघतील इतके वाकायचेही नाही. इन्शाअल्लाह या शब्दाचा अर्थ अशावेळी तथास्तु असावा असे वाटायला लागते.

महाराष्ट्रात अनेक राममंदिरे आहेत, अनेक गावांमध्ये श्रीराम रथोत्सवाची परंपरा आहे. त्यातील अत्यंत प्रमुख अशा मंदिरांमध्ये समर्थ रामदास स्थापित चाफळ व सज्जनगडावरील राममंदिरे असून त्याशिवाय फलटणचे सरदार राजे नाईक निंबाळकर आणि गोंदवले येथील नामयोगी ब्रह्मचैतन्यमहाराज स्थापित राममंदिर, थोरले राममंदिर, धाकटे राममंदिर भाविक भक्तांची श्रद्धास्थाने आहेत. खरं तर हा मोठ्या ग्रंथाचा विषय आहे पण लेखाच्या मर्यादेत त्या मंदिरांचा अल्पपरिचय करून घेऊ. जिज्ञासूंनी या मंदिरांना भेटी देऊन भक्ती व ज्ञानाचा आनंद घ्यावा.

लेखांक ४९

# संत समर्थ रामदासस्वामी स्थापित चाफळचे राम मंदिर

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५



**आमुचे कुळी रघुनाथ।**
**रघुनाथे आमुचा परमार्थ।**
**जो समर्थांचा समर्थ।**
**देवा सोडविता।।**

महाराष्ट्रात श्रीराम वास्तव्याने पावन झालेल्या भूमीवरील 'नाशिकचे काळाराम मंदिर' आणि 'रामटेकचे राम सीता गड मंदिर' यानंतरचे प्रमुख राममंदिर म्हणजे थोर रामभक्त संत समर्थ रामदासस्वामी स्थापित 'चाफळ' चे 'राम मंदिर' होय. सकल मराठी संतांनी श्रीरामनामाचा अगाध-अनंत महिमा गात रामोपासना केली पण संत एकनाथ आणि समर्थ रामदास या दोघांनी रामकथेकडे उपासनेबरोबरच राष्ट्रीय ग्रंथ, प्रेरणा म्हणून पाहिले आणि पुरुषार्थी योध्दया रघुवीरांची वीरश्रीयुक्त कथा सांगत जनजागृती केली. अशा समर्थांनी स्थापन केलेले 'श्रीराम मंदिर' म्हणून चाफळच्या राममंदिराचे हिंदवी स्वराज्यात वेगळे महत्त्व आहे. या राममंदिराला ३७६ वर्षांची परंपरा आहे.

१२ वर्षे टाकळी नाशिक येथे तपश्चर्या आणि १२ वर्षे संपूर्ण भारत भ्रमण करून श्रीरामाच्या साक्षात्कारी प्रेरणेने समर्थ रामदास इ.स.१६४५ साली, चाफळ महाबळेश्वरच्या कृष्णा खोऱ्यात आले. 'चाफळ' हे त्यांनी आपल्या कार्याचे मुख्य केंद्र केले आणि तेथे श्रीराम चाफळ जवळच्या अंगापूर डोहामध्ये सापडलेल्या राम मूर्तींची स्थापना केली. तसेच परदास्यातील हतबल प्रजेमध्ये बलोपासनेचे अमृतसिंचन करण्यास समर्थांनी ज्या अकरा मारुतींची स्थापना केली. त्यातील एका मारुतीची स्थापनाही चाफळमध्ये केली.

गावकरी व शिष्यांच्या सामुहिक श्रमदानातून हे मंदिर उभारले गेले. तेथील रामनवमीच्या उत्सवास छ. शिवाजी महाराजांनीही सढळ मदतीचे वर्षासन दिले. अशा प्रकारे चाफळचे राम मंदिर शिव समर्थ सहयोगाचे प्रसादचिन्ह व प्रेरणास्थान आहे. 'चाफळ' प्रमाणेच पुढे समर्थांनी सज्जनगडावर राम सीता मंदिराची स्थापना केली. तेही प्रसिद्ध मंदिर आहे.

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यात हे असून सध्या जे मंदिर दिसते ते रामभक्त श्री. मफतलाल यांनी जीर्णोद्धार केलेले अत्यंत देखणे मंदिर आहे. गाभाऱ्यात ६ फूट उंचीच्या राम सीता लक्ष्मणाच्या मूर्ती आहेत. या मंदिराच्या पुढे 'प्रताप मारुती' आणि मागे 'दासमारुती' अशा दोन वेगवेगळ्या मारुतीची स्थापना केलेली आहे.

मध्यान्ह आरती, सर्वांना प्रसाद भोजन आदि नित्योपचार रोज सुरू असून 'रामनवमी'ला मोठा उत्सव साजरा होतो. पुणे-कोल्हापूर महामार्गावरील 'उंब्रज' पासून चाफळ राम मंदिराजवळ आहे.

### फलटण: राजे नाईकनिंबाळकरांचे 'राम मंदिर'

सातारा जिल्ह्यातील फलटण हे गाव महानुभव पंथाची 'दक्षिण काशी' आहे. या गावात छ. शिवकालातील सरदार नाईकनिंबाळकर यांचे 'राम मंदिर' प्रसिद्ध आहे. हे राम मंदिर फलटणचे ग्रामदैवत आहे. रामनवमी उत्सवाप्रमाणे येथे मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपादेला श्रीरामाची भव्य रथयात्रा काढली जाते. हा रथोत्सव फलटणचा ग्रामोत्सव म्हणून साजरा होतो. या उत्सवाला २२५ वर्षांनी प्रदीर्घ परंपरा आहे. हे मंदिर इ.स.१७७४ साली सगुणबाई नाईकनिंबाळकर यांनी बांधले आणि या मंदिराचा शताब्दी उत्सव १८७५ मध्ये साजरा करून श्रीमंत मुधोरीराजे नाईकनिंबाळकर यांनी राममंदिरापुढे सुंदर- भव्य सभामंडप बांधला. गर्भगृह अंतराळ, सभामंडप अशी मंदिराची पारंपारिक रचना असून मंदिरापुढे तीन दीपमाळा आहेत. गाभार्यात चौथऱ्यावर राम सीता लक्ष्मणाच्या मूर्ती विराजमान आहेत.

### गोंदवलेकरमहाराज स्थापित दोन राममंदिरे :-

आधुनिक संतांमध्ये गोंदवले येथील नामयोगी ब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराज हे एक अग्रणी संत मानले जातात. इ.स.१८४५ ते १९१३ असा त्यांचा कार्यकाळ. गुरुशोधार्थ गृहत्याग करून गेलेले गणपती घुगरदरे 'ब्रह्मचैतन्य' होऊन १८७६ साली गोंदवल्यास परतले आणि त्यांनी श्रीरामोपासनेला नवे चैतन्य प्राप्त करून दिले. समर्थ रामदासस्वामींप्रमाणेच 'श्रीराम कर्ता' अशी गोंदवलेकरमहाराजांची भक्ती, निष्ठा होती. त्यांनी स्वतःचे मोठेपण न मिरवता रामनाम भक्तीचा महिमा वाढविला. त्यांच्या घराण्यात पंढरीची वारी व विठ्ठलभक्तीची परंपरा होती. त्या परंपरेला त्यांनी रामोपासनेत परिवर्धित केले. गोंदवले गावामध्ये त्यांनी दोन स्वतंत्र राम मंदिरे बांधली, १) थोरले राम मंदिर २) धाकटे राम मंदिर.

'थोरले राम मंदिर' (इ.स. १८९१) त्यांच्या पैतृक वाड्यातच पूर्वीच्या विठ्ठल मंदिरपुढे बांधले तर 'धाकटे राम मंदिर' (इ.स. १८९४) गावात भक्ती गल्लीत बांधले. दोन्ही मंदिरात नित्योपचार सुरू आहेत. गोंदवलेकर महाराज समाधीचे दर्शन घेण्यापूर्वी सारे भाविकभक्त प्रथम या दोन मंदिरांपैकी एका रामाचे दर्शन घेऊन मगच समाधी मंदिराकडे येतो. ही गोंदवले येथील प्रथा आहे. कारण महाराजांना ते देहरूपाने हयात असताना कोण्याही भक्ताने नमस्कार केला की ते प्रथम विचारत होते की, 'रामाचे दर्शन केले का? आधी रामाचे दर्शन घ्या.' गोंदवलेकर महाराजांच्या प्रेरणेतून महाराष्ट्रात अनेक राममंदिरे बांधली गेली आहेत.

समर्थांच्या सज्जनगड, चाफळ प्रमाणे ब्रह्मचैतन्य महाराजांचे गोंदवले हे राम भक्तीचे महाराष्ट्रातील प्रमुख उर्जा स्थान आहे. त्याशिवाय आधुनिक संतांपैकी संत गजानन महाराज यांच्या शेगांव येथील राम मंदिर भाविक भक्तांमध्ये प्रसिद्ध आहे. महाराष्ट्र भूषण, रामभक्त कै. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या समग्र कार्याचे अधिष्ठान रामोपासना आहे.


श्री बैठकीतून होणारे रामभक्तांचे जागरण हे फार मोठे प्रबोधन कार्य आहे. 'राम कर्ता' हा त्या कार्याचा निष्ठा भाव आहे. श्रीरामाचे परब्रह्म स्वरूप उपासनेचे अनन्य साधन आहे. त्याचबरोबर खर, दुषण, रावणादी राक्षसांचे- दुष्टांचे निर्दालन करणारा कोदंडधारी 'नित्यविजयी रघुनंदन।' स्वधर्म रक्षणाचे उर्ज्वस्थल प्रेरणास्थान आहे.

संत एकनाथांनी 'भावार्थ रामायणा'द्वारे, समर्थ रामदासांनी द्विकाडी रामायणाद्वारे याच योध्दया रघुवीराचे प्रेरक भावजागरण, धर्मांध आक्रमकांच्या पारतंत्र्यात स्वत्व गमावून हतबल झालेल्या हिंदू समाजात केले आणि त्यातूनच पुढे महाराष्ट्रात छत्रपती शिवरायाच्या रूपाने हिंदवी स्वराज्याचे आनंदवन भुवन उदयास आले.

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

(भाग २६)

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२



रवींद्रनाथांनी ज्या-ज्या साहित्याच्या प्रांतात आणि कलेच्या शाखेत स्वच्छंदपणे मुशाफिरी केली, त्याचा यथाशक्ती आढावा आपण घेत आहोत. खरे तर त्यांचे व्यक्तिमत्व आणि त्यांचे साहित्य यांची व्याप्ती सागरासारखी अमर्याद आहे. त्याचा थोडक्यात आढावा घेणे म्हणजे ओंजळीत समुद्र घेण्याचा प्रयत्न करण्यासारखेच आहे. या आधीच्या काही भागांमध्ये आपण त्यांच्या कविता, कथा आणि कादंबरी याबद्दल जाणून घेण्याचा प्रयत्न केला. या आणि पुढील भागात आपण त्यांच्या नाटकांबद्दल जाणून घेण्याचा प्रयत्न करू...

भारतीय नाट्यसृष्टीत रवींद्रनाथांचे योगदान एवढे प्रचंड आहे की त्यांना भारतीय नाट्यसृष्टीचा तारणहार म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. रवींद्रनाथ ज्या कालखंडात जन्माला आले आणि वाढले त्या कालखंडामध्ये आपल्या देशावर इंग्रजांची सत्ता होती. भारतावर राज्य करण्यासाठी आपल्या देशाची सांस्कृतिक अस्मिता नष्ट करणे त्यांना आवश्यक वाटत होते आणि त्यांनी सर्व बाजूंनी तो प्रयत्न केला. त्यातून पूर्वीच्या काळी समृद्ध परंपरा असलेल्या भारतीय रंगभूमीला ग्रहण लागले होते. पण रवींद्रनाथ म्हणजे चालती बोलती नाट्यसंस्था होती असे म्हटले तरी चालेल त्यांच्या रूपाने भारतीय रंगभूमीला संजीवनी मिळाली आणि ती पुन्हा भक्कमपणे पाय रोवून उभी राहिली.

कोलकत्यातील रवींद्रनाथांचे निवासस्थान जोराशंकोवाडी म्हणजे सांस्कृतिक कार्यक्रमाचे माहेरघरच होते. कलेची आणि साहित्याची आवड या कुटुंबात पूर्वापार होतीच. ती रवींद्रनाथांकडे वारशाने आली. त्यांचे मोठे बंधू ज्योतिरिंद्रनाथ यांना नाटकाची प्रचंड आवड होती. त्यांच्या नाटकांमध्ये भूमिका करता करता रवींद्रनाथ पुढे स्वतःही नाटके लिहू लागले. वयाच्या १२ व्या वर्षीच त्यांनी शेक्सपियरच्या 'मॅकबेथ' या नाटकाचे भाषांतर केले होते. ही गोष्ट त्यांच्या रक्तात नाटकाची आवड लहानपणापासूनच किती भिनली होती हे दर्शवते. त्यांनी काव्यलेखनाला जेवढा न्याय दिला तेवढाच नाटकांना देखील दिला. त्यांनी केवळ नाटके लिहिलीच नाहीत तर आपण लिहिलेल्या नाटकांमध्ये भूमिका करणे, ती नाटके विविध कलाकारांकडून बसवून घेणे, त्याचे दिग्दर्शन करणे इत्यादी गोष्टी त्यांनी शेवटपर्यंत आवडीने केल्या. त्यांना अगदी नोबेल पुरस्कार मिळाल्यानंतरही शांतिनिकेतनमध्ये सादर होणार्या नाटकांमध्ये ते स्वतः भूमिका करीत असत. त्यांच्या नाटकांची नेमकी संख्या किती आहे हे अधिकृतपणे सांगता येत नसले तरी ती ५० ते ५२ असावी. याशिवाय ज्या नाटकांची त्यांच्या लिखित साहित्यात नोंद नाही अशी आणखीही काही अप्रकाशित किंवा अप्रसिद्ध नाटके असू शकतील.

रवींद्रनाथ स्वभावाने कवी होते परंतु त्यांनी साहित्याचे सर्व प्रकार हाताळले. त्यांच्या कथा आणि कादंबरी यात जसे काव्य आढळते, तसेच त्यांच्या नाटकातही गद्य आणि पद्य यांचा सुरेख संगम झालेला आपल्याला दिसतो. पण असे करताना नाटकातील कथावस्तूचे आणि सौंदर्याचे भान त्यांनी सुटू दिले नाही. त्यांनी लिहिलेली काही नाटके ही त्यांच्या आधीच्याच कथा, कादंबऱ्या आणि कवितांचा आशय घेऊन लिहिली आहेत. तर काही नाटके ऐतिहासिक आणि पौराणिक विषयांवर आधारित आहेत. त्यामध्ये आवश्यक त्या ठिकाणी गीत आणि संगीताचा वापर चपखलपणे केलेला आढळतो.

संगीत, नृत्य आणि नाट्य यांच्या मिलनातून त्यांच्या नाटकांचा एक आगळावेगळा अविष्कार आपल्याला बघायला मिळतो. त्यामुळे त्यांनी पारंपारिक नाटकांची चौकटच बदलून टाकली. रंगभूमीला एक नवीन ऊर्जा आणि नवीन रूप दिले. काही नाटकांचे विषय ऐतिहासिक, पौराणिक किंवा तत्कालीन असले तरी त्यांनी त्यांना आधुनिक परिस्थितीचा संदर्भ दिला असल्यामुळे ही नाटके कधीच जुनी होत नाहीत. ती चिरतरुण वाटतात. आजही त्यांच्या नाटकांचे बंगालमध्ये आणि बंगालच्या बाहेरही प्रयोग होत असतात त्याचे रहस्य हेच आहे. रवींद्रनाथांनी नाटकांचे सर्व प्रकार हाताळले. त्यात नृत्यनाटिका, एकांकिका, प्रहसने, सांगितिका यासारख्या अनेक प्रकारांचा समावेश आहे. रवींद्रनाथांच्या जीवनकालात भारतीय नाटकांना घरघर लागली होती. नाट्य संस्कृती लयास चालली होती. अशा नाट्य संस्कृतीचे पुनरुज्जीवन करण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते.

रवींद्रनाथांनी इंग्रजी नाटके पाहिली आणि अभ्यासली होती. इंग्रजी साहित्याचा अभ्यास केला होता. तसेच भारतीय साहित्य, वेद, शास्त्र, पुराणे आदींचेही वाचन केले होते. त्यांच्या अभ्यासातून, विचारमंथनातून, चिंतनातून पारंपारिक नाटकांचे स्वरूप बदलून टाकणारी नवीन नाटके जन्माला आली. प्रयोगशील आणि स्वयंभू रंगभूमीचा जन्म झाला. रवींद्रनाथांच्या नाटकांमध्ये देशी, विदेशी, पारंपारिक अशा सर्व प्रकारच्या चांगल्या गोष्टींचा मिलाफ झालेला आपल्याला दिसतो. त्यांची नाटके विचारांना नवी दिशा देतात, समाजाला प्रगतीच्या दृष्टीने मार्गदर्शन करतात, राष्ट्रभक्ती निर्माण करतात हे त्यांच्या नाटकांचे वैशिष्ट्य म्हणता येईल. रवींद्रनाथांचा मूळ पिंड हा कलाकाराचा होता. साहित्य निर्मिती करताना रसिकांच्या मनाचा ठाव घेण्याची क्षमता त्यांच्यामध्ये होती. त्यामुळे एक नाटककार म्हणून प्रेक्षकांना काय हवे आहे किंवा त्यांना काय दिले पाहिजे त्याची उत्तम जाणीव त्यांच्या ठायी होती. त्यातून ते कवी असल्यामुळे त्यांच्या नाटकांचे सौंदर्य वाढले तर ते उत्तम कथाकार आणि कादंबरीकार असल्यामुळे त्यांची नाटके आशयसंपन्न झाली. मानवी स्वभावाचा उत्तम अभ्यास असल्यामुळे आपल्या नाटकातून मानवी भावविश्व त्यांनी उत्तम प्रकारे उलगडून दाख म्हणूनच त्यांची नाटके आणि एकूणच साहित्य निर्मिती ही अजरामर झाली आहे.

# नितीवंत, पुण्यवंत, वरदवंत...

गौरव
मिलिंद म्हैसकर

देवेंद्र फडणवीस ह्यांचा उपमुख्यमंत्री म्हणून शपथविधी झाल्यानंतरची गेली अडीच वर्षे मी त्यांचा प्रधान सचिव म्हणून काम पाहात आहे. परंतु त्यांच्याशी असलेला प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष ऋणानुबंध मात्र अडीच वर्षांहून किती तरी जुना म्हणजे जवळपास पंचवीस वर्षांचा आहे. मसुरीच्या प्रशिक्षणात प्रत्येक प्रशिक्षणार्थीला एक ज्येष्ठ आय.ए.एस.अधिकारी काउन्सेलर म्हणून देण्यात येतात. ते सगळी यथासांग चर्चा करुन प्रशिक्षणार्थींच्या करियरची पुढील दिशा ठरवतात. मी सोलापूरचा आहे, आय.आय.टी.तून केमिकल इंजिनियर झालो, प्रशासकीय सेवेच्या माध्यमातून हातून काही चांगलं काम घडावं अशी माझी मनीषा आहे, उच्च शिक्षणासाठी अनेक उत्तम विद्यापीठातील शिष्यवृत्ती मला मिळाल्या होत्या, त्या निमित्ताने मी बरेच भ्रमण करु शकलो असलो तरी मी तुळजापूरच्या पूर्वेला मात्र कधीही गेलो नाही आहे... हे वाक्य ऐकताच ते काउन्सेलर म्हणाले, उत्तम, मग तुला चंद्रपूरला पाठवू!

चंद्रपूरला पोचलो तर चंद्रपुरातच काय पण आख्ख्या विदर्भात (नंतर माझी पत्नी झालेल्या मनीषाचा अपवाद वगळता) माझा एकाही व्यक्तीशी परिचय नव्हता. आय.ए.एस. प्रशिक्षणार्थीला वेळ भरपूर, निश्चित असं काम नाही. त्यामुळे भटकायची अमर्याद मुभा असते. देवेंद्र फडणवीस (ज्यांना आम्ही सर्व अधिकारी वर्ग सर म्हणतो आणि बाकी तमाम दुनिया 'भाऊ' म्हणते. हे काम कराच लागते हां, भौ असे पाचसातशे तरी एसएमएस त्यांच्या मोबाईलवर रोज दनादन आदळत असतात.) ह्यांच्या काकू शोभाताई तेव्हा आमदार होत्या. भा.ज.प. हा त्याकाळी फार हवाहवासा पक्ष नव्हता. सुमतीबाई सुकळीकर अनेक प्रयत्नांनंतरही शहरी नागपुरातून कधी निवडून येऊ शकल्या नव्हत्या. समितीच्या माध्यमातून मनीषाच्या आजीशी त्यांची खूपच सलगी होती. तगडी राजकीय मिरासदारी, वारसा नसलेल्या मध्यमवर्गीय घरातील गृहिणी आमदार म्हणून शोभाताईंभोवती एक वलय होते. मूल येथील त्यांचे घर, शेती पाहायचा योग तेव्हा आला. सरांचा, त्यांच्या कुटुंबाचा शेतीशी काही संबंध नाही असा जो बोभाटा सध्या सर्रास केला जातो तो ऐकून मला आश्चर्य वाटतं. त्यानंतर अमरावती, वर्धा ह्या नागपूरच्या जवळपासच्या जिल्ह्यांत नेमणूक झाली. सरांची राजकीय कारकीर्द आता सुरु झाली होती. वयाच्या विशीतच ते नागपूरचे महापौर झाले. तेव्हा मी आणि मनीषा त्यांना भेटायला गेलो आणि म्हणालो, वयाच्या विशीतच आपण महापौर झाला आहात, वयाच्या चाळिशीत मुख्यमंत्री होणार! तेव्हा त्यांनी किंचित स्मितहास्य केले. माणसाला असंख्य सोंगं वठवता येतील, नाटकं करता येतील परंतु अखंड निरागसतेचं नाटक करणं अशक्य असतं. ज्याप्रमाणे मन चिंतामुक्त नसेल तर अगदी सर्वसुखांनी लगडलेल्या प्रासादातही माणसाला शांत झोप लागू शकत नाही. त्याचप्रमाणे जर मन वैरविद्वेष भावनेपासून पूर्ण मुक्त नसेल तर चेहरा निरागस राहू शकत नाही. सरांना ज्यांनी पूर्वायुष्यात मदत केली आहे, जे त्यांचे मित्र आहेत त्यांच्यासाठी सर नेहमीच धावून जातात हे तर ठीकच, स्वाभाविकच. पण जी लोकं अगोदरच्या काळात त्यांचेशी वाईट वागली आहेत, नाहक त्रास दिला आहे असाही कुणी जर अडचणीत असेल, त्याचे काही काम असेल तर सर लगेच ते करतील. इतक्या सरळ माणसाचा चेहरा नेहमी निरागस दिसणारच की!

विदर्भात जिल्हाधिकारी म्हणून काम करत असलो तरी सरांच्या भेटी फार व्हायच्या नाहीत. पण माझी सासुरवाडी नागपूरला आणि सर राहतात त्याच धरमपेठ भागात. शिवाय मनीषा आणि सर एकाच शाळेत, कॉलेजात होते. त्यामुळे समान मित्र, स्नेह्यांची रेलचेल होती. त्यांच्या बहरत चाललेल्या राजकीय घोडदौडीविषयी, त्यांचे वडील कै. गंगाधरराव फडणवीस ह्यांच्या अफाट लोकसंग्रहाविषयी खूपदा चर्चा व्हायची. गंगाधरराव आणिबाणीत तुरुंगात होते तेव्हां देवेंद्रनी बाणेदारपणे सांगितलं की अशा स्थितीत मी 'इंदिरा' कॉन्व्हेंट हया नावाच्या शाळेत जाणार नाही. वयाच्या सहाव्या वर्षी किती मुलांना इतकी जाण, इतकं धैर्य, इतका निश्चय असतो?

देवेंद्र फडणवीस हा माणूस खूप पुढे जायला हवा अशी कळकळीची भावना, जी राजकारण्यांबद्दल अपवादाने आढळते, सगळ्यांच्याच मनात असे. स्थानिक नगरसेवक, नंतर आमदार तेच असल्याने आजूबाजूच्या परिसरात झपाट्याने चांगला बदल होत होता. नुकतंच लग्न झालं तेव्हा नव्या जावया सकट घरातील सर्वांना अंगणातल्या नळातून बादल्यांतून पाणी भरावं लागे. सरांच्या प्रयत्नामुळे २४ बाय ७ पाणी येऊ लागलं. समोरचं मैदान त्यांनी नेटकं तयार केलं. त्यामुळे मनसोक्त क्रिकेट खेळता यायचं, असे व्यक्तीगत फायदे होत होते. नागपूरच्या अजित बेकरीचा ओव्हनकेकच नव्हे तर जगभरात कोणता खाद्यपदार्थ कुठे, कसा असतो ह्या विषयी अगाध ज्ञान त्यांना आहे आणि तरीही आईच्या हातचं खाणं ही अत्युच्च पसंद, मग ती साधी फोडणीची पोळी का असेना! साहजिकच आई देखील खूप अभिमानाने नेहमीच आवर्जून सांगतात, आधी प्रश्न विचारतो, कोणी बनवलंय महाराजने की तू? आणि मी बनवलेलं असेल तरच खातो. जगण्यासाठी खावं, खाण्यासाठी जगू नये अशी शिष्टसंमत उक्ती असतांना, मी मात्र खाण्यासाठी जगतो असं सर बिनधास्त म्हणतात. पण त्याचवेळी सरांनी तीस किलो वजन घटवलं हे विशेष. एकदा का एखादी गोष्ट मनावर घेतली की ती करायचीच हे त्यांच्या उत्तुंग यशामागचं महत्वाचं सूत्र आहे.

सरांचे काका अण्णासाहेब फडणवीस हे अत्यंत सत्प्रवृत्त आणि कार्यक्षम असे प्रशासकीय अधिकारी होते. माझ्या सासरेबुवांचे ते काही वर्षे वरिष्ठ सहकारी असल्याने त्यांच्या कुटुंबाचाही उत्तम परिचय होता. ते बुलढाण्याला जिल्हाधिकारी असतांना तेव्हाचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाणांनी त्यांना एकदा विचारलं, का हो. ..कलेक्टरसाहेब, ते तुरुंगात फडणवीस आहेत ते तुमचे कोण? तो माझा सख्खा बंधु... अण्णासाहेब.

ओह! मग तुमचे संबंध आहेत कां त्यांचेशी अजून? ... शंकरराव.

प्रश्नच नाही. पूर्वीप्रमाणेच उत्तम संबंध तर आहेतच. पण तितकेच नव्हे तर एका ध्येयापोटी ते हा तुरुंगवास भोगत आहेत. हया गोष्टीचा अभिमान आहे......अण्णासाहेब.

मुख्यमंत्र्यांना इतकं स्पष्टपणे बोलण्याची छाती खूप कमी अधिकाऱ्यांमध्ये असते. तो तर आणिबाणीचा कठीण काळ होता. त्या काळात असं बोलण्याची हिंम्मत तेही कसलाच कटुपणा उद्भवू न देता दाखवणं हा विशेषच. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले तेव्हा आणि त्यानंतरच्या काळात अनेकजण अधूनमधून चुकचुकायचे, अजूनही चुकचुकतात देवेंद्र फडणवीस हे आहेत उत्तमच पण तरुण आहेत त्यांच्यापेक्षाही जेष्ठ, अनुभवी मंडळी आहेत की... असा तो सूर असतो. त्यावर मला असं वाटतं की, वर मी उल्लेख केलेल्या सर्व पूर्वसुरींची, त्यांनी घेतलेल्या परिश्रमांची,खालेल्लूया खस्तांची पुण्याई देवेंद्र फडणवीस हयांच्यामागे भक्कम उभी आहे. त्यांची निस्सीम सेवेची, अनुभवाची, जेष्ठतेची पुण्यशिदोरी सरांसोबत आहे आणि अशीही मौलिक शिदोरी बरोबर असायला माणूस सरांसारखा सुसंस्कृत, वडिलधाऱ्या मंडळींचा मान राखणारा, त्यांच्या विषयी आदर असणारा असा आज्ञाधारक पुत्र, पुतण्या, भाचा असावा लागतो. म्हणून लेखाच्या शीर्षकात 'पुण्यवंत' हा शब्द जाणीवपूर्वक वापरला आहे. त्याच काळात त्यांच्या पत्नी अमृताजी स्थानिक ॲक्सिस बँकेत होत्या. त्या स्कूटी घेऊन येत आणि बँकेची अमुक एखादी डिपॉझिट योजना घ्याच असं माझ्या सासूबाईंना पटवून देत. एखाद्या व्यक्तीच्या सतत भेटीगाठी होत नसतानाही असंख्य अदृश्य धाग्यांनी त्या व्यक्तीचा संबंध येत राहतो, हा अनुभव मला सरांच्या बाबतीत आला. ह्यालाच मराठीत 'ऋणानुबंध' हा शब्द असावा. वीस वर्षानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ह्यांचा प्रधान सचिव म्हणून काम करण्याचे भाग्य माझ्या वाट्याला येईल हे त्या काळी माझ्या स्वप्नातही आलं नसतं. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातली एखादी गोष्ट असो किंवा हवामानशास्त्र, अद्ययावत तंत्रज्ञान, संगीत, एखाद्या अधिकाऱ्याचे, मंत्र्याच्या खाजगी सचिवाचे कोणकोणते 'उद्योग' चालू आहेत? चित्रपट, विमानं, शेती अशा असंख्य विषयांची बित्तंबातमी त्यांच्याकडे असते. सरकारमध्ये प्रत्येक निर्णय हा कागदावर, फाईलवरच शिक्कामोर्तब होतो. हे काम चालू असतांना कधीही ते नंतर बघू किंवा चर्चा करा असे म्हणत नाहीत. तासाभराच्या अवधीत शेकड्याहून अधिक गुंतागुंतीच्या विषयांवर अचूक निर्णय घेऊ शकतात कारण तो विषय विविध मार्गांनी त्यांना अगोदरच माहीत झालेला असतो. सकाळी ९ ते रात्री ३ ह्या त्यांच्या दिवसात अनेक बैठका, विविध व्यक्तींशी प्रत्यक्ष भेटी, फोन, एसएसएस अशा माध्यमातून ही माहिती गोळा होते. रोज त्यांना हजार तरी एसएमएस नक्कीच येत असावेत आणि कितीही छोटा माणूस असो, प्रत्येकाला उत्तर जातंच. बहुदा ते रात्री २ किंवा ३ वाजता जातं. मग तो माणूस किती सुखावत असेल! खुद्द मुख्यमंत्री माझ्या कामाची तत्परतेने दखल घेत आहेत हे perception फार मोलाचं असतं. उत्तरदायी सरकार म्हणजे ह्याहून अधिक काय? अर्थातच नंतर आमच्या यंत्रणेकडून त्या कामाचा तडफेने पाठपुरावा होतो. माणूस लहान-मोठा, गरीब-श्रीमंत, प्रांत-जात-भाषा-धर्म असा कसलाच भेदभाव सरांच्या विचार विश्वात नसतो.

सरांचा मेंदू हा बुध्दिमता संशोधकांकरता प्रयोगशाळा म्हणून वापरला जाऊ शकतो. सर जेव्हा एखादा कागदांचा गठ्ठा पाहतात तेव्हा अगदी कॅज्युअल पध्दतीने. मलाही प्रश्न पडतो की नेमकं काय वाचलं त्यांनी? कधी वाटतं की पुन्हा एकदा सविस्तर सांगावं कां? पण त्या संबंधीचा मंत्री/ आमदार इ. नंतर येऊन सांगतो की साहेबांना खडान् खडा माहीत होतं ते प्रकरण आणि व्यवस्थित समजावून दिलं मला! त्यांचं माहिती घेणं, ती साठवणं, फोलपटं फेकून देणं, मौलिक माहितीवर प्रक्रिया करणं आणि नंतर त्या माहितीचा सामर्थ्यशाली वापर करणं हे कसब एखाद्या सुपर कॉम्प्युटरला लाजवेल असं आहे.

(पान ६ वर)

# ग्रहसंकेत

## (रविवार, १५ डिसेंबर ते शनिवार, २१ डिसेंबर २०२४)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✼ **रविवार, १५ डिसेंबर-** पौर्णिमा दुपारी २.३१ पर्यंत, अग्रहायणी, कुलधर्म, अन्वाधान, रवि धनुत (पुण्यकाळ १२:३४ ते सूर्यास्त), मार्गशीर्ष पौर्णिमा (१४: ३२ पर्यंत), दत्त नवरात्र समाप्ती, योगेश्वरी यात्रा अंबाजोगाई, रेणुका यात्रा सौंदत्ती ✼ **सोमवार, १६ डिसेंबर-** विजय दिन, धनुर्मासारंभ, सत्यदत्त पूजन सप्ताह सांगता, यल्लमादेवी यात्रा कमलापूर ता. सांगोला ✼ **मंगळवार, १७ डिसेंबर-** पेन्शनर्स डे, दंडप्रभू महाराज पुण्यतिथी ✼ **बुधवार, १८ डिसेंबर-** संकष्ट चतुर्थी, (चंद्रोदय:- मुंबई- २१:०२, नगर- २०:५४, कलबुर्गी-२०:४९, कोल्हापूर-२१:०१, जालना-२०:४८, धाराशीव-२०:५१, नांदेड-२०:४३, पंढरपूर-२०:५५, परभणी-२०:४७, पुणे- २०:५९, बीड-२०:५०, बीदर-२०:४५, लातूर-२०:४८, विजयपूर-२०:५५, छत्रपती संभाजीनगर- २०:५०, सांगली-२०: ५९, सातारा-२१:००, सोलापूर-२०:५२), यल्लमादेवी यात्रा कवलापूर ता. मिरज ✼ **गुरुवार, १९ डिसेंबर-** गोवा मुक्तिदिन, रेणुका यात्रा सावर्डे ता. तासगाव, मल्लेवाडी उरूस ता. मिरज ✼ **शुक्रवार, २० डिसेंबर-** संत गाडगेबाबा पुण्यतिथी, योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामी पुण्याराधना होटगी ता.द. सोलापूर ✼ **शनिवार, २१ डिसेंबर-** उत्तरायणारंभ, मकरायन १४: ५०, सौर शिशिर ऋतु प्रारंभ, मोरया गोसावी संजीवन समाधी चिंचवड पुणे.

**मुहूर्त:-** ✼ **साखरपुडा-** १५, २० डिसेंबर ✼ **डोहाळ जेवण-** १५, १७, १८ डिसेंबर (१० नंतर)
✼ **बारसे-** १५, १७ डिसेंबर ✼ **जावळ-** १५ डिसेंबर ✼ **गृहप्रवेश-** १५ डिसेंबर

### मेष :- सुसंवाद ठेवावा

जीवनात सर्व संधींचा लाभ उठवावा पण कोणाच्या विश्वासाचा फायदा उठवू नका. शुक्रवारचा शुक्र- गुरू त्रिकोण योग आपले महत्त्वाचे आर्थिक काम यशस्वी करणार आहे. नव्या योजना मार्गी लावता येतील. सुसंधीचा लाभ उठवावा. फार दगदग करणे टाळावे. बरोबरीने सुसंवाद ठेवित चाला. सुख लाभेल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. १७, २०

### वृषभ:- अपेक्षित संधी लाभतील

मनोबल ही ईश्वराची मोठी ताकद आहे. जो मनास सदैव स्थिर, शांत ठवतो, तो यशस्वी होतो. राशी स्वामी शुक्राचा गुरूशी होणारा त्रिकोण योग सुख स्वास्थ मिळवून देईल. नव्या कामांना गती मिळेल. अपेक्षित संधी लाभतील. विनाकारण चिंता करू नका. आत्मविश्वास वाढविणार्या घटना घडतील. उत्साह, धडाडी वाढेल. प्रगतीचा मार्ग सापडेल. चिंता नको. शुभ ता. १६, २०

### मिथुन:-विचाराने बोलावे

लोकांचे पैसे बूडवून बंगले बांधण्यापेक्षा झोपडीत राहणेच चांगले. धनस्थ मंगळ खर्चही वाढविल व धनाची लालसाही वाढविल. आपण योग्य मार्गाने चालत आहात का? याचा विचार करूनच पुढचे मार्गक्रमण करावे. मनावरील दडपण कमी झाल्याने समाधान वाटेल. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. शुभ ता. १५, १६

### कर्क:- विचाराने रहावे

जसं, जसं वय वाढत जाते, माणूस प्रतिदिन श्रीमंत होत जातो. केसात चांदी, दातात सोनं, डोळ्यात मोती, रक्तात साखर दिसते. लाभातील गुरू शुक्राशी त्रिकोण योग करणार आहे. त्यामुळे आर्थिक कामे मनासारखी होतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. कौटुंबिक जीवनात वितंडवादाचे प्रसंग टाळावेत. घाईने निर्णय घेऊ नका. शुभ ता. १६

### सिंह:- नव्या संधी लाभतील

दुसऱ्याची निंदा करण्यात वेळ घालवू नका. आपला वेळ आपली शक्ती योग्य प्रकारे वापरणे हाच यशस्वी होण्याचा मार्ग आहे. कर्मस्थ गुरूचा शुक्राशी होणारा त्रिकोण योग कार्यक्षेत्रात चांगली फले मिळवून देणारा आहे. खर्च वाढले तरी प्राप्तीही तशीच चांगली राहील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. नव्या संधी लाभतील. शुभ ता. १५, १७

### कन्या:- वितंडवाद टाळावेत

आंतरिक शांती मिळणे हीच जीवनाची खरी सफलता आहे. पंचमातील शुक्र भाग्यातील गुरूशी त्रिकोण योग करणार आहे. आपला आर्थिक विकास होणार आहे. हाती घेतलेली कामे मनासारखी होतील. उत्तरार्धात धावपळ वाढणार आहे. महत्त्वाच्या कामांना प्रथम महत्त्व द्यावे. नव्या संधी लाभतील. शुभ ता. १६, १७

### तुला:- नव्या विचारांना चालना

जीवन यात्रा चमत्कारी आहे. काही घेऊन येत नाही, सर्व गोष्टीसाठी लढतो पण नंतर सर्व सोडून जातो. सुखस्थ शुक्राचा गुरूशी होणारा त्रिकोण योग सुख स्वास्थ मिळूवून देणारा आहे. योजलेली कामे मनासारखी होतील. वैद्यकिय, कृषि, मेकॅनिकल अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. १७, २०

### वृश्चिक:- कला गुणांचा विकास

गुरूकडून ज्ञान शिकावे, वडिलांकडून संघर्ष व आईकडून संस्कार शिकावेत. उपजत कला गुणांचा विकास होईल. सात्विक आहार घ्यावा. नाहीतर पुढे त्रास होईल. महत्त्वाचे निर्णय पूर्ण विचाराने घ्यावेत. दुसर्यांवर फार विसंबून राहू नका. चिकाटीने प्रगती होत जाईल. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. शुभ ता. १६, २०

### धनु:- आर्थिक प्रगती

जो खोटे बोलण्याची कला जाणतो तो दुसऱ्यांना खुष ठेवू शकतो. पण स्वत:स नाही. धनस्थ शुक्राचा गुरूशी होणारा त्रिकोण योग आर्थिक प्रगती करणारा आहे. गायन, वादनादि कलेचा विकास होईल. आत्मविश्वास वाढविणार्या घटना घडतील. उपेक्षित संधी लाभतील. लाभ उठवावा. उष्णतेपासून त्रास संभवतो. काळजी घ्यावी. शुभ ता. १६, १७

### मकर:- आनंददायी घटना

आपल्यातील सत्य शोधावे, तेच आपणास जीवनात योग्य मार्ग दाखविल. राशीतील शुक्राचा गुरूशी होणारा त्रिकोण योग व्यवसायात मनासारखी प्रगती करणारा आहे. गृहनिर्माण, कारखानदारी अशा व्यवसायात प्रगती साधता येईल. आर्थिक स्थितीत सुधारणा होत जाईल. आनंददायी घटना घडतील. अनुकूलता वाढत जाईल. शुभ ता. १७, २०

### कुंभ:- स्पर्धांमध्ये यश मिळेल

जीवनात पैसा नाही, व्यवहार मिळवावा. स्मशानात चार कोटी नाही, चार लोक सोडण्यास येतात. सुखस्थ गुरूचा- शुक्राशी होणारा त्रिकोण योग सुख स्वास्थ मिळवून देणारा आहे. नव्या योजना मार्गी लावता येतील. चिकाटीने केलेली प्रगती लाभदायक ठरेल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. १६, १७

### मीन:- आर्थिक प्रगती

जिंकल्यावर गोळा होणारी माणसे आपली नसतात. जिंकायच्या आधी जी आपणाबरोबर असतात तीख खरी आपली माणसं असतात. राशी स्वामी गुरूचा शुक्राशी होणारा त्रिकोण योग आर्थिक प्रगती करणारा आहे. नव्या योजना मार्गी लावता येतील. शारीरिक तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. शुभ ता. १५, २०

!! शुभ भवतु !!



# अमृत फळ: लिंबू

**आयुर्वेदात 'लिंबू' अमृत फळ आहे. लहान-थोर सर्व गरीब श्रीमंतांना लिंबू फळाची ओळख असून बाराही महिने मिळणारे हे फळ अल्पमोली व बहुगुणी आहे. रोजच्या जेवणात याचा नियमितपणे उपयोग करावा. जो आपल्या आहारात लिंबाचा वापर करील तो निश्चितच सदा निरोगी राहील,**

आजीचा बटवा
नारायण कारंजकर
भ्र. ९४२३७५८४०१



अगदी अल्प किंमतीत व सर्वांना सहजरित्या मिळणाऱ्या कितीतरी वस्तू आपल्या दैनंदिन वापरात आहेत. मिरी- मसाला, फळभाज्या, पालेभाज्या, विविध ओल्या वनस्पती आपल्या परिचयाच्या आहेत. परंतु त्यांच्या औषधी उपयोगाची फारच थोड्या लोकांना जाणीव आहे. विविध ग्रंथांचा, वृत्तपत्रांचा आधार घेऊन अशा वनौषधींची माहिती मी संकलित केली आहे. मधमाशीप्रमाणे मराठी, हिंदी, इंग्रजी आदि ग्रंथरूपी क्षेत्रातून संकलित केलेले मधरूपी ज्ञान 'आजीबाईच्या बटव्यांद्वारे जनतेच्या उपयोगासाठी सादर करीत आहे. सर्वांनाच हे ज्ञान उपयुक्त ठरणारे आहे. आपण हे ज्ञान विविध माध्यमाद्वारे घ्यावे व आप्तांना, सहकाऱ्यांना द्यावे. आजीबाईचा बटवा सुरू होण्यास हे ज्ञान लाख मोलाचे ठरणार आहे.

**लिंबाची विविध भाषी नावे:-**

संस्कृत- निम्बुक, हिंदी- कागजी नींबू, गुजराती- खट्टा, बंगाली पातीलिंबू, मराठी लिंबू, इंग्रजी- लेमन, लेटन- सायट्रस एसीडा अशी लिंबास विविध भाषेत नावे आहेत.

लिंबू सर्वत्र उपलब्ध होणारे फळ असून फळ व पाने औषधीदृष्टया उपयुक्त आहेत.

**गुणधर्म:-**

लिंबू, दीपक, पाचक, आंबट, रूचिकारक, त्रिदोष नाशक, कृमीनाशक, डोळ्याला हितकारक आहे. तसेच ज्वर, वमन, खोकला, कंठरोग, क्षय, आमवात, गुल्मनाशक आहे. लिंबू पोटाच्या सर्व रोगावर उपयोगी असून रक्तपित दूर करणारे आहे. लिंबाची मुळी बलवर्धक, अर्शनाशक, वात, अतिसार, हगवण यावर उपयोगी आहे. तर बीज बलकारक, पित्तनाशक, शीतल, स्वादिष्ट आहे.

लिंबाच्या १०-१२ प्रमुख जाती असल्यातरी कागदी लिंबू जास्त प्रचलित आहे. ईडलिंबू, जंबिरी लिंबू, पहाडी लिंबू, बिजोरा लिंबू वगैरे लिंबाच्या जातीही उपलब्ध आहेत.

लिंबात मोठ्या प्रमाणात जीवनसत्वे आहेत. 'अ' जीवनसत्व शरीराचे पोषण करते. 'ब' जीवनसत्व पचनशक्ती वाढविते. 'क' जीवनसत्व रक्तविकार दूर करते. तसेच लिंबामध्ये क्लोरिन, कॅल्शियम्, मॅग्नेशियम्, पोटॅशियम् ही घटकद्रव्ये असतात. त्यांचा हाडे मजबूत करण्यासाठी उपयोग होतो. लहान-थोरांनी लिंबाचा अवश्य उपयोग करावा.

**औषधी उपयोग:-**

कागदी लिंबाचे अनेक औषधी उपयोग आहेत. प्रमुख व महत्त्वाच्या उपयोगाचा येथे विचार करू...

लिंबू हे आहारातील महत्त्वाचे द्रव्य असून जेवताना ताटात लिंबाची फोड अथवा लिंबाचे लोणचे अवश्य असावे. त्यामुळे पचनाचे विकार दूर होतात. शरीर व मन निर्बल असल्यास लिंबाचे सेवन अवश्य करावे. लिंबाच्या नियमित सेवनाने शरीर निरोगी राहते. दाताचे विकार, डोळ्याच्या तक्रारी, रक्तविकार, पोटाच्या तक्रारी त्यामुळे दूर होतात.

नुसते लिंबू खाल्ले असता कित्येकदा घशाची आग होते, दात आंबतात, म्हणून लिंबू रसात कोणत्यातरी पदार्थाचे मिश्रण करून त्याचा वापर करावा. त्यासाठी लिंबू पाण्यामध्ये, कांदा, मध वगैरेमध्ये मिसळून खाल्ले जाते. खिचडी, उपीट, पोहे, बटाटे वडे याबरोबर लिंबाची फोड दिली जाते. असे खाणे फायदेशीर ठरते.

लिंबाच्या वापरासंबंधी प्रथम कांही गोष्टी ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. लिंबाचा रस आंबट, कडक. असल्याने तांबे, पितळ लोखंड वगैरे भांड्यातून तो ठेवू नये. त्यामुळे तो विषारी बनतो. कल्हईचे भांडे, काचपात्र, अगर मातीचे भांडे वापरावे. काहींना थंड पदार्थ सोसत नाही, त्यांनी कोमट पाण्याबरोबर लिंबूरस घ्यावा. निरनिराळ्या रोगावर लिंबाचा खालीलप्रमाणे वापर करावा...

मलबध्दतेवर लिंबू अत्यंत गुणकारी आहे. ज्यांना शौचास साफ होत नाही. त्यांनी रोज ६-८ चमचे मध, एका लिंबाचा रस, एक कप पाणी एकत्र करून सकाळी व संध्याकाळी घ्यावे. एक-दोन महिन्यात मलबादता विकार दूर होतो.

**रक्तदोषावर गुणकारी-** रक्तदोष म्हणजे अंगात उष्णता वाढते, खाज सुटणे, अंगावर फोड येणे, अशा विकारावर लिंबाचा रस खोबरेल तेलात मिसळून स्नानापूर्वी अंगास, डोक्यास लावावा. तसेच सप्ताहात किमान एकदातरी पिवळ्या व तांबड्या मातीत लिंबू रस मिसळून ती माती अंगास लावावी. अर्ध्या तासाने स्नान करावे. त्वचा विकार दूर होतात.

सकाळी चहाऐवजी लिंबू, साखर, पाणी घेतले तर दिवसभर उत्साह राहील. चहामुळे होणारे दुष्परिणाम तर टळतीलच. पण आपण दीर्घायुषीही होऊ. या उपायाने शरीराचा बेडौलपणाही दूर होतो. ज्यांना वायुविकार (गॅस) आहे, त्यांनी जेवताना सातत्याने लिंबाचा वापर करावा. वायुविकार दूर होईल. तसेच अपचन होत असेल तर जेवणानंतर लिंबाचे लोणचे पाण्यात घोळून कढीप्रमाणे पातळ करावे व प्यावे. कित्येकांना उत्साह नसतो. काम करवत नाही, अंग गरम राहते, अशक्तपणा, अरुचि, डोकेदुखी, हाडेदुखी आदिचा त्रास होतो. अशांनी ग्लासभर गरम पाण्यात दोन चमचे मध, अर्धा लिंबाचा रस, सुंठ पूड घालून घ्यावा, निश्चितच फायदा होतो. लहान मुलांना दात येताना त्रास होतो. शौचाला वरचेवर होते. मुले पेंगाळून जातात. अशावेळी कोमट पाणी, लिंबूरस व मध मिसळून द्यावे. त्यानंतर १५-२० मिनिटांनी दोन चमचे चुन्याची निवळी पाजावी. त्यामुळे मुलांना सुलभपणे दात येतात. घशाला सूज येणे, यावर लिंबाचा रस पाण्यात टाकून दिवस २- ३ वेळा गुळण्या कराव्यात. खात्रीने फायदा होतो. पोटदुखी, उदरशूळ यावर सकाळी उकळत्या कपभर पाण्यात एक लिंबाचा रस, थोडी काळे मिरे व काळे मीठ पूड टाकून ते कोमट झाल्यावर प्यावे. लिंबाच्या रसात नवसागर उगाळून गजकर्णावर लावावा. तसेच अजीर्णावर जेवणाचे अगोदर लिंबाच्या रसात सँधव व सुंठ पूड टाकून ते मिश्रण खावे. डोळे धुवावे. तसेच कान दुखत असल्यास तीळाचे नेत्र विकारावर कोमट पाण्यात लिंबाचा रस पिळून तेल गरम करून त्यात लिंबाचा रस टाकावा. ते तेल रोज २-३ थेंब कानात घालावे. पोटात कृमी झाल्यास लिंबू पाण्याने एनिमा द्यावा. किंवा लिंबाच्या बियाचे चूर्ण व लिंबाचा रस कोमट पाण्यातून पाजावा. ज्यांना लघवीचा त्रास होतो, लघवी थोडी-थोड़ी होते, त्यांनी लिंबू-पाणी घेत जावे.

**स्मरणशक्ती वाढते:-**

स्मरणशक्ती वाढण्यासाठी रोज लिंबाचा रस तूपात मिसळून सकाळ-संध्याकाळ घ्यावा. डोकेदुखीवरही लिंबू उपयोगी आहे. लिंबाचा रस करून दोन थेंब कानात टाकावे. डोकेदुखी थांबेल. नाकातून रक्त येत असल्यास थोडा लिंबाचा रस नाकात घालावा. डोक्यातील खवड्यावर कन्हेरीच्या पानाचा रस लिंबाच्या रसात खलून लावावी. तळहात, तळपायांना विशेषत: हिवाळ्यात त्रास होतो अशांनी लिंबाचा रस व लोणी खलून लावावे. लहान मुलाच्या मोडशीवर लिंबाच्या रसात केशर द्यावे.

पान २ वरून

# गाथा दुर्लक्षितांची...!

मिहीर भुटीया दिग्दर्शित 'मॅन ऑफ स्टील: सरदार' हा चित्रपट २०२५ साली प्रदर्शित होऊ घातला आहे. गुजराती नाटकाचे चित्र-रूपांतर असलेला हा चित्रपट सरदार वल्लभभाई पटेल यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंची ओळख भारतीयांना करून देईल, असे चर्चेत आहे. स्वतंत्र भारतात जर काही अक्षम्य अन्याय, हेटाळणी व द्वेष तोदेखील अजिबात कारण नसताना, राष्ट्रवेदीवर आपल्या सम ीधा अर्पण करणाऱ्या ऋषितुल्य व्यक्तिम त्त्वाच्या वाट्यास आला असेल तर तो म्हणजे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना. विशिष्ट विचारसरणीस कवटाळून बसलेल्या निर्ढावलेल्या, संधिसाधू वर्गाने स्वातंत्र्यवीरांवर अतोनात राळ उडवली. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या भारतीय इतिहासातील सुवर्णपान असलेल्या अंदमान तुरुंगवासावर आधारित 'सजा-एकालापानी' (१९९६) या प्रियदर्शन दिग्दर्शित चित्रपटात स्वातंत्र्यवीर सावरकरांनी दिलेल्या अतुलनीय लढ्याचे व भोगलेल्या अनन्वित हालअपेष्टांचे प्रामाणिक चित्रण होते. अन्नू कपूर यांनी स्वातंत्र्यवीरांची भूमिका समरसून वठवली होती.




स्वातंत्र्यवीरांची स्फूर्तिगाथा रूपेरी पडद्यावर आणायचीच, या एकमात्र ध्येयाने आयुष्यभर प्रयत्नांची पराकाष्ठा करणारे, लाडके बाबूजी, सुधीर फडके यांचे जीवन निधान म्हणजे 'वीर सावरकर' (२००१). हा वेद राही दिग्दर्शित व शैलेंद्र गौड यांनी अभिनीत केलेली स्वातंत्र्यवीर सावरकर यांची भूमिका असलेला चित्रपट.

या चित्रपटातील बाबूजींनी गायलेले 'ने मजसी ने' हे गीत अंतर्बाह्य हलवून सोडते. 'व्हॉट अबाऊट सावरकर' (२०१५) हा चित्रपट सहस्रकातील उच्चभ्रू नायकाची स्वातंत्र्यवीर सावरकरांची अवहेलना थांबविण्याच्या लढ्याची गोष्ट आहे. आजच्या तरुणाईला स्वातंत्र्यवीर समजावण्याचा हा एक स्तुत्य प्रयत्न होता.

याचवर्षी (२०२४) प्रदर्शित झालेला रणदीप हुडा निर्मित व दिग्दर्शित 'स्वातंत्र्यवीर सावरकर' हा चित्रपट स्वातंत्र्यवीर सावरकरांचा जीवनपट प्रामाणिकतेने व निष्ठेने मांडतो. रणदीप हुडा यांनी साकारलेली स्वातंत्र्यवीरांची भूमिका प्रशंसनीय..!

अर्थात, समाजातल्या काही वर्गाने या चित्रपटावर ताशेरे ओढले असले तरीही सुज्ञ नागरिकास वस्तुस्थिती ज्ञात असतेच असते, यात कणमात्र संदेह नाही. भारतीय स्वातंत्र्यलढा हा जगन्नाथाचा रथ! या रथाच्या मार्गक्रमणेस अनेकांचा हातभार लागला.

जरी त्यांच्याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष किंवा अनुल्लेख झाला तरीही त्यांच्या कार्याची महती किंवा योगदानाची वस्तुस्थिती नष्ट होत नाही. कोणत्याही प्रलोभनाशिवाय या भारतभूच्या सच्च्या सुपुत्रांनी केलेली सेवा आणि सम र्पण सदैव ललामभूत राहील. 'असू आम्ही सुखाने पत्थर पायातील' हेच शेवटी खरं..! (लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

पान ४ वरून

# मर्ढेकरांची कविता: 'स्वरूप आणि संदर्भ'...

मर्ढेकरांच्या कादंबर्यामधील पात्र मर्ढेकरांच्या व्यक्तिमत्वाशी साधर्म्य साधणारे असतात. या बाबीचा विचार केला असता कादंबरीकाराला कादंबरीतील पात्र स्वतः पासून स्वतःच्या परिसरात सापडत असतात हेही ध्यानात घ्यावे लागते. पाणी या कादंबरीमध्ये महायुद्धाचे झळ लागल्यावर बदललेल्या गावातील बदलत जाणार्या संस्कृतीचा अंतर्भाव गाव खेड्यात होत आहे याची जाणीव लेखकाने करून दिली आहे. या कादंबरीतही पेस्टनजी दादाभाई हे परदेशात राहून शिकलेले आहे. येथेही मर्ढेकर आपल्या व्यक्तिमत्त्वासोबत साधर्म्य असलेले पात्र उभे करताना दिसतात.

नटश्रेष्ठ हे एकमेव नाटक आहे. मराठी प्राणी लिहिले आहे. त्यासोबतच कर्ण, बदकाचे गुपित, संगम आणि औक्षण ह्या चार संगीतिका बर्डे प्राणी दिलेले आहेत. त्या सर्वांचा उहापोह विजया राज्याध्यक्ष यांनी ऊहापोह केलेला दिसून येतो. याशिवाय मर्ढेकरांनी जवळपास ३२ इंग्रजी कविता लिहिल्या आहेत.

मर्ढेकरांची सौंदर्य आणि साहित्य या ग्रंथातील काही अवतरणे पाहिली असता मर्ढेकर साहित्याच्या अभ्यासाविषयी जास्त जागरूक होते असे दिसते. मर्ढेकरांची समीक्षा निर्दोष आहे असे नव्हे तिच्या गुणदोषाचे वस्तुनिष्ठ चिकित्सा करणे गरजेचे आहे असे स्पष्ट मत विजया राजाध्यक्ष मांडताना दिसतात. विजया राज्याध्यक्ष यांच्या मर्ढेकरांची कविता: स्वरूप आणि संदर्भ या द्विखंडात्मक ग्रंथामधून मर्ढेकरांवर तुकाराम आणि ज्ञानेश्वर यांचा प्रभाव होता असे दिसते. त्यांचे अगदी तुकारामाप्रमाणे परमेश्वराचे भांडण असते तरी श्रद्धाही होतीच असे काही उदाहरणे लेखिकेने दिले आहेत. रामदास हे मर्ढेकरांच्या कुटुंबातील जुने कुलदैवत, त्यामुळे ती त्यांच्या श्रद्धास्थान होते. जरी त्यांनी रामदासांची कविता बारकाईने वाचली असली तरी त्यांच्या कवितांवर रामदासांचा प्रभाव कुठेही दिसत नाही.

मर्ढेकरांवर आणखी काही कविता या संग्रहाच्या मुळे कोर्टात खटला भरण्यात आला होता. त्या खटल्याचा संदर्भही विजया राज्याध्यक्ष यांनी दिला आहे. ती केस लढणारे वकील वि. पा. सराफ त्यांची मुलाखत लेखिकेने घेतली होती. स्वातंत्र्यावर होणार्या या प्रकारच्या आक्रमणाबद्दल आज दिसते तेवढी जागरूकता त्या काळातील वृत्तपत्रांनी व नियतकालिकांनी दाखवले नाही. ती का दाखवली गेली नाही? असा प्रश्नही लेखिकेने उपस्थित केलेला आहे.

त्याचप्रमाणे मर्ढेकर निर्दोष मुक्त होऊन १९५२ मध्ये झालेल्या इंदिरा संत अध्यक्ष असलेल्या साहित्य संमेलनातही याबाबत कोणीही उल्लेख केला नाही. या बाबी खटकणार्या आहेत. अर्थात महाराष्ट्र साहित्य परंपरा ही दुसऱ्या साहित्यिकाच्या मागे खंबीरपणे त्याची बाजू घेत उभी राहिल्याचे उदाहरणे फार अभावाने सापडतात.

एकंदरीत मर्ढेकरांची कविता स्वरूप आणि संदर्भ खंड एक आणि खंड दोन या दोन्ही ग्रंथांमध्ये विजया राज्याध्यक्ष यांनी मर्ढेकरांच्या कवितेसोबत त्यांचे ललित साहित्य, समीक्षा, व्यक्तिमत्व, चरित्र यांच्या जीवनातील संघर्ष, त्यांच्या कवितेवरील कोर्ट खटले अशा सर्वच बाबींचा सूक्ष्मपणे अभ्यास केलेला दिसून येतो. मर्ढेकर समजून घेण्यासाठी जसे संपूर्ण मर्ढेकर वाचणे गरजेचे असेल तसेच विजया राज्याध्यक्ष यांचे मर्ढेकरांची कविता स्वरूप आणि संदर्भ हा ते खंडात्मक ग्रंथ वाचनही गरजेचे ठरते हे निश्चित आहे.

पान ५ वरून

# नितीवंत, पुण्यवंत, वरदवंत...

'वक्ता दशसहस्त्रेशु' हे वचन देवेंद्र फडणवीस यांनी साफ खोटं ठरवलं. कारण ते दहा हजारांत नव्हे तर दहा कोटींत एक असे वक्ते आहेत. भाषणा-चा विषय, प्रभावी मुद्दे, भरगच्च तपशील, विरोधकांना गुगल्या, त्यांच्या फुलटॉसवर निर्दय षटकार, कधीकधी मजेत टोप्या उडवणे अशा असंख्य पैलूंसकट सरांनी वक्तृत्व ही कला न ठेवता तिला शास्त्र, विद्या, कसब, कला हयांच्या एका वेगळयाच पातळीवर नेऊन ठेवलं आहे. मराठी नेत्यांना कायम त्रस्त करत आलेली समस्या म्हणजे मराठी व्यतिरिक्त हिंदी, इंग्रजी या भाषेत बोलता न येणे. हया एका कारणामुळे अनेक कर्तबगार मराठी नेते दिल्लीत किंवा राष्ट्रीय स्तरावर छाप पाडू शकले नाहीत, असे काही जाणकारांचे मत आहे.

सरांचे मात्र मराठी, हिंदी, इंग्रजी या तिन्ही भाषांवर कमाल प्रभुत्व आहे आणि अतिशय सफाईने ते हया तीनही भाषांतून संवाद, वक्तृत्व साधू शकतात. देशभरातल्या अनेक आंदोलनांमध्ये त्यांनी भाग घेतलेला आहे आणि हया सहभागामुळे त्यांचे वाक्पटुत्व कसदार बनले आहे. ऐन मंत्रीमंडळ बैठकीतही, मी तुम्हाला पुन्हा असं सांगून राहिलो की.. असं म्हणून ते आपलं वैदर्भीय असणं छान मिरवतात. देहबोली, भाषा, स्वभावाचा पुरेपूर वापर करणारे समर्थ संवादनैपुण्य हा त्यांच्या यशामागचा महत्वाचा आधारस्तंभ आहे. सत्तावन्न वर्षांच्या महाराष्ट्राचे नेतृत्व बव्हंशी ग्रामीण महाराष्ट्रातून उभारले.

ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, सहकार, शेती हयात मुरलेले असे हे नेतृत्व होते. त्यामुळे एका बाजूला हे विषय आणि दुसऱ्या बाजूला माहिती तंत्रज्ञान, नागरीकरण, मेट्रो, सोशल मिडिया हे २१ व्या शतकातले विषय ही दरी कायमच राहीली.

कृषी, सिंचन, सहकार हे ग्रामीण महाराष्ट्राशी संलग्न विषय आणि नागरी वाहतूक, आय.टी, 'मेक इनमहाराष्ट्र' असे उच्चभ्रू विषय हयांची सांगड घालणारे देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्रातले विरळाच नेतृत्व.

# समाधानाची लिपी

## सकारात्मकतेचे तत्वज्ञान २४५

सकारात्मकतेचे तत्त्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com



संतुष्ट शब्द वापरावा किंवा समाधान, हे व्यक्तिनिष्ठ संवेदन असल्याने त्याचे मोजमाप करणे कायम आव्हानात्मक असते. त्याचे फलित व्यापक पातळीवर, सर्वसाधारण करणे जमत नाही. तरीही गेल्या काही दशकांमध्ये या मोजणीचे काही निकष विकसित करण्यात आलेले आहेत. कारण समाधान सुखकारक तर असतेच पण उत्साहवर्धकही असते. आपल्या स्वास्थ्यावर त्याचा सकारात्मक परिणाम होतो. मोजणीसाठी काही आयुधे म्हणजे दीर्घकालीन आजार, निद्रेशी संबंधित अडचणी, असह्य वेदना, स्थूलता, धूम्रपान आणि चिंताग्रस्तता. हे २००८ सालचे विचार आहेत स्ट्राइन, चॅपमन, बॉलूझ, मॉरियार्टी आणि मोकदड यांचे. हे नाते उभयपक्षी असते.

एवढे नक्की समाधानाचा शारीरिक स्वास्थ्याशी जवळचा संबंध असतो. एकात वाढ/घट दुसऱ्यात थेट समप्रमाणात संभवते. याचा पुढचा टप्पा आहे २०१५ सालचे बोएहं, विंनिंग, कुबझॅन्सकी आणि सेगरस्ट्रॉम यांचे संशोधन. त्यांना आढळले की मृत्युदराच्या प्रमाणात घट (थोडक्यात दीर्घायुष्य) हेच समाधानाचे प्रमुख कारण असते. त्यांत फेरफार झाले किंवा वारंवार चढउतार झाले तर ते आरोग्याला हानिकारक असते.

**समाधानाचे मोजमाप-**

१९६० पासूनच जीवनातील समाधानाचे मोजमाप वस्तुनिष्ठ आणि शक्यतो बाह्य स्रोताने करावे अशी विचारसरणी मूळ धरू लागली आहे. जसे हृदयाचे ठोके आणि रक्तदाब मोजले जाते. तरीही जीवनसमाधान व्यक्तिनिष्ठ मार्गाने मोजताना अवघड जाते.

उत्पन्न, स्वास्थ्य, नातेबंधांची गुणवत्ता यांचे संतुष्टीशी असलेले नाते व्यक्तिगणिक बदलू शकते. गरीब, अस्वास्थ्य आणि विरळ नाती एकीकडे आणि दुसरीकडे धनाढ्य, निरामय आरोग्य तसेच मित्रांचे जाळे यांच्यात लढाई अवश्य होऊ शकते. पण खरंच बाह्य स्रोत मदत करू शकतात कां या मोजमापाला? आणि तसे करायचे असेल तर काय मोजायचे? हास्यांची संख्या, अश्रू आणि स्मित यांच्यातील गुणोत्तर प्रमाण, आनंदाने नृत्याचे प्रसंग? हे प्रथमदर्शनी वेडगळ वाटेलही. कारण व्यक्तिमत्वातील फरक, भावनिक संघर्ष यांच्यातील बदल हे इतके व्यक्तिगत असतात की त्यांचे बाहेरून मोजमाप कसे शक्य आहे? थोडक्यात तर्काच्या आधारे एवढेच मानता येईल की प्रश्नावली, मुलाखती आणि सर्वेक्षण हेच सामान्य मार्ग आहेत समाधानाच्या मोजणीचे.

जीवनाची मोजपट्टी वापरून संतुष्टी सापडेल कां? इड डीएनेर ने विकसित केलेली मोजपट्टी जगभर प्रसिद्ध आहे आणि व्यापकपणे वापरली जाते. यामध्ये पाच विधाने आहेत आणि पट्टीवर १ (ठामपणे अमान्य) ते ७ (पूर्णतया मान्य) असे मोजमाप वापरले जाते. येथे सामान्य प्रश्न विचारून एकूण आयुष्याचे आकलन तपासण्याचे प्रयत्न केले जातात. एकीकडे वसुधैव कुटुंबकम म्हणायचे, अवघे विश्व माझे घर असे ठासून प्रतिपादन करायचे पण दृष्टिकोन मात्र भिन्न त्यामुळे समाधान एखाद्या विशिष्ट कप्प्यात बंदिस्त करून ठेवता येत नाही हे डीएनेर, इंग्लेहर्ट आणि टय यांच्या २०१३ साली लक्षात आले.

**१) मोजपट्टी -**

खालील पाच विधानांशी आपण सहमत अथवा असहमत असाल तर १ ते ७ अशा मोजपट्टीवर तसा प्रतिसाद नोंदवायचा आहे-

७- पूर्णतया सहमत
६- सहमत
५- अंशतः सहमत
४- सहमतही नाही आणि असहमतही नाही
३- किंचित असहमत
२- असहमत
१- पूर्णतया असहमत

**विधान -**

(अ) ---------- बहुतांशी वेळी माझं आयुष्य माझ्या आदर्शाच्या संकल्पनांच्या जवळ असतं.

(ब) ---------- माझी परिस्थिती उत्कृष्ट आणि तक्रारीला वाव न देणारी आहे.

(क) ---------- मी संतुष्ट आहे.

(ड) --------- आजतागायत माझ्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी मला जवळपास/ बहुत करून मिळालेल्या आहेत.

(इ) ---------- मला पुनर्जन्म मिळालाच तर हेच आयुष्य पुन्हा जगायला आवडेल.

**निष्कर्ष-**

वरील विधानाच्या मोजपट्टीवरील गुणांकनाच्या बेरजेवरून खालील कयास बांधता येतात-

३१- ३५ - अतिशय समाधानी
२६-३० - समाधानी
२१- २५ - अंशतः समाधानी
२० - - तटस्थ
१५-१९ - अंशतः असमाधानी
१०-१४ - असमाधानी
५-९ - अत्यंत असमाधानी

**२) जीवनातील समाधानाचा निर्देशांक-**

या प्रश्नावलीत २० विधाने आहेत ज्यांच्या प्रतिसादानंतर पन्नाशी ओलांडलेल्या (साहजिकच त्यांच्या समाधानाचे मूल्यांकन अधिक महत्वाचे ठरते) प्रौढांचे जीवनविषयक अनुभवांचे संकलन केले जाते.

न्यूगारटेन, हविघुर्स्ट आणि तोबिन यांनी १९६१ साली विकसित केलेली ही प्रश्नावली अजूनही लोकप्रिय आहे आणि प्रमुख संशोधक ती मोजमापासाठी सातत्याने वापरतात. त्याचे दोन अवतार आहेत. २० प्रश्नांची पहिली प्रश्नावली आणि कालौघात त्यापासून तयार झालेली ११ विधानांची प्रश्नावली आणि मोजण्यासाठी तीनच पर्याय देते- असहमत, माहित नाही आणि सहमत. काही विधाने सकारात्मक आहेत (सहमत असं उत्तर असेल तर अधिक गुण) याउलट काही विधाने नकारात्मक सूर आळवतात (आणि तेथे असहमत या उत्तराला अधिक गुण दिले जातात). शेवटी सर्वंकष गुणांकनावरून व्यक्तिगत समाधानाची मोजणी करता येते.

**काही प्रातिनिधिक विधाने-**

(अ) वाढत्या वयाबरोबर माझा वास्तवाचा स्वीकारही वाढत जातो.

(ब) भविष्यात काही आनंददायक, सुखद माझ्यासमोर वाढून ठेवलेले असेल अशी मी अपेक्षा करतो.

(क) इतरांच्या तुलनेत, मी आजवर मुर्खासारखे बरेच निर्णय घेतलेले आहेत. (याचे गुणांकन उलटे अभिप्रेत आहे)

(ड) विहंगावलोकन केले तर मनात विचार येतो, अरे मला हवं असलेलं बरंच काही अजूनही गवसलेलं नाहीए.

३) अगदी अलीकडे मार्गोलीस, ओझेर आणि ल्युबोमिरश्क्य यांनी २०१८ साली जीवन समाधान मोजण्याची फुटपट्टी विकसित केली. डीएनेर यांच्या भूमिकेत त्यांनी थोडा बदल सुचवित सहा विधाने मांडली आहेत. ही विधाने त्याच गुणांकनाच्या पातळीवर तपासायची आहेत -

(१) मैं जिंदगी का साथ निभाता चला गया ख

(२) हेच जीवन पुन्हा जगता आलं तर (एकाच या जन्मी जणू फिरुनी नवी जन्मेन मी), मी खूप गोष्टी/ घटना/व्यक्ती बदलून टाकीन.

(३) मी संतुष्ट आहे.

(४) एकुणात असं अनुभवाला येतंय की बाकीच्यांच्या जीवनाची गुणवत्ता माझ्यापेक्षा अधिक चांगली आहे.

(५) मी जिथे आहे, जसा आहे, ठीक आहे. काही तक्रार नाहीए.

(६) सध्या जसं जगतोय, ती वाट मला बदलावीशी वाटतेय.

**उतारवयातील समाधानाच्या संकल्पना -**

सामान्यतः उतारवयात कुरकुरी कमी होऊन समाधानाची एक शांत पातळी गाठली जाते. ठेविले अनंते पाशी माणूस येऊन थबकतो. अर्थात वयोमानानुसार शारीरिक व्याधींनी ग्रासलेले असल्याने प्रकृतीच्या तक्रारी सुरूच असतात. त्यामुळे संतुष्ट असण्याची सरासरी वयाबरोबर फारशी बदलत नाही पण समाधानाचे घटक आणि त्यांची टक्केवारी नक्कीच बदलती असते.

समाधान नामक सत्ताकेंद्र त्याचा केंद्रबिंदू सतत बदलत असते. आता पद, प्रतिष्ठा, पैसे यांची जागा आनंद, सुख, कौटुंबिक संबंध आणि एकुणातच कृतार्थता यांनी घेतलेली असते.

शारीरिक स्वास्थ्य हा जीवन समाधानाचे भाकीत करताना महत्वाचा घटक मानला जातो. पण उतारवयात मानसिक स्वास्थ्य पहिल्या बाकावरची जागा पटकावते. आश्चर्य वाटेल पण वय वाढेल तसे जीवनातील व्यावहारिकता अधिक शहाणपणाची ठरते.

अहंभावाऐवजी स्वतःचे वर्तन, अनुकंपा यांना महत्व देणे आर्डेल्ट यांनी १९९७ मध्ये अधोरेखित केले. शरीरस्वास्थ्य, सामाजिक परिप्रेक्ष आणि समाजातील समावेश यांच्यापेक्षा दुप्पट महत्व शहाणीवेला असते. हे वृद्ध स्त्रियांमध्ये अधिक आढळते.

मृत्यूच्या अलीकडचे वय या समाधानाच्या चाचपणीत महत्वाचे ठरते. वयापेक्षाही हा घटक मोजणीत महत्वाचा असतो. शारीरिक वयापेक्षा आकलन उतरणीला लागले की त्याचा प्रभाव समाधानावर अधिक पडतो. हे गेरस्टोर्फ, लिंडेनबेर्गर आणि स्मिथ यांचे २००८ सालचे हे संशोधन आहे.

याही अलीकडचे २०१७ सालचे तेय आणि असदुल्लाह संशोधन म्हणते की जीवनातील समाधानाचे प्रतिबिंब खालील मुद्द्यांमध्ये पडते-

(१) लिंग
(२) शिक्षण
(३) वास्तव्याचे ठिकाण (शहर, तालुका, खेडं)
(४) शारीरिक स्थिती (विकलांगता वगैरे)
(५) आकलनक्षमता
(६) नियमित वैद्यकीय चाचण्या
(७) आर्थिक / सांपत्तिक स्थिती
(८) विमा आणि इतर सामाजिक सुरक्षा
(९) कुटुंबासमवेत वास्तव्य अथवा एकटे राहणे (वृद्धाश्रम समाविष्ट)

आश्चर्य म्हणजे या अध्ययनातून पुन्हा एकदा शरीर स्वास्थ्य (मानसिक धरून) महत्वाचे ठरले.

**जीवन-समाधान कसे वाढवावे?**

मनाजोगते जीवन जगल्यावरही समाधान वाढविले पाहिजेच का आणि कसे ह्या प्रश्नाच्या उत्तरावर लेखाची समाप्ती करू या...

डॉ. लेस्ली बेकर- फेल्प्स यांनी पाच प्रश्न दिलेले आहेत, ज्यांच्या प्रामाणिक उत्तरांमध्ये जीवन समाधानाचा बूस्टर डोस आहे.

१) नव्या अनुभवांना सामोरे जायला तुम्हांला आवडते कां?

२) काहीही करताना तुम्ही अवघड वाट निवडता कां?

३) फावल्या वेळी इतरांबरोबर निर्हेतुक वेळ घालवायला तुम्हांला आवडते कां?

४) गप्पांमध्ये, चर्चांमध्ये बाकीच्यांबरोबर जुळवून घेण्याचा, वितंडवाद वाद टाळण्याचा प्रयत्न तुम्ही करता कां?

५) विविध प्रकारच्या समस्यांनी तुम्ही अजूनही अस्वस्थ होता कां?

जगण्यात अपरिहार्य असंतोष असेल तर त्याची हाताळणी करण्याचे मार्गही उपलब्ध आहेत. उदाहरणार्थ स्वजनांवरील प्रेम, स्वास्थ्य सुधारणा, अध्यात्मिक वा धार्मिक कृत्यांमध्ये सहभाग, कामात कृतकृत्यता वाढविणे इत्यादी.

# शोध नामदेवरायांचा...

संत प्रबोधन
नितीन बोरावके

'नाचू किर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी' हा नामदेवांचाच संकल्प. त्याचसाठी त्यांनी देशभर यात्रा केल्या. हरिद्वारवरून नामदेव दिल्लीत आणि तेथून पंजाबमधील भूतविंड या गावात आले. या गावात त्यांना त्यांचा पंजाबातील उत्तराधिकारी बाबा बोहरदास भेटले. हेच बाबा बोहरदास अखेरपर्यंत नामदेवांसोबत होते, त्यांनीच नामदेवांचे पंजाबमधील कार्य त्यांच्या पश्चात सुरू ठेवलं. आज घुमानमध्ये असलेलं त्यांचं स्मृतिमंदिर आधी याच बाबा बोहरदासांनी उभारलं आणि मग बादशाहाने त्याला भव्य स्वरूप दिलं, असं सांगतात. घुमानमधील नामदेवांच्या समाधी मंदिराशेजारीच या बाबा बोहरदासांचंही छोटे समाधी मंदिर आहे.

मंदिराबाहेर अखंड तेवत राहणारा दीप आहे आणि त्या दिव्यासमोर एक डाळिंबाचं झाड आहे. हे झाड नामदेवकालीन असल्याचं सांगतात. त्याला तिथे 'पुरातन समय की निशानी, बुटा अनार' असे म्हणतात. तो तिकडचा अजानवृक्षच. त्याची पूजा-अर्चनाही केली जाते. पण एखादं झाड एवढी वर्ष कसे जगलं असेल, अशी शंकेची पाल मनात चुकचुकत राहते. अखेर कितीही काही म्हटले तरी, श्रद्धेपुढे बुद्धी चालत नाही, हेच खरे. नामदेवांच्या या मंदिरासमोर गुरुद्वारा आहे. हा बाबा नामदेवजी का गुरुद्वारा... म्हणजे नामदेवांच्या स्मृतिप्रित्यर्थ उभारलेला गुरुद्वारा. साधारणतः पाचशे माणसे बसतील एवढ्या मोठ्या सभागृहात, दर्शनी चौथऱ्यावर महिरपीत शीख धर्माचा आदिग्रंथ गुरुग्रंथसाहेब ठेवला आहे. सभागृहाच्या उजव्या भिंतीवर शीख धर्माचे दहा गुरू तर डाव्या भिंतीवर नामदेवांसह १५ भगतांचे फोटो लावले आहेत. सभागृहाच्या डाव्या बाजुला याच गुरूग्रंथसाहेबाचे तिन्ही त्रिकाळ अखंड वाचन सुरू असते. तिथे नामदेवांची भव्य प्रतिमा ठेवण्यात आली आहे.

गुरुद्वारामध्येच आत उजवीकडे एक राधाकृष्णाचे छोटेखानी मंदिर आहे. शीख धर्माचा गुरुद्वारा आणि हिंदू धर्माचे मंदिर असा हा इथे दिसणारा संगम फार कमी ठिकाणी पाहायला मिळतो, असे इथल्या विश्वस्तांचे म्हणणे आहे. आज जिथे राधाकृष्णाचे मंदिर आहे, तिथे आधी विठ्ठल-रखुमाईच्या मूर्ती होत्या. पण कालांतराने त्या झिजल्या. त्याजागी राधाकृष्णाच्या या मूर्ती बसविण्यात आल्या, असंही काहींचं म्हणणे आहे. या मंदिराच्या मागील बाजूस हनुमानाची छोटीशी घुमटी आहे. शेजारी शिवमंदिरही आहे. 'नामा म्हणे शिव विष्णु एकरूप, ताराया अमूप अवतार' असे सांगत शैव-वैष्णवांचा वाद संपवणाऱ्या नामदेवांनी पंजाबातही विठ्ठल आणि शिवलिंग एकत्र स्थापित केले असावेत, असा अंदाज आहे. या मंदिरातही आम्ही गुरुद्वारातील नित्योपचारांप्रमाणेच नियमित पूजा-आरती करतो, असे इथले पुजारी सांगतात. मंदिर परिसरात आणखीही काही छोट्या समाध्या आहेत. त्या बोहरदासांच्या कुटुबातील आणि नामदेवांच्या शिष्यपरिवारातील भक्तांच्या आहेत, असं स्थानिकांचं म्हणणं आहे. शेजारी कीर्तन-भजनासाठी सभागृह, यात्रेकरूंच्या निवासाची व्यवस्था करण्यासाठी छोटी धर्मशाळा आहे. मंदिराबाहेर 'नामदेव भवन' नावाचं मोठं सभागृह आणि नामदेव विद्यालय नावाची एक शाळाही आहे. एकंदरित हा सारा परिसर तुम्हाला पदोपदी नामदेवांचे नाममहात्म्य सांगत राहतो. या मंदिराच्या आसपासही देवस्थानची जमीन आहे. तेथे असलेल्या दुकानांमधून मंदिराला उत्पन्न मिळते. तिथेच गुरुदयाल सिंग यांचं शिलाई कामाचं दुकान आहे. मजबूत देहयष्टीला अपवाद ठरतील असा त्यांचा सडपातळ बांधा आणि पाच-साडेपाच फूट उंची. पण चेहरा सतत हसतमुख. त्यांच्या शिलाईच्या मशीनच्या मागेच नामदेवांचा फोटो आहे. त्यांचे शिलाईचे काम सुरू होते आणि पाठी नामदेवांचा फोटो ही मांडणी पाहून नामदेवांनी स्वतःची करून दिलेली ओळख आठवली...

**शिंपीयाचे कुळीं, जन्मा माझा जाला ।**
**परि हेतु गुंतला । सदाशिवी ।।**

'सदाशिवी' या शब्दावर कोटी करत नामदेवांनी या अभंगात आपल्या शब्द सामर्थ्याची चुणूक दाखवली आहे. त्याच नामदेवांची व्यावसायिक परंपरा सांभाळणाऱ्या या गुरुदयालजींच्या दुकानात जायलाच हवे, असा विचार मनात आला आणि आत शिरलो. ओळख करून दिली आणि म्हटले तुमचा एका फोटो काढू का? त्यांनी विचारले, माझाच का? त्यावर काय उत्तर देऊ हे कळत नव्हते. अखेर त्यांना सांगितले की, बाबाजी एक दर्जी के घर पैदा हुए थे, और आप भी दर्जी का काम करते है. मुझे ये संजोग अच्छा लगा, इसलिए... त्यावर ते सहजगत्या म्हणाले की, हां मुझे पता है, बाबाजी दर्जी के घर पैदा हुए थे. पर उन्होने सिर्फ कपडो के तुकडे नही, इन्सान को इन्सान से जोडा है!

नामदेवांनी परस्परांशी गुंफलेली ही धाग्याची वीण साऱ्या घुमानमध्ये पाहता येते. खरं तर हे संपूर्ण गावच नामदेवांनी वसवलं, असे सांगतात. इथे आधी जंगल होतं. गावाजवळ असलेल्या भट्टिवाल या गावातून नामदेव या जंगलात येऊन वसले. त्यांच्या येण्यानंतर लोकांची वर्दळ वाढली. त्यांच्या भक्तांची वस्ती आसपास होऊ लागली आणि हे बघताबघता घुमान नावारुपाला आलं. नामदेव घुमत घुमत म्हणजे देशभर फिरत इथे आले आणि स्थिरावले म्हणून घुमान किंवा घुमान आडनावाचे भक्त इथे त्यांच्या सेवेसाठी राहत होते म्हणून घुमान अशा या गावाच्या नावाच्या दोन उत्पत्या सांगतात. कारण इथले काही जण आपले आडनावच घुमान असं लावतात. काही असो, पण आज जसे पंढरपूर म्हणजे विठ्ठल तसेच घुमान म्हणजे बाबा नामदेव असे समीकरण बनले आहे. या घुमानच्या आसपासही नामदेवांच्या आणखी काही खाणाखुणा सापडतात. घुमानच्या मंदिराच्या मागे एक-दीड किलोमीटरवर पियाना म्हणून गुरुद्वारा आहे. येथे नामदेव तप करत बसायचे म्हणून हे तपियाना. हे तपस्थान पाहण्यासाठी काही पायऱ्या खाली उतरून जावे लागते. तिथे असेल्या ध्यानगुंफेवर आता काचेची दारे लावण्यात आली आहेत. या ध्यानगुंफेवर तीन अधिक तीन असा सहा मजली उंच मिनार उभाण्यात आला असून, तळ मजल्यावर नामदेवांची मूर्ती स्थापित करण्यात आली आहे. शेजारीच 'तपियाना साहेब गुरुद्वारा' असून समोर पाण्याचा तलावही आहे.



घुमान आणि तिथला परिसरात फिरता फिरता दिवस संपला होता. नामदेव मंदिराच्या पाठी सूर्य अस्ताला चालला होता आणि गावातले अनेकजण गुरुद्वारामध्ये जमू लागले होते. यातील काही दर्शनाला येत होते तर काही सेवेसाठी. सेवा ही शीख धर्मात पूजेएवढीच, किंबहुना त्याहून महत्त्वाची मानली जाते. त्यासाठी कोणतेही काम ते कमी मानत नाहीत. कुणी कचरा काढला, कुणी लादी पुसली, कुणी दिवाबत्ती केली तर कुणी सतरंज्या बदलल्या... पाहता पाहता चित्र पालटलं. रात्रीची पूजा झाली आणि साडेनऊ- दहाच्या सुमारास गावचा दिवस संपू लागला. तितक्यात भाई काश्मीर सिंग भेटले. त्यांना विचारलं उद्या सकाळी किती वाजता उठणार? म्हणाले, सुबह साडेतीन बजे. आप भी उठ जाओ. देखो तो सही कैसा शुरू होता है यहां का दिन.

पहाटे साडेतीन... हे ऐकूनच धक्का बसला होता. पण म्हटलं नक्की उठायचं. मोबाइलवर अलार्म लावून उठलो. बाहेर डोकाऊन पाहिलं तर मंदिर परिसराला जाग आली होती. सकाळचे सेवेकरी येऊन साफसफाई करत होते. आंघोळ आटपू म्हणून बाहेर पडणार तोच भाई काश्मीर सिंगांची हाक ऐकू आली, 'उठ गये, बढिया है, चलो तय्यार हो जाओ'. आवरा आवर होईपर्यंत साफसफाई संपली होती. मंदिरात आणि गुरुद्वारात पूजेचे सूर ऐकू येऊ लागले होते. गुरुद्वारात अहोरात्र सुरू असलेले पठण सुरूच होते. पण त्यात आता गुरुमुखीतील भजनाचे सूर मिसळले होते. हळूहळू सर्वांना ऐकू येतील एवढ्या आवाजात स्पीकरवरून गुरुग्रंथसाहेबमधील रचनांचे पठण सुरू झाले. त्याचा अर्थ कळत नसला तरी त्या मंगल स्वरांनी ती पहाट अविस्मरणीय केली होती. घुमानपासून गाडीमार्गाने साधारणतः १५ मिनिटाच्या अंतरावर भट्टिवाल नावाचे एक गाव आहे. नामदेव भूतविंडवरून आधी मरडमध्ये आणि तिथून या भट्टिवाल गावात ले असे सांगतात. येथील गावकऱ्यांनी नामदेवांना आपले हाल सांगितले. गावासाठी पाणी नाही आणि त्यामुळे साऱ्या गावात अंदाधुंदी माजल्याचे चित्र नामदेवांना आढळले. त्यांनी एका जागेकडे बोट दाखवत सांगितले की इथे तलाव खणा...

गावकऱ्यांनी तलाव खणण्यास सुरू केली आणि चक्क बारामाही पुरेल एवढा पाण्याचा साठा सापडला. गावकऱ्यांनी त्या तलावाला नाव दिले... नामियाना... आजही तो तलाव याच नावाने ओळखला जातो. नामियानाच्या बाजुलाच नामियाना साहेब गुरुद्वारा उभारण्यात आलाय. त्याच्यासमोर एक ध्यानगुंफा असून तेथे नामदेवांची ध्यानस्थ मूर्ती आहे. येथे नामदेव महाराज तप करत असल्याचे स्थानिक सांगतात. नामियानामध्ये स्नान केल्यास अनेक रोग बरे होतात, क्लेश दूर होतात अशी गावकऱ्यांची श्रद्धा आहे. त्यामुळे दर रविवारी येथे गावातील लोकांची गर्दी जमते. या गर्दीची सेवा करण्यासाठी लोक येतात. मग लंगर लागतो आणि सहभोजनही होते. 'नामियाना' पाहायला पोहचलो तेव्हा नेमका रविवार होता. सोमवारी शंकराच्या देवळात गर्दी होते तशी गर्दी होती. या गुरुद्वारामधील सर्व व्यवस्थापन जे पाहतात, ते महाराष्ट्रातील आहे, मराठी उत्तम बोलतात असे कळले होते. त्यामुळे त्यांना भेटण्याची कमालीची उत्सुकता होती. पंजाबमध्ये आल्यानंतर कोणाशीही मराठीत बोलता आले नव्हते त्यामुळे 'आपल्या भाषेचा भेटो कोणी' ही भावना उचबंळून आली होती. तिथे पोहचलो आणि एकाला विचारले, 'बाबाजीसे मिलना हे, कहां मिलेंगे?' ते म्हणाले, 'चलिये, मै दिखाता हूँ' आम्ही गुरुद्वाराशेजारीच असलेल्या एका बैठ्या चाळवजा इमारतीत गेलो. तेथील एका खोलीकडे बोट दाखवत ते म्हणाले, 'वोह रहे बाबाजी'

खोलीच्या दरवाजातूनच विचारले, 'आत येऊ का?'... 'या, बसा' असे शुद्ध मराठीतूनच उत्तर आले आणि त्यांनी सतरंजीकडे हात दाखवला... मी मांडी घालून बसलो. अस्सल पंजाबी पद्धतीने वाढवलेली दाढी, डोक्यावर पंजाबी शेतकरी बांधतो तसं मुंडासं, पंजाबी पद्धतीचाच झब्बा आणि धोतर... गादीशेजारील टेबलावर नामदेवांचा फोटो, गुरु गोविंदसिंगाचा फोटो आणि काही पोथ्या वगैरे... घरात थोडेसं सामान... त्यामुळे आपल्यासमोर गादीवर बसलेले हे आजोबा मराठी आहेत, असं नुसतं पाहून कोणालाही खरं वाटणार नाही.

ओळख वगैरे झाल्यानंतर म्हटले की, 'पंजाबात आल्यापासून पहिल्यांदाच मराठीतून बोलतोय. आतापर्यंत अनेकांच्या तोंडून नामदेवांच्या पंजाबमधील कार्याबद्दल ऐकलंय. पण खरंच सांगतो, त्यातील काही गोष्टी भाषेमुळे कळल्या नाहीत. कारण इथलं हिंदीही पंजाबीमिश्रित असते. त्यामुळे आज तुमच्याकडून नामदेव महाराज तर समजून घ्यायचेच आहेत. पण आणखी एक गोष्ट जाणून घ्यायचीय. ती म्हणजे तुमच्याबद्दल. एवढ्या दूर तुम्ही महाराष्ट्रातून इथे कसे काय आलात? कसे काय स्थिरावलात? प्रचंड कुतुहल आहे, या साऱ्याबद्दल' यावर ते हसत हसत म्हणाले, 'सांगतो ना. अगदी सुरुवातीपासून सगळं सांगतो.

माझं नाव नारायणदास गायकवाड. पण इथे सगळे बाबा नारायणदास किंवा बाबाजी म्हणूनच ओळखतात. मी मूळचा जालन्याचा. बदनापूरमधील सायगाव हे माझं गाव. पण हे गाव आता सुटलं. सध्या नामियाना हेच माझे घर, हेच माझे गाव. महाराष्ट्रात कधी कामानिमित्त जाणं होतं. पण तेवढ्यापुरतेच. माझं शिक्षण आळंदीतलं. जोग महाराजाच्या वारकरी शिक्षण संस्थेतलं. आजही ज्ञानेश्वरी-गाथेचे वाचन, हरिपाठ सारं नियमित सुरू आहे. तीर्थयात्रेच्या निमित्तानं इथपर्यंत आलो. संत नामदेव यांना गुरुस्थानी मानतो. त्यामुळे गुरुची सेवा करण्यासाठी १९७२ मध्ये इथे राहिलो. आता ४० वर्षे झाली. त्यामुळे आता इथलाच होऊन गेलोय. इथली माती, इथली माणसं. सर्वांचं माझ्यावर प्रेम आहे. माझंही त्यांच्यावर आहे. त्यामुळे आता पंजाब हीच माझी कर्मभूमी.' पण भाषा, संस्कृती, हवामान एवढंच काय पण खाणंपिणंही वेगळं आहे इथलं. त्या सर्वांशी जुळवून घेताना कसा अनुभव आला? 'फार त्रास नाही झाला. कारण काय करायचं ते नक्की होते. शेवटी नामदेव महाराजांच्या वाटेवरच चालत आलो. त्यांना त्यावेळी जमलं. आज तर जग किती बदललंय. त्यामुळे सारं जमून गेलं. शेवटी बाजुबाजुच्या दोन गावांमध्येही फरक असतो. त्यामुळे हे बदल स्वीकारूनच राहायला शिकलं पाहिजे. पण पंजाबी माणूस श्रद्धाळू आहे. धर्माची आणि गुरुची सेवा आपल्या हातून होत राहावी, अशी त्याची इच्छा असते. त्यामुळे मी इथे काम करू लागलो आणि मला मदत मिळत गेली. त्यामुळे हा अनुभव नक्कीच चांगला होता.



**आता नामदेवांबद्दल सांगतो....**

ज्ञानेश्वर माऊलींनी समाधी घेण्यापूर्वी त्यांनी नामदेव आणि आपल्या भावंडासह उत्तरेची यात्रा केल्याचं सांगितले जातं. पण माऊलींनी १२९६ मध्ये समाधी घेतल्यानंतर नामदेवांनी खऱ्या अर्थाने महाराष्ट्र सोडला. त्यांनी आधी दक्षिणेच्या आणि नंतर उत्तरेकडील यात्रा केल्या. काशी, पुष्कर, हरिद्वारला असताना त्यांना दिल्लीच्या बादशाहाने कैद करून दरबारात नेले. तेथे मेलेली गाय जिवंत करण्याचा किस्सा सांगतात. तेथून नामदेव महाराज पंजाबातील भूतविंडमध्ये आले. आपण ज्याला पाण्याचा पाट म्हणतो, इथे नहर म्हणतात. त्याच्या आसपास ते कीर्तन-भजन करत. त्यांचे भजन ऐकून लोक भेटण्यासाठी येत.


नामदेवांच्या उपदेशाने अनेकांना आयुष्याचा मार्ग सापडला. लोकांमध्ये नामदेव महाराजांबद्दल श्रद्धा निर्माण झाली. अशाच प्रवचनांमधून आणि कीर्तनांमधून त्यांनी गावातील अनेक वाईट चालीरिती, व्यसनं याविषयी लोकांचं प्रबोधन केले. लोकांना त्यांच्याच भाषेतून समजावून सांगितलेल्या विचारांमुळे नामदेवांचा भक्तपरिवार वाढत गेला. याच भूतविंडमध्ये त्यांना बोहरदास हा शिष्य मिळाला. इथून नामदेव महाराज मर्डी किंवा मरड या गावात गेले. तेथे बोहरदासांचं लग्न लावून दिलं, असं सांगतात. मरडवरून ते या भट्टिवाल गावात आले. तेव्हा पाण्याचा प्रचंड दुष्काळ होता. लोक पाण्यासाठी हाल सहन करत होते. नामदेवांनी तलाव, विहिरी पाडण्यासाठी लोकांना उद्युक्त केले आणि पाण्याचा दुष्काळ संपला. भट्टिवाल आणि आसपासच्या सखोवाल, धारिवाल या गावांमध्ये बाबा नामदेवांना मानणाऱ्यांची संख्या वाढू लागली. आजही त्याच्या कित्येक खाणाखुणा सापडतात.

इथे आल्यानंतर त्यांनी या गुरुदासपूर जिल्ह्यालाच आपल्याला कर्मभूमी म्हणून निवडलं आणि अखेरपर्यंत इथेच राहिले. शेवटची काही वर्षे ते भट्टिवालच्या शेजारीच असलेल्या जंगलात राहण्यासाठी गेले. बोहरदासासह शिष्यपरिवार त्यांच्यासोबत होता. त्या जंगलात नामदेवांच्या निवासस्थानामुळे लोकांचे येणं-जाणं वाढलं. हळूहळू काही भक्त तेथेच आसपास राहूही लागले. बघताबघता त्या जंगलाचं रुपांतर एका गावात झालं. त्याचं नाव घुमान. आजही नामदेवांनी वसवलेलं गाव म्हणून घुमानची ओळख आहे. याच घुमानमध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला असा इथल्या लोकांचा विश्वास आहे.' या कळीच्या मुद्द्यावर त्यांना अडवले. विचारले... पण तुम्हाला काय वाटते? नक्की त्यांच्या आयुष्याची अखेर कुठे झाली?

शेवटी हा विश्वासाचा हा भाग आहे. आज त्याचा कुठेही लिखित पुरावा उपलब्ध नाही. १३५० मध्ये त्यांनी समाधी घेतली असं मानलं तरी आज साडेसहाशे वर्ष उलटून गेली आहेत. त्यामुळे या वादात न पडता, त्यांचे कार्य समजून घ्यायला हवं. पंजाबी माणसाची श्रद्धा घुमानमध्ये आहे, मराठी माणसाची श्रद्धा? **समाप्त**

# पुन्हा पुन्हा ईव्हीएमवर निशाणा का?

**निवडणूक आयोगाने ईव्हीएम प्रणालीची विश्वासार्हता आणि पारदर्शकता वेळोवेळी सिद्ध केली आहे. लोकसभेच्या, राज्यांमधल्या निवडणुका ईव्हीएमद्वारेच घेतल्या जातात. आता महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीच्या दारुण पराभवानंतर अनेक नेत्यांकडून या प्रणालीवर संशय घेतला जात आहे. पराभव झाल्यानंतरच असा संशय घेणे आणि जनमताचा कौल मान्य करण्याऐवजी हा पर्याय निवडणे मतदारांनाही कोड्यात पाडणारा आहे.**



नोंद
शंतनू चिंचाळकर

१३मे रोजी पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या निकालांचा आनंद लुटणारे विरोधक २० नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीच्या अनपेक्षित निकालाने संभ्रमित झाले. निवडणूक आयोगाने वारंवार प्रणालीद्वारे होत असलेल्या मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता आणि विश्वासार्हता वेळोवेळी सिद्ध केली असतानाही संशय घेणे, अभ्यासू आणि जाणकार मतदारांनादेखील रुचेल की नाही ही शंका आहे.

कोट्यवधी मतदार आणि शेकडो पक्ष अशा प्रचंड पसाऱ्यात भारतातील निवडणुका होत असतात. त्यांचा ठरावीक असा कार्यकाळ नाही. त्यामुळे भारतात पूर्ण वर्षभर कोणत्या ना कोणत्या राज्यात निवडणुका होत असतात. लोकसभेच्या, विविध राज्यांमधल्या विधानसभेच्या आणि महानगर पालिकांच्याही निवडणुका आता इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनद्वारेच घेतल्या जाऊ लागल्या आहेत. या ईव्हीएम मशिन्सबाबत मतदारांमध्ये नेहमीच कुतूहल आणि विरोधकांमध्ये नेहमीच संशय राहिला आहे.

निवडणूक आयोगाच्या मते निवडणुकीच्या किचकट आणि आव्हानात्मक प्रक्रियेत मतदार हा केंद्रस्थानी असतो आणि मतांचं पावित्र्य हा सगळ्यात संवेदनशील मुद्दा आहे. असे असतानाही महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाविकास आघाडीतल्या अनेक नेत्यांनी ईव्हीएम मशिन्सवर संशय व्यक्त केला. लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात आघाडीला मिळा-लेले यश आणि केवळ सहा महिन्यांमध्येच आघाडीचा झालेला दारुण पराभव, या घटनांमुळे आघाडीच्या ज्येष्ठ नेत्यांकडून प्रणालीवर संशय घेतला जात आहे.

जून २०२४ च्या लोकसभेच्या निवडणुकीत 'अब की बार ४०० पार'चा नारा देऊन मैदानात उतरलेल्या भाजपाला स्वबळावर सरकार स्थापन करता आले नाही. केंद्रात भाजपा आणि मित्रपक्षांचे सरकार स्थापन झाले असले, तरी महाराष्ट्रात युतीला १८ आणि आघाडीला ३० जागा मिळणे अनपेक्षित होते. मतदानाची घसरलेली टक्केवारी असेल, भाजपाला संविधान बदलायचे आहे हा विरोधकांकडून झालेला अपप्रचार असेल किंवा इतरही काही कारणे असतील, भाजपाने पराभव मान्य केला. आजवर ज्या ज्या वेळी दिल्ली, पंजाब, केरळसारख्या राज्यांमध्ये दारुण पराभव झाला; भाजपाने आत्मचिंतनाद्वारे पराभवाची कारणे समजून घेण्याचा प्रयत्न केला. २०१७ मध्ये झालेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्येही भाजपाचा दारुण पराभव झाला होता.

आपण निवडणुका जिंकतो तेव्हा प्रणाली चांगली असते आणि हरतो तेव्हा त्यात काही तरी गडबड केलेली असते, हा अजब तर्क २०१४ पासून आजवर, म्हणजे गेली १० वर्षे ईव्हीएम मशिन्सविरोधी पक्षांनी उचलून धरला आहे आणि त्याद्वारे मतदानाला नेहमी विरोध दर्शवला आहे. तेच रडगाणे नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्रातील विधानसभेच्या निकालांवरून सुरू केले आहे.

ईव्हीएम मशिन्सद्वारे घेतलेल्या मतदानाने आजवर तीन तीन निवडणुका जिंकणारे नेते, आज त्याच प्रणालीकडे संशयाने पाहू लागले आहेत. एकेकाळी एकाच वेळी झालेल्या पाच राज्यांच्या आणि झारखंडमध्ये भाजपाच्या झालेल्या पराभवाकडे त्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. खरे तर भारतात सध्या लोकशाही पद्धतीने आणि निष्पक्षपातीपणे निवडणुका पार पाडण्यासाठी वापरात असलेली ही प्रणाली आदर्श मानावी लागेल.

भारतामध्ये अखंडतेने मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका पार पाडण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाला जागतिक स्तरावर 'गोल्ड स्टँडर्ड' म्हणून ओळखले जाते. आयोगाने निवडणुकीच्या कार्यक्षम, सुरळीत आणि व्यावसायिक वर्तनाचे नेहमीच उच्च दर्जाचे मानक स्थापित केले आहेत आणि निवडणूक प्रक्रिया आणि प्रणाली सुधारण्यासाठी नवीनतम प्रगत तंत्रज्ञान स्वीकारण्यात, अवलंबण्यात आणि अंमलात आणण्यात आयोग आघाडीवर आहे. गेल्या २० वर्षांमध्ये आयोगाने ईव्हीएम मशिन्सचा वापर करून राज्य विधानसभेच्या १०७ आणि तीन लोकसभा निवडणुका यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. सप्टेंबर २०१३ पासून मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता आणि विश्वासार्हता वाढविण्यासाठी विविध राज्यांच्या विधानसभा आणि संसदीय मतदारसंघांमध्ये व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल (व्हीव्हीपॅट) मशिन्सचाही वापर करण्यात आला आहे.

मार्च २०१७ मध्ये पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे (उत्तरप्रदेश, उत्तराखंड, पंजाब, गोवा आणि मणिपूर) निकाल जाहीर झाल्यानंतर ईव्हीएम च्या कार्यप्रणालीवर काही शंका उपस्थित झाल्या होत्या. या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर काही तक्रारी आणि सूचना आयोगाला प्राप्त झाल्या. आयोगाने या तक्रारींची रीतसर तपासणी केली आणि दाव्यांना समर्थन देणारे पुरावे आणि विश्वासार्ह सामग्रीची माहिती मागितली, परंतु तक्रारकर्त्यांनी कोणतेही पुरावे दिले नाहीत. १३ राजकीय पक्षांच्या गटाने १० एप्रिल २०१७ रोजी आयोगाची भेट घेतली आणि ईव्हीएमच्या वापराबाबत काही आक्षेप व्यक्त केले. काही राजकीय पक्षांनी एप्रिल २०१७ च्या पहिल्या आठवड्यात झालेल्या भिंड (पंजाब) आणि ढोलपूर (राजस्थान) पोटनिवडणुकीत ३१ मार्च २०१७ रोजी (वास्तविक मतदानात नाही) वापरल्या गेलेल्या संबंधित घटनांबद्दलदेखील प्रश्न उपस्थित केले.

राजकीय पक्षांच्या चिंता समजून घेण्यासाठी आयोगाने सर्वपक्षीय बैठक बोलावली. त्याच दिवशी पुढील परिणामांसाठी एक प्रेस स्टेटमेंट जारी करण्यात आले. आयोगाने राजकीय पक्षांसमोर सांगितले की, भविष्यातील सर्व निवडणुका अनिवार्यपणे ईव्हीएमद्वारे घेतल्या जातील. भविष्यातील सर्व निवडणुकांमध्ये सर्व मतदान केंद्रांवर सोबत मशिन्सचा वापर केल्याने आधारित मतदान व्यवस्थेत कमालीची पारदर्शकता आणि विश्वासार्हता येईल, असा आयोगाचा ठाम विश्वास आहे. प्रत्येक मतदाराला आपले मत योग्य उमेदवाराला गेले आहे की नाही हे व्हीव्हीपॅटम ध्ये पाहणे शक्य होईल. आयोगाने या प्रणालीवर विश्वास व्यक्त केला आहे आणि ईव्हीएमची अखंडता, गैरछेडछाड आणि विश्वासार्हता यावर आयोगाचा ठाम विश्वास आहे. आयोगाने ईव्हीएमचे उत्पादन, वाहतूक, स्टोरेज, मतदान आणि मतमोजणी प्रक्रियेदरम्यान कोणत्याही प्रकारच्या छेडछाडीपासून संरक्षणाची नेहमी हमी दिली आहे. तरीही या प्रणालीची अखंडता आणि विश्वासार्हता आणखी कशी सुधारता येईल, याविषयी सर्व राजकीय पक्षांच्या सूचना प्राप्त करण्याची ग्वाही आयोगाने आजवर दिली. ईव्हीएमच्या कामकाजाबाबत कोणत्याही प्रकारे संशयाची छटाही जाणवू देणार नाही, हा विश्वासही आयोगाने दिला आहे. बॅलेट पेपरद्वारे मतदान घ्यायचा विरोधकांचा आग्रह आश्चर्यजनक म्हणावा लागेल. बिहार आणि उत्तरप्रदेशसारख्या काही राज्यांमध्ये मतपेट्या पळवणे, निवडणूक अधिकाऱ्यांना धमकावून मतदान केंद्रे ताब्यात घेणे, मतदारांनी प्रत्यक्षात मतदान केले नसतानाही बॅलेट पेपरवर हव्या त्या उमेदवाराच्या चिन्हावर शिक्के मारणे आणि काही परिस्थितीत तर मतपेट्या चक्क पळवून नेणे, असे प्रकार पूर्वी घडलेले आहेत. अशा परिस्थितीत मतदान प्रक्रियेत पारदर्शकता आणि विश्वासार्हता येण्याच्या दृष्टीने अस्तित्वात आणलेल्या ईव्हीएम प्रणालीचे स्वागतच व्हायला हवे. असे असूनही अलिकडच्या काळात ईव्हीएम मशीन हॅक होऊ शकते का, हा चर्चेचा विषय बनला. बीबीसीचे प्रतिनिधी सौतिक बिस्वास यांनी २०१९ च्या निवडणुकांवेळीही सखोल आढावा घेतला होता. त्यांच्या मते निवडणूक आयोग ही स्वतंत्र स्वायत्त संस्था आहे.

मतदान करताना मतदार मशीनवरचे बटन दाबून आपले मत नोंदवतात. आणखी एका बटनाद्वारे मतदान अधिकारी मतदानाची प्रक्रिया पूर्ण करतात. मतदानाची वेळ संपल्यानंतर हे बटन दाबून प्रक्रिया थांबवली जाते. याव्यतिरिक्त मतदान केंद्र ताब्यात घेतल्यास किंवा मतदान प्रक्रियेत बाधा आणल्यास हे बटन दाबून प्रक्रिया थांबवली जाते. मतदान यंत्राबरोबर कोणतीही छेडछाड होऊ नये यासाठी मतदान अधिकारी लाखेने सीलबंद करतात. निवडणूक आयोगातर्फे पुरवण्यात आलेल्या खास धाग्याने ते बांधले जाते. याला एक सीरियल नंबर दिला जातो.

या मशिन्समुळे वेळ वाचतो, तीन ते पाच तासात गणना होऊन एकेका मतदारसंघातील यंत्रातील मतांचा निकाल लागू शकतो. कागदी मतपत्रिका असताना यासाठी ४० तास लागत असत. ईव्हीएम मशिन्समुळे अवैध मतांचा मुद्दा निकाली निघाला आहे. यामुळे होणारा पैशाचा अपव्ययही टळला आहे. आयोगाच्या मते इतक्या पारदर्शक आणि सुटसुटीत प्रणालीवर संशय घेणे अनाकलनीय आहे. ईव्हीएमद्वारे घेतलेल्या मतदानाने आजवर तीन तीन निवडणुका जिंकणारे नेते आज या प्रणालीकडे संशयाने पाहू लागले आहेत. या दुटप्पीपणाचे कुठेतरी उत्तर द्यावेच लागेल.



विश्वसंचार
मल्हार कृष्ण गोखले

# जे देशासाठी लढले, ते अमर हुतात्मे झाले!

आपल्या देशाच्या प्रत्येक प्रांतातल्या एखाद्या विशिष्ट भागात क्षात्रतेजाची मोठी परंपरा असल्याचे दिसून येते. महाराष्ट्राच्या मावळ भागातल्या योद्ध्यांनी शिवछत्रपती आणि बाजीराव पेशवे यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड पराक्रम गाजवले. पुढे इंग्रजांच्या सेनापतित्वाखाली भारताच्या सर्व प्रांतांतील सैनिक युरोपात फ्रान्समध्ये, आफ्रिकेत, इजिप्तच्या वाळवंटी भागात नि आशियात तुर्कस्तान आणि पॅलेस्टाईनमध्ये लढले, जरी ते इंग्रज मालकांचे परतंत्र भारतीय गुलाम म्हणून लढत असले, तरी क्षात्रतेजात ते ब्रिटिश, फ्रेंच किंवा अमेरिकन सैनिकांइतकेच तिखट होते.

किंबहुना अनेक रणांगणांवर असेही घडले आहे की, समोरच्या जर्मन शत्रूंचा पहिला असह्य मारा भारतीय सैनिक आपल्या छातीवर झेलायचे आणि मग किंचित उणा झालेल्या आघाताला तोंड द्यायला ब्रिटिश सैनिक पुढे सरसावायचे. अनेक संस्थानांच्या राजेमहाराजे-नबाब यांची संस्थानी सैन्येदेखील ब्रिटिश भारतीय सैन्यांच्या सोबत परदेशी रणांगणांवर लढली. कोणीही, कुठेही लढण्यात कमी पडले नाहीत. महाराष्ट्रातले मराठे, पंजाबातले शीख आणि जाट, राजस्थानातले राजपूत, काश्मिरातले डोगरा, उत्तर भारतातले पूरबिये (ज्यांना आपण चुकीने पुरभय्ये म्हणतो), कर्नाटकच्या कोडागू (भ्रष्ट उच्चार कूर्ग ) भागातले कोडावा, तामिळनाडूतले गौडा, केरळमधले थेवर असे सगळे लोक इंग्रजांच्या सैन्यातून इंग्रजांच्या शत्रूंशी कडक झुंजले.

इंग्रजांनी त्यांच्या साम्राज्याच्या हिताच्या दृष्टीने या वेगवेगळ्या प्रांतांच्या सैन्यांची रचना केलेली होती. उदा. मराठा पलटण असे म्हटल्यावर त्यात महाराष्ट्रातल्या सैनिकांची, त्यातही विशेषतः मराठा या ज्ञाती समाजातल्या सैनिकांची भरती केलेली असे. त्यांचा कमांडिंग ऑफिसर हा मात्र इंग्रजच असे. कोणत्याही भारतीय पलटणीत भारतीय माणूस हा फक्त सैनिक-सेपॉय असे. त्याला अधिकारीपद कधीच दिले जात नसे. ही स्थिती किंवा हे धोरण १९४० सालानंतर इंग्रजांना नाईलाजाने बदलावे लागले.

कारण हिटलरच्या झंझावाताने इंग्रजांचे प्राण कंठाशी आले होते. त्यांना लढायला नेतृत्व करायला आणि मरायला मुबलक माणसे हवी होती. म्हणून त्यांनी भारतीय सैनिकांना अधिकारी पदावर बढती देण्याचा आणि सुशिक्षित भारतीय तरुणांना थेट अधिकारी म्हणून भरती करण्याचा निर्णय घेतला; जो भारताच्या पथ्यावर पडला. कारण त्यामुळे १९४७ साली स्वतंत्र भारताला अतिशय सुसज्ज, आधुनिक, प्रशिक्षित आणि महायुद्धाचा अनुभव गाठीशी असलेले सैन्य आपोआपच मिळाले. जनरल कोदंडेरा मदाप्पा (के. एम.) करिअप्पा या महान सेनापतीने स्वतंत्र भारतीय सैन्याच्या पुनर्रचनेचे अतिशय किचकट काम फार कुशलतेने पार पाडले. फाळणीमुळे सैन्यदलांमधल्या अनेक पलटणी, अनेक सेनापती आणि सैनिक, अनेक महत्त्वाची लष्करी ठाणी, खूप सारे युद्ध साहित्य हे पाकिस्तानकडे गेले होते. त्याचप्रमाणे संस्थाने विलीन झाल्यामुळे अनेक संस्थानी सैन्यांची लष्करी दले मूळ भारतीय सैन्यदलांमध्ये योग्य रीतीने मिळवून घ्यायची होती.

जनरल करिअप्पा आणि त्यांच्या सहायक लोकांनी हे प्रशासकीय काम, कोणत्याही मुरब्बी नागरी प्रशासकीय अधिकाऱ्याइतक्याच कौशल्याने आणि लष्करी पद्धतीने झपाट्याने पार पाडले. या अजोड कामगिरीबद्दल त्यांना 'फिल्ड मार्शल' हा सर्वोच्च लष्करी किताब केव्हाच मिळायला हवा होता. तो अखेर १९८६ साली राजीव गांधींच्या पंतप्रधान कारकीर्दीत त्यांना मिळाला.

मराठा रेजिमेंट, शीख रेजिमेंट, राजपूत रेजिमेंट या भारतीय सैन्यातल्या अत्यंत नामवंत सैन्य तुकड्यांप्रमाणेच कुमाऊं रेजिमेंट हीदेखील एक फार प्रख्यात अशी पराक्रमी रेजिमेंट आहे. भारताच्या उत्तराखंड राज्यात कुमाऊं नावाचा एक भाग आहे.

आपण सर्वांनी नैनिताल हे एक प्रसिद्ध पर्यटन स्थळ नक्कीच ऐकले-पाहिले असेल. ते नैनिताल ठिकाण कुमाऊं भागातले मुख्य शहर आहे. आल्मोडा, पिठौरगढ, राणीखेत इत्यादी ठिकाणे कुमाऊंमध्येच येतात.

जिब कॉर्बेट नॅशनल पार्क हे प्रसिद्ध अभयारण्य इथलेच. भारतीय (म्हणजे हिंदू) पुराणांमध्ये हिम ालयाच्या या भागाला 'कूर्मांचल' असे नाव आहे. त्याचा अपभ्रंश झाला कुमाऊं. इथल्या स्थानिक रहिवाशांना म्हणतात कुमाऊंनी. हे लोक पक्के लढवय्ये आहेत. भारतातल्या प्रत्येक प्रांतात जर लढवय्ये लोक आहेत म्हणजे लढाऊपणाच्या, झुंजारपणाच्या त्यांच्या परंपरा आहेत, तर मग हा देश मुघलांच्या आणि इंग्रजांच्या ताब्यात गेलाच कसा आणि का? या प्रश्नाचे आध्यात्मिक उत्तर स्वामी विवेकानंदांनी आणि सामाजिक उत्तर डॉ. हेडगेवारांनी देऊन ठेवलेले आहे.

स्वामीजींच्या उत्तराचा आशय असा की, समुद्र हा अमर्याद शक्तिशाली असतो, पण त्यालाही काळानुसार भरती-ओहोटी असतेच. तसाच सध्याचा काळ हा हिंदू समाजाच्या ओहोटीचा काळ आहे. परंतु म्हणून आपण हातपाय गाळून न बसता, भरतीचा काळ यावा म्हणून सतत प्रयत्न करायचे. डॉ. हेडगेवारांच्या म्हणण्याचा आशय असा की, हिंदू समाजाची राष्ट्रीय भावना क्षीण झाली. एकरसतेची भावना क्षीण झाली. त्यातून समाजाचे संघटन विस्कळीत झाले. हा असंघटित, विस्कळीत समाज परकीय आक्रमणांना बळी पडला. त्यातून त्याची अधिकच अवनती होत राहिली. मंबाजीराजे भोसले हे कमी शूर नव्हते.

दत्ताजीराजे जाधवराव हे काही कमी कर्तबगार नव्हते. पण आपली तिखट तलवार कुणाच्या बाजूने नि कुणाच्या विरोधात चालवायची, हेच त्यांना समजत नव्हते. म्हणून मंबाजीराजे आपल्या पुतण्याविरुद्ध अफजल खानाच्या सैन्यातून आणि दत्ताजीराजे आपल्या भाच्याविरुद्ध शाहिस्तेखानाच्या सैन्यातून लढले. शिवरायांचा पक्ष हाच खरा राष्ट्रीय पक्ष आहे, हे या काकामामांना समजतच नव्हते. कुमाऊं भागातल्या लढवय्यांनादेखील ते समजत नव्हते. मग काय, जो पगार देईल त्याच्या बाजूने तलवार गाजवायची. अशा पोटापाण्याच्या शोधात हिमालयाच्या पहाडी प्रदेशातले हे कुमाऊंनी लोक थेट हैदराबादच्या निजामाच्या पदरीसुद्धा राहिले. निजामाच्या दरबारातला इंग्रज रेसिडेंट सर हेन्री रसेल याच्या डोळ्यांत कुमाऊंनी लोकांचा पराक्रम भरला. त्याने खास स्वतःच्या देखरेखीखाली कुमाऊंनी लोकांची एक अख्खी ब्रिगेड उभी केली.

एक ब्रिगेड म्हणजे सुमारे ३ ते ५ हजार सैनिक. तिला 'रसेल ब्रिगेड' असेच नाव मिळाले. पुढे १९१७ साली कुमाऊं प्रदेशात राणीखेत इथे ब्रिटिश भारतीय सैन्याची 'कुमाऊं रायफल्स' ही स्वतंत्र तुकडी उभी राहिली. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धात कुमाऊंनी सैनिकांनी भरपूर पराक्रम गाजवला. भारत आणि पाकिस्तान स्वतंत्र झाल्यावर अवघ्या सव्वादोन महिन्यांत पाकिस्तानने भारताच्या काश्मीरवर हला चढवून तो प्रदेश जवळपास जिंकलाच होता. भारतीय सैन्याने त्वरेने प्रतिकार सुरू केला.

'बडगामची लढाई' म्हणून प्रसिद्ध असलेल्या लढाईत पहिली कुमाऊं आणि चौथी कुमाऊं या दोन तुकड्यांनी अतुलनीय पराक्रम गाजवला. कमांडिंग ऑफिसर मेजर सोमनाथ शर्मा यांनी धैर्यशाली नेतृत्वाचा कळस गाठत अखेर बलिदान केले. त्यांना 'परमवीर चक्र' हा सर्वोच्च लष्करी सन्मान देण्यात आला. अशा प्रकारे स्वतंत्र भारतासाठी लढताना सर्वोच्च सन्मान मिळविण्याचा पराक्रम कुमाऊं रेजिमेंटने केला. हे स्वतंत्र भारताचे पहिले परमवीर चक्र. २० ऑक्टोबर १९६२ या दिवशी चीनने भारतावर आकस्मिकपणे आक्रमण केले.

या युद्धाच्या दोन आघाड्या होत्या. एक ईशान्य भारतातला आजचा अरुणाचल प्रदेश. त्याला तेव्हा नॉर्थ ईस्ट फ्रंटियर एजन्सी म्हणजेच 'नेफा' असे नाव होते. बेसावध भारतीय सैन्याचा पराभव करत चिनी सैन्याने तावांग हे भारतीय सीमेवरचे महत्त्वाचे ठाणे जिंकले. आता ते तेजपूरच्या परिसरात उभे राहिले. तेजपूर पडले तर भारताने ईशान्य भारत गमावला, अशी स्थिती निर्माण झाली. इकडे वायव्येकडे जम्मू-काश्मीर राज्यातील लद्दाख (भ्रष्ट उच्चार लडाख) भागातील अक्साई चीन या अति दुर्गम बर्फाळ, गारठोण प्रदेशावर चीन चालून आला. युशूल या ठाण्याजवळ भारताने एक धावपट्टी उभारली होती. ती जिंकली किंवा उद्ध्वस्त केली की, अक्साई चीन भारताला ताब्यातून गेल्यासारखाच होता. अशा अवघड समयी कुमाऊं रेजिमेंट तिथे धाडण्यात आली.

कुमाऊं रेजिमेंटच्या 'सी' कंपनीचे कमांडिंग ऑफिसर मेजर शैतान सिंह भाटी हे होते. मेजर शैतान सिंहांचे वडील पहिल्या महायुद्धात लढलेले होते. स्वतः शैतान सिंहांना १९५६ सालच्या नागा बंडखोरांबरोबरच्या युद्धाचा आणि १९६१ च्या गोवा मुक्ती युद्धाचा अनुभव होता. त्यामुळेच अपुरी नि जुनाट युद्धसामग्री, अपुरे अन्न, उबदार कपड्यांचा अभाव, शत्रूच्या किमान ६ हजार सैनिकांसमोर फक्त १२० सैनिकांची एक कंपनी असा सगळाच प्रतिकूल, विपरीत मामला असतानाही मेजर शैतान सिंहांनी उत्कृष्ट मोर्चेबांधणी केली.

१८ नोव्हेंबर १९६२ या दिवशी पहाटे ३.३० वाजता चिन्मांनी रेझांग ला भागातून आक्रमण सुरू केले. चिन्मांकडे अत्याधुनिक ॲसॉल्ट रायफली होत्या तर भारतीय सैनिकांकडे १९४५ सालातल्या, एका वेळी एकच काडतूस डागू शकणाऱ्या 'थ्री-नॉट-थ्री' रायफली होत्या.

चिनी सैनिक समुद्राच्या लाटांच्या रचनेत (वेव्ह टेक्निक), एका पाठोपाठ एक रांग, असे पुढे सरसावत होते. मेजर शैतान सिंग खरोखरच एखाद्या कर्दनकाळ सैतानासारखे लढत होते. आपल्या मोर्चांमधून फिरून आपल्या सैनिकांना धीर देत होते. 'कालिका माता की जय' ही कुमाऊं रेजिमेंटची युद्धगर्जना सैनिकांना चेतवत होती. चिन्मांचे दोन कजाखी हल्ले आपण म ारून काढले. पण आता आपल्या १२० सैनिकांपैकी फारच थोडे जिवंत राहिले होते.

मेजर शैतान सिंहांना आपले मरण ओळखले आणि आपल्या उरलेल्या सैनिकांना माघार घेण्याचा हुकूम सोडला... पण... एकही जण माघारी फिरला नाही. लढाई संपली तेव्हा १२० जणांपैकी ११४ जण ठार झाले होते आणि ६ युद्धकैदी बनले. याच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे १९ नोव्हेंबरला चीनने एकतर्फी युद्धबंदी घोषित केली. जी २१ नोव्हेंबरपासून अंमलात आली.

पुढे फेब्रुवारी १९६३ मध्ये भारतीय सैन्याच्या शोधपथकांनी रेझांग ला भागात जाऊन मेजर शैतान सिंह आणि त्यांच्या शूर जवानांचे मृतदेह शोधून तळावर आणले. अती हिमवर्षामुळे तीन महिनेपर्यंत कोणतेही शोधपथक त्या भागात जाऊच शकले नव्हते. मेजर शैतान सिंहांना 'परमवीर चक्र' हा सर्वो च्च सन्मान बहाल करण्यात आला.

१ डिसेंबर १९२४ हा मेजर शैतान सिंहांचा जन्मदिवस. म्हणजेच १ डिसेंबर २०२४ हा त्यांच्या जन्मशताब्दीचा दिवस होय. मेजर साहेब, तुम्हाला एक कडक सॅल्यूट! (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

